


OUR SERVICES

- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM 9623979067

Siddhi Prakashan

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal**

Website : www.wiidrj.com
C/o. R.G. Umbarkar, H.No. 624, Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)
Email : umbarkar.rajesh@yahoo.com
shrishprakashan2009@gmail.com
Mob : +91-9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed) Year - 7, Vol. I, Issue-LIII, 20 Jan. 2022

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479



# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)



Year - 7, Vol. I, Issue- LIII, 20 Jan. 2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आणि
किनवट शिक्षण संस्थेचे, नॅक पुर्नमूल्यांकित
बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट
स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठी विभागाच्या वतीने
एकदिवसीय राष्ट्रीय आभासी (ऑनलाईन) चर्चासत्र

# समकालीन मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा

* संपादक *
प्रा. डॉ. पंजाब शेरे
मराठी विभागप्रमुख
बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

**Address for Correspondence**

*Mrs. Pallavi Laxman Shete*
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School. Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
*Dr. Rajesh G. Umbarkar*
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor 2022:* 7 . 479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

## *A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - LIII Year – 7 20 Jan. 2022**

# "समकालीन मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा"

**:: संपादक ::**

**डॉ. पंजाब लक्ष्मण शेरे**

**मराठी विभागप्रमुख**

**बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट जि. नांदेड.**

**Address for Correspondence**

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India) Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director : Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India - Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067 **Website: www.wiidrj.com**

# Worldwide International Inter Disciplinary Research

## (A Peer Reviewed Referred)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |

**<u>Director</u> : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

***Printed by***

Anupam Printers, (Subbranch: Nanded) Men Branch : Hyderabad (AP)

**Cost: Rs. 400/-**

**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

**The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.**

# Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. S.V. Shivanikar**<br>Principal<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Deepak Dwarkadasrao Bachewar**<br>**Associate Professor**<br>Vasantrao Naik College, Vasarni, Nanded- (MH., India.) |
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics, Pratibha Niketan Mahavidyalaya, Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies<br>S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr.Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine,<br>Dept. of Cancer Biology,Winston Salem, NC, USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor,Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit, HNB Garhwal University, Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>Sardar Vallabhbhai Patel Hospital,(Neurosurgery),Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci.<br>S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |

# Co-Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science<br>Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages,<br>Loyola College,(Autonomous) Affiliated to University of Madras,Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry<br>Shivaji University, Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension<br>Education, Institute of Agricultural Sci.<br>BHU, Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English, Dr. B.R. Ambedkar F.G. College, Ladgeri,<br>Bidar, Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce<br>(MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education<br>S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa<br>Govt. Ayurved College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD, Dept. of Rachanasharir,<br>Shri dhanwantry ayurvedic College and hospital sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College, Nanded. (MH., India) |

## Peer-Review Committee


| | |
|---|---|
| **Dr. U. D. Joshi**<br>Principal<br>Y. College, Ambajogai. (MH., India.) | **Dr. Vasant Biradar**<br>Principal<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Joshi Prashantkumar Panditdev**<br>Department of Zoology (Fishery Science) Adarsh College, Hingoli-431513 (MH., India.) | **Prof. Dr. Mahendrakumar Y. Kulkarni**<br>Head,Dept. of zoology<br>N.S.B. Colloege, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Bibhishan Kare**<br>Rrsearch Guide, Professor and HOD<br>Dept. of Sociology, NSB College, Nanded. | **Prof. Dr. Durgadas D. Choudhari**<br>Head Dept. of Economics<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Prashant Andage**<br>Dept. of Envi. Sci<br>Ratnagiri sub Center, Mumbai University(MH., India.) | **Dr. Sanjay S. Pekamwar**<br>School of Pharmacy,<br>SRTM University, Nanded (MH., India.) |
| **Dr. Shivraj G. Vannale**<br>School of Chemical Sciences<br>S.R.T.M.U. Nanded(MH., India.) | **Dr. Shashikant B. Dargu**<br>Dept. Of Sanskrit<br>N. S. B. College, Nanded(MH., India.) |
| **Dr. Sadavarte Rajesh K.**<br>Dept. of Computer,<br>N.S.B. College, Nanded. (MH., India.) | **Dr. Subhash T. Pandit**<br>Department of Economics,<br>S. V. Night College, Dombivli (E) (MH., India.) |
| **Dr. Kalpana Kadam (Bedre)**<br>Dept.of Political Sci., N.S.B. College,Nanded.(MH., India.) | **Dr. Vinay D. Bhogle**<br>Dept. of English Degloor College, Deglor(MH., India.) |
| **Dr. Deshpande R. P.**<br>Dept. Zoology<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani. (MH., India.) | **Dr. Sharada Bande**<br>Head, Dept. of History, S. S. Suryabhanji Pawar College, Purna (Jn.) (MH., India.) |
| **Dr.Kamble Ratnakar Ramrao**<br>Associate Professor, Dept.of Economics,<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani(MH., India.) | **Dr. Gananjay Y. Kahalekar**<br>Mahatma Jyotiba Phule Mahavidyalay,<br>Mukhed Dist. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Prashant G. Gawali**<br>Associate Professor, Dept. of Physics<br>Bahirji Smarak Mahavidyalya, Basmathnagar,<br>Dist. Hingoli (MH., India.) | **Dr. Vikas Kundu**<br>Geeta College of Education Butana(kundu),<br>Sonepat - Haryana |
| **Prof. K. Varalaxmi**<br>Deputy Director Sanskrit Academy,<br>Osmania University, Hyderabad. | |


## Advisor Committee


| | |
|---|---|
| **Dr. Milind V. Rampurkar**<br>Govt. Ayurved College, Mumbai. (MH., India.) | **Dr. Sudhir Kokare**<br>Nanded. (MH., India.) |
| **Dr. Sanjay G. Shirodkar**<br>Principal<br>Swa. Sawarkar College, Beed. (MH., India.) | **Prof. Dr. Chitanand M. P.**<br>Dept. Of Microbiology<br>N. S. B. College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Darmapurikar Bhalchandra V.**<br>Dept. of Political sci., NSB college, Nanded. (MH., India.) | **Dr. Ashish Divde**<br>Head Dept.of Envi.Sci,H.J.P.Mahavidyalaya,H.Nagar.(MH., India.) |
| **Shri. Bidrkar**<br>Shivaji College, Parbhani (MH., India.) | **Dr. Anand R. Ashturkar**<br>Dept. of Envi. Sci. N.S.B.College, Nanded (MH., India.) |
| **Adv.Yadupat Ardhapurkar**<br>Law.,Nanded. (MH., India.) | **Dr. Karale Nagesh Baburao**<br>Saraswati Mahavidyalaya, Kaij Dist. Beed. (MH., India.) |
| **Dr. Nagesh R. Khadkekar**<br>SRTMU, Nanded. (MH., India.) | **Dr. Jeevan Pimpalwadkar** (Marathi)<br>Research Guide, SRTMU Nanded. (MH., India) |
| **Dr. A.I. Shaikh**<br>Associate Professor & Head, School of Social Sciences,<br>SRTMU, Nanded. (MH., India) | **Dr. Rajendr Jadhav**<br>Nanded. (MH., India.) |
| **Shri Bharat Jangam**<br>Director Jangam Academy, Nepal.. | **Dr. Jayanth Chapla**<br>Dept of Zoology Osmania University, Hyderabad. (India) |
| **Shri. Santkumar Mahajan**<br>Nanded. (MH., India.) | |

# समकालीन मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रेरणा

## प्रस्तावना

समकालीनत्व ही केवळ काळाचे दर्शन घडविणारी घटना नसून ती त्या - त्या काळातील जाणिवांच्या पातळीवर या संकल्पनेचा विचार करावयास लावणारी आहे. समकालीन मराठी साहित्य म्हणताना स्थूलमानाने १९७५ नंतरचे साहित्य अभिप्रेत असते. पण हे ही खरे आहे की, येथे १९९० नंतरच्या मराठी साहित्याच्या वेगवेगळया अविष्कारानी व्यक्त होणारे साहित्य आपल्या समोर येते. १९९० नंतरचे मराठी साहित्य हे वेगवेगळया कारणांमुळे डोळयासमोर आहे. या साहित्याचा कोणत्याही कारणांनी का होईना जेवढा गाजावाजा झाला आहे, तेवढा तो मराठी साहित्याच्या इतिहासात कोणत्याही काळात झालेला दिसत नाही, तसेच चांगले साहित्य लेखन, विविध साहित्य प्रकारांमध्ये लिहिणाऱ्या वेगवेगळया भागातील लेखकांची संख्या लक्षणीय स्वरुपाची या काळात दिसून येते. या संपादित ग्रंथात समकालीन मराठी साहित्य म्हणताना १९९० नंतरचे साहित्यआस्वाद डोळयांसमोर आहे.

समकालीन मराठी साहित्यावर विविध साहित्य प्रकारांनी, विविध साहित्याच्या अंगांनी चर्चा व्हावी, या प्रमुख उद्देशांनी डॉ. पंजाब शेरे यांनी, "समकालीन मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रेरणा" या ग्रंथाचे संपादन केले आहे. समकालीनत्व या संकल्पनेकडे एक मूल्य म्हणून पाहावे लागते. त्या त्या काळातील अस्तित्त्वात असणाऱ्या पध्दतीने काही मूल्ये प्रभावित होत असतात. लोकशाहीतील समता, स्वातंत्र्य व बंधुता तसेच लोकशाहीतील समाजवाद, सर्वधर्मसमवाद, पंचतत्वे, साम्यवाद इत्यादी मूल्ये समकाळातील प्रतिकुल आव्हाणे पेलून, त्यावर मात करून निर्माण झाली. या मूल्यांना शब्द करण्याचे कार्य समकालीन मराठी साहित्यातून झालेले आहे. या अभिव्यक्त झालेल्या समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न या ग्रंथातून येथे केलेला आहे.

समकालीन मराठी साहित्यात कधी ही एकमताची अपेक्षा करावयाची नसते, म्हणूनच या संपादित ग्रंथामध्ये ही असे अनेक मतांची अपेक्षा करून समकालीन साहित्याची बहूरंगी चर्चा वाचकांच्या हाती दिली आहे. या ग्रंथातील संपादित लेखांचा विचार करता साधारणतः समकालीन मराठी साहित्यातील कादंबरी, कविता, नाटक, स्त्रीवादी साहित्य आणि दलित साहित्यासह कांही दलित स्त्रीलेखिकेचे आत्मकथने या विषयानुषगांने विचार विमर्श आलेला आहे. या ठिकाणी साहित्याचे स्वरुप त्याचा वाचक वर्ग त्याचे अभ्यासक, समीक्षक, त्यांचे प्रकाशक-संपादक, त्यांचे विक्रेते या सर्व घटकांमध्ये आत्मनिष्ठा व वस्तुनिष्ठा यांचे काहीसे बेभरवस्याचे रसायन अंगभूतपणे असते, असेच कांहीसे समकालीन साहित्याबाबत आहे. ते अलिकडे तर नजरेत ठळक भरण्यासारखे दिसते आहे. समकालीन लेखन कोणत्याही वाड्.मय प्रकारामध्ये तो लिहित असला तरी स्पष्ट लिहितो आहे. तो त्याला जे वाटते आहे, जे अनुभव आले आहेत ते मांडताना धजावतो. म्हणूनच समकालीन साहित्यामध्ये चांगल्या आणि श्रेष्ठ साहित्याविषयीचे निकषही वेगवेगळे व पुस्कळदा परस्पर विरोधी असतांना दिसतात. तरी या चांगल्या आणि श्रेष्ठ साहित्यकृतीला समाज कधी योग्यवेळी तर कधी उशिरा स्विकारतो. काहीही असले तरी समकालीन मराठी साहित्य हे अवतीभोवतीच्या वास्तवाचे व त्या वास्तवातील आपला आत्मानुभवी अस्मितेचे प्रखर, निडर आत्म अविष्कार मांडते. ही साहित्य लेखनवृती समकालीन साहित्यातील जाणिवेला व्यापक, उन्नत व स्वागतशील करीत आहे.

दलित साहित्यातील, रंगभूमी, आत्मचरित्रे, आत्मकथानाच्या बाबतीत काहीलेख येथे दिले आहेत. रा. ग. जाधव म्हणतात, दलित साहित्य असा निळया पहाटे नंतरच्या लख्ख सूर्य प्रकाशात प्रविष्ठ झाले आहे. समकालीन वास्तव आता स्वच्छ उजेडात आले आहे. मुख्य बाब म्हणजे नव्या लेखक, कवींना आत्मविश्वास देणारे, त्यांचा साहित्य निर्मिती विषयक असलेनसले तो न्यूनगंड दूर करणारे, त्यांना सहप्रवाशांची सोबत करणारे तथा आंतरिक, मानसिक अधार देणारे पुरेसे विविधरुपी दलित साहित्य समोर आहे. या परिस्थितीत समकालीन व उदयोन्मुख दलित साहित्यिकांनी साहित्यिक म्हणूनच एक विमुक्त, आत्मनिर्भर भूमिका घेण्यास वास्तवपूर्णतः अनुकूल आहे. या भूमिकेतून डॉ. पंजाब शेरे, यांनी समकालीन

'मराठी साहित्यातील स्त्रीवादी कविता'; शितल सुसरे यांनी 'समकालीन मराठी साहित्य; दलित साहित्यः दलित साहित्य' प्रा. शिवराम गायकवाड यांनी दलित रंगभूमी; डॉ. पदमीनी मदकुंटे; शामा कोलाम बाबत; डॉ. रेश्मा दिवेकर यांनी शिवाजी आंडर ग्रॉउंड इन भीमनगर मोहल्ला, मुस्लीम साहित्य बोल्डकर यांचे; 'आदिवासी कविता' शिवदास पवार यांचा या ग्रंथात समाविष्ट झालेला आहे. यातील डॉ. रेश्मा दिवेकर यांच्या लेखा बाबत म्हणता येईल की, नाटकाचे मुलभूत लक्षणच सहभागधिष्ठीत असते हे आहे. प्रत्येकांने आपला खारीचा वाटा समाजातून उचलणे, यातूनच नाटकाच्या यशाचा कळस गाठता येतो. कोणत्याही सहभागात ज्याने त्याने आपापल्या सीमारेषा आखून घेतल्या आणि त्यांचे उल्लंघन केले नाही म्हणजे सर्व सुकर व सुखद होते.

जातिअंताच्या लठयाची जबाबदारी ही सर्व स्त्रीयांचा आणि दलित बहूजनांची आहे. फक्त दलित किंवा दलित स्त्रियांची नाही हा विचार प्रा. विलास पंडीत यांच्या दलित स्त्रियांचे आत्मकथने यामधून येते.

एकदंरीत समकालीन साहित्यातील आशया सोबतच कथा, कविता कादंबऱ्यांच्या आस्तित्वाचे आस्वादांचे आणि रुपबंधाचे एकत्रित भान जान जो पर्यंत मराठीतील समकालिन साहित्यिकारांच्या साहित्यिक कलाकृतीच्या केंद्रस्थानी येणार नाही, तोपर्यंत तरी वाचकांना समकालीन वास्तवाच्या गोंडस नावाखाली लौकिक वास्तवाचाच रुक्ष तपशिल साहित्यातून म्हणजे कथा, कविता, कादंबरी, नाटकातून वाचावा लागणार आहे. दलित साहित्यातील अपवादात्मक लेखन वगळता आजची मराठी समकालीन लेखनकृती समकालीन वास्तवाच्या रुक्ष आणि कंटाळवाणा तपशिलाच्या वर्तुळात गुरफडून पडली आहे. असे खेदाने म्हणावे लागते.

मराठी साहित्याच्या उज्जवल भविष्यासाठी तरी नव्या समकालीन लेखकांनी साहित्याच्या सर्व प्रकारांचा म्हणजे कथा, कविता, नाटक, आत्मकथने, वैचारिक लेखन, बालसाहित्य आणि कादंबरीचा कालोचित आणि प्रागतिक आकृतीबंध हाताळणे गरजचे आहे. असा प्रयत्न पुढील काळात व्हावे एवढा जरी संदेश या संपादित ग्रंथातून वाचकांना मिळाला. तरी संपादक डॉ. पंजाब शेरे यांचे प्रयत्न फलद्रूप झाले असे म्हणता येईल. वाचक, संपादित ग्रंथाचे स्वागतच करतील यात शंका नाही.

**डॉ. आनंद भंडारे**
**प्राचार्य**
**सरस्वती विद्यामंदीर कला महाविद्यालय, किनवट.**

# संपादकीय मनोगत

'समकालीन मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रेरणा' हा संपादकीय ग्रंथ आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन मराठी साहित्य : स्वरुप अणि प्रेरणा हा मुख्य विषय घेऊन दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय आभासी चर्चासत्र संपन्न झाले.

किनवट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रफुल्ल राठोड, उपाध्यक्ष मा. गंगारेड्डी बैनमवार, मा. नारायणराव सिडाम, सचिव शंकरराव चाडावार, कोषाध्यक्ष जसवंतसिंग सोखी सर्व संस्थेचे पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विविध चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदा, आभासी पध्दतीने घेण्यात आले.

या एक दिवसीय राष्ट्रीय आभासी चर्चासत्राचे अध्यक्ष तथा किनवट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रफुल्ल राठोड होते. उदघाटन मा. जोगेंद्रसिह बिसेन प्र- कुलगुरू स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी केले. बीजभाषण मा. डॉ. केदार काळवणे यांनी केले. तर महाराष्ट्र भाषा सल्लागार समीती सदस्य डॉ. पृथ्वीराज तौर यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. विनोद कुमरे, डॉ. उर्मिला चाकूरकर, डॉ. गणेश मोहिते, डॉ. गणेश चंदणशिवे, मा. प्रकाश त्रिभुवन, डॉ. शंकर विभुते, डॉ. संतोष हंकारे यांनी या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात 'समकालीन मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रेरणा' या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

सदरील चर्चासत्राच्या निमित्ताने संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्याचे जाहीर करण्यात आले. संशोधक, अभ्याक यांच्याकडून शोधनिबंध मागविले. या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण संशोधन पेपर अभ्यासकांनी पाठवून सहकार्य केले. 'समकालीन मराठी साहित्य : स्वरुप आणि प्रेरणा 'संपादकीय संदर्भ ग्रंथासाठी अत्यंत अभ्यासपूर्ण प्रस्तावना सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय, किनवट येथील प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांनी संशोधनात्मक प्रस्तावना लिहिलेली आहे.

आमचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन वानखेडे, संस्थासमन्वयक प्रा. राजकुमार नेम्मानीवार, माजी मराठी विभागप्रमुख प्रा. रामप्रसाद तौर, डॉ. मार्तंड कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. अनिल पाटील, आयक्युएस्सी समन्वयक प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, डॉ. योगेश सोमवंशी, डॉ. आनंद भालेराव, डॉ. जी. बी. लांब, प्रा. ममता जोनपेल्लीवार, डॉ. प्रज्ञा घोडवाडीकर, डॉ. शुंभागी दिवे, प्रा. आम्रपाली हटकर, प्रा.

किशन मिराशे, प्रा. विजय खूपसे, प्रा. सुलोचना जाधव, प्रा. प्रल्हाद जाधव, डॉ. विजया खामनकर, प्रा. दयानंद वाघमारे, प्रा. जनार्दन काकडे कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र धात्रक, सौ. यमुना कुमरे यांचे मनःपूर्वक आभार.

या संपादकीय ग्रंथासाठी संशोधन पेपर पाठविणा-या सर्व अभ्याक, लेखक यांचेही आभार व्यक्त करतो. या संदर्भ ग्रंथासाठी अत्यंत सुरेख मुखपृष्ठ साकारणारे आमचे स्नेही डॉ. राजेश गं. उंबरकर यांनी हे पुस्तक सुंदर बनविले आहे. सिध्दी पब्लिकेशन हाऊस, नांदेडचे प्रकाशक सौ. पल्लवी शेटे यांचेही विशेष आभार, हे पुस्तक प्रकाशित करीत असतांना ज्यांनी, ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील हीच अपेक्षा व्यक्त करतो.

**धन्यवाद !**

**संपादक,**

**डॉ. पंजाब लक्ष्मण शेरे**

प्रमुख, मराठी विभाग

बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट

# Guidelines for Submission of Manuscript

**1. COVERING LETTER FOR SUBMISSION:**

**DATE: ____________**

**To,**
**THE EDITOR,**
WIPRJ,
Nanded.

Subject: Submission of the article with the title ……………………………………………

……………………………..……………………………………………………………...…….

**DEAR Editor,**

Please find my submission of article for possible publication in your journal.

I hereby affirm that the contents of this manuscript are original. Furthermore it has neither been published elsewhere fully or partly, nor itis under review for publication anywhere.

I affirm that all author(s) have seen and agreed to the submitted version of the manuscript and their inclusion of name(s) as co-author(s).

Also, if our/my manuscript is accepted, I/We agree to comply with the formalities as given in the journal and you are free to publish our contribution in your journal.

**Name and Sign of Author/Authors**
Designation:
Affiliation with full address & Pin Code:
Residential address with Pin Code:
Mobile Number (s):
Landline Number (s):
E-mail Address:
Alternate E-mail Address:

**2. INTRODUCTION:** Manuscript must be in British English prepared on a standard A4 size paper setting. It must be prepared on a single space and single column with 1" margin set for top, bottom, left and right. It should be typed in 12point Times New Roman Font (English Article) and 16 point in DVB-TT Surekh in Pagemaker (Marathi / Hindi Article).

**3. MANUSCRIPT TITLE and HEADINGS:** The title of the paper should be bold capital. All the headings should be bold.All sub-headings should have also bold.

**4. AUTHOR(S) NAME(S) and AFFILIATIONS:** The author(s) full name, designation, affiliation(s), address, and email address should be there.

**5. ABSTRACT:** Abstract should be in fully italicized text, not exceeding 250 words. The abstract must be informative.

**6. KEYWORDS:** Abstract must be followed by list of keywords, subject to the maximum of five.

**7. FIGURES and TABLES:** These should be simple, centered, separately numbered and self-explanatory, and titles must be above the tables/figures. Sources of data should be mentioned below the table/figure.

**8. REFERENCES:** The list of all references should be alphabetically arranged. It must be single spaced, and at the end of the manuscript. The author(s) should mention only the actually utilized references in the preparation of manuscript and they are supposed to follow **Harvard Style of Referencing**.

# Review Process

Each research paper submitted to the journal is subject to the following reviewing process:

1. Each research paper/article will be initially evaluated by the editor to check the quality of the research article for the journal.
2. The articles passed through screening at this level will be forwarded to two referees for blind peer review.
3. At this stage, two referees will carefully review the research article, each of whom will make a recommendation to publish the article in its present form/modify/reject.
4. The review process may take one/two months.
5. In case of acceptance of the article, journal reserves the right of making amendments in the final draft of the research paper to suit the journal’s standard and requirement.

# *Worldwide International* Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed Referred)

**(ISSN - 2454 7905)**

**COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM**

**Date:**

**TO,**
**THE PUBLISHING EDITOR,**
**Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred),
**Nanded.**

**SUBJECT: COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM**
**(The article cannot be published until this copyright authorization agreement is received by the Editor)**

## DECLARATION

I/We …………………………………………………………………………………………………………... the

author/authors of the paper titled……………………………………………………………………………..

…………………………………………………………………………………………………………………authorize

you to publish the above mentioned article **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed)

**I/We hereby declare that:**

1. This article authored by me/us is an original and genuine research work. It does not infringe on the right of others and does not contain any libelous or unlawful statements. It has not neither been submitted for publication nor published elsewhere in any print/electronic form.
2. I/We have taken permission from the copyright holder to reproduce the matter not owned by me and acknowledged the source.
3. I/We permit editors to publish the said paper in the journal or in any other means with editorial modification, if any.
4. I/We assign all the copyright of this article to the journal, and have not assigned any kind of rights for its publication to any other publisher(s).
5. I/We agree to indemnify the Editors, **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred) against all claims and expenses arising from any breach of warranty on my/our behalf in this agreement.
6. In case of a paper by multi-authored article, I/corresponding authors have obtained permission to enter into agreement and assign copyright from all the co-authors, in writing and all the co-authors have thoroughly read and agreed with above warranties and authorization.
7. All disputes subject to jurisdiction of Nanded court only.

**Name** : ……………………………………………………………………………..

**Official Address** :……………………………………………………………………………..

……………………………………………… **Pin** …………………..

**e-mail id** :……………………………………………………………………………..

**Mobile and Phone No.** : ……………………………………………………………………………..

**Signature of the Author(s)** : ……………………………………………………………………………..

# *Worldwide International* Inter Disciplinary Research Journal
## (A Peer Reviewed Referred)
## (ISSN 2454 7905)



**Dr. Rajesh G. Umbarkar**

House No.624 - Bela Nagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India -Maharashtra)
**Phone :** +91 9623979067 **Email :**umbarkar.rajesh@yahoo.com / Shrishprakashan2009@gmil.com
**www.wiidrj.com**


**Dear Editor,**
I wish to be an Annual Member and agree to abide by your rules and regulations.
1. Name in Full :______________________________

2. Nationality: ______________

3. Address for Correspondence: ______________________________

______________________________

______________________________

Phone (STD code): ______________ Mobile No : ______________

4. Name of the College/Employer : ______________________________

______________________________

5. Present Position/Designation: ______________________________

6. Email Address: ______________________________

**Date:** **(Signature of the applicant)**

**Place: Stamp Seal:**

**ANNUAL SUBSCRIPTION RATES:**

| | **Domestic** | **International** |
|---|---|---|
| **Individual** | **Rs. 1500** | **$ 150** |
| **Institutional** | **Rs. 1500** | **$ 150** |

<u>**Director**</u> **: Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

Subscriptions must be sent by Demand Draft drawn on any Nationalized Bank at Nanded, in favour of **Mrs.Pallavi Laxmanrao Shete** Subscription can also be made by depositing cash or electronic transfer in our bank account.

Name of the Bank : **State Bank of India**,**Branch – Taroda Naka Dist**. NANDED. (MH., India.)
IFSC Code : **SBIN0016667**
Branch Code : 16667
Account Number : **20286425949**

# :: अर्पण ::





थोर समाज सुधारक स्मृतीशेष बळीराम पाटील व किनवट शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्मृतीशेष उत्तमराव राठोड साहेब यांच्या पावन स्मृतीना आदरपूर्वक अर्पण !!

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आणि किनवट शिक्षण संस्थेचे, नॅक पुर्नमूल्यांकित
बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट

स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठी विभागाच्या वतीने



# एकदिवसीय राष्ट्रीय आभासी (ऑनलाईन) चर्चासत्र

गुरूवार दि. २० जाने. २०२२

## "समकालीन मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा"



:: उद्घाटन सत्र सकाळी ठीक : ११ ते १२ ::

कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा. प्रफुल्ल राठोड, अध्यक्ष, कि.शि.स.किनवट
उद्घाटक : मा.जोगेंद्रसिंह बिसेन, प्र.कुलगुरू, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड
बीजभाषक : मा.डॉ. केदार काळवणे, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
प्रमुख अतिथी : प्रा.डॉ. पृथ्वीराज तौर, भाषा, वाड्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड
सदस्य,महाराष्ट्र भाषा सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन

**सत्र पहिले : १२ ते १ समकालीन मराठी साहित्य :आदिवासी व स्त्रीवादी साहित्य**
शोधनिबंधक वाचक : डॉ. उर्मिला चाकूरकर, प्रसिद्ध लेखिका, पैठण
प्रा.डॉ. विनोद कुमरे, प्रसिद्ध विचारवंत, मुंबई.

**सत्र दुसरे : १ ते २ समकालीन मराठी साहित्य : कथा आणि कविता**
शोधनिबंध वाचक :- प्रा.डॉ. अरूण कुलकर्णी, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद , प्रा.डॉ. गणेश मोहिते, प्रसिद्ध साहित्य समीक्षक,बीड , प्रा.डॉ.संतोष हंकारे, राणीसावरगाव

**सत्र तिसरे : २ ते ३ समकालीन मराठी साहित्य : कादंबरी आणि नाटक**
शोधनिबंध वाचक : प्रकाश त्रिभुवन, प्रसिद्ध नाटककार,औरंगाबाद , प्रा.डॉ. शंकर विभुते, प्रसिद्ध कथाकार नांदेड

**सत्र चौथे : ३ ते ५ समारोप समारंभ**

अध्यक्ष : मा. श्री. नारायणराव सिडाम, उपाध्यक्ष, कि.शि.सं.कि
प्रमुख मार्गदर्शक: मा. प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, प्रसिद्ध विचारवंत, औरंगाबाद
प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे,प्रमुख,लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ, मुंबई
प्रमुख उपस्थिती : मा.श्री. गंगारेड्डी बैनमवार, उपाध्यक्ष, कि.शि.सं.कि.
मा.श्री. शंकरराव चाडावार,सचिव, कि.शि.सं.कि.
मा.श्री. जसवंतसिंग सोखी, कोषाध्यक्ष, कि.शि.सं.कि.

:: विनित ::

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अनिल पाटील | डॉ. सुरेंद्र शिंदे | डॉ. गजानन वानखेडे | प्र.राजकुमार नेम्मानीवार | डॉ. एस.के. बेंबरेकर |
| पर्यवेक्षक | IQAC समन्वयक | उपप्राचार्य | संस्था समन्वयक | प्राचार्य |

**::तांत्रिक सहाय्य :**
प्रा.डॉ. योगेश सोमवंशी,संगणकशास्त्र, विभागप्रमुख
बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

**::संयोजक : :**
प्रा.डॉ. पंजाब शेरे ,मराठी विभागप्रमुख
बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | समकालीन मराठी वैचारिक साहित्यातील प्रेरणा | प्रा. सौ. विलिना शंशाक इमानदार | 01 |
| 02. | साठोत्तरी समकालीन मराठी ग्रामीण कथांतील काही आकलने | प्रा. डॉ. जगतात यु. एम. | 07 |
| 03. | समकालीन मराठी साहित्य : दलित स्त्रियाची आत्मकथने' | प्रा. विलास कचरू पंडित | 10 |
| 04. | समकालीन मराठी बालसाहित्य : बालकथा | प्रा. सविता भावा धनवडे | 17 |
| 05. | आदिवासी कविता : इतिहास आणि जीवन | प्रा. शिवदास दगा पवार | 20 |
| 06. | मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टीक्षेप | शेख शफी बोल्डेकर | 25 |
| 07. | समकालीन साहित्य : नाटक (शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहला) | प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश | 31 |
| 08. | समकालीन मराठी साहित्यात नंदा खरे यांचे योगदान | प्रा. अभिजीत इंगळे | 34 |
| 09. | समकालीन मराठी कवयित्री : डॉ. प्रेरणा व्यव्हारे | डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव | 37 |
| 10. | बिलामत कांदबरीतील उत्कृष्ट व्यक्तीरेखा : शामा कोलाम | डॉ. पदमीनी मदकुंटे | 41 |
| 11. | समकालीन मराठी साहित्य : नव्वदोत्तर महानगरीय कविता | प्रा. चैताली कोळी | 44 |
| 12. | समकालीन मराठी साहित्य : दलित रंगभूमी | प्रा. शिवराम गायकवाड | 51 |
| 13. | चळवळीतील स्वानुभवाची अभिव्यक्ती म्हणजे आम्ही लढलो-आम्ही घडलो | प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने | 58 |
| 14. | समकालीन मराठी साहित्य : दलित साहित्य | शितल  सुसरे | 62 |
| 15. | **परिवर्तनांची मूल्य पेरणारा काव्यसंग्रह : सखी जागी हो !** | प्रा. डॉ. पंजाब शेरे | 67 |

# समकालीन मराठी वैचारिक साहित्यातील प्रेरणा

**प्रा. सौ. विलिना शशांक इनामदार**

संशोधक - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

(मराठी विभाग) अे/१५, रम्यनगरी हौ. सोसायटी, सुहाग मंगल कार्यालयाशेजारी, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

**प्रस्तावना :**

वैचारिक साहित्यातून मिळणाऱ्या विचारांची होणारी अभिव्यक्ती वाचकांच्या ज्ञानात भर घालत असते. शास्त्रीय संशोधनातून केल्या जाणाऱ्या प्रयोगांनी समाजाला आरोग्य प्राप्ती होते तर साहित्यातील संशोधनातून बाहेर पडणाऱ्या ज्ञानाने समाजाला वैचारिक दृष्टी लाभते.

समकालीन साहित्य या संज्ञेचा अर्थ व्यापक आहे. प्रथमतः समकालीन म्हणजे त्या त्या कालविषयक साहित्य कृतींचा अभ्यास इतका तो संकूचित नसून "तत्कालीन साहित्यावर समकालीनतेची छाप पडलेली असते" (कुलकर्णी मदन १९९३ पृष्ठ ३२) समकालीनता त्या साहित्य कृतीला नाविन्य प्राप्त करून देते. ते एक मौलिक तत्व आहे, ते त्या त्या कलाकृतीतील नवता, आकर्षकता व स्थैर्य प्राप्त करून देते. तत्कालीन साहित्याला आपल्यात सामावून घेण्याची गतिशीलता समकालीनतेत असते.

"समकालीन सहित्यात आधुनिकता असते. आपल्या भोवतालच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती; घटना, प्रसंग, जीवन - जाणिवा, यांचे चित्रण ज्या साहित्यांत केलेले असते त्याला समकालीन साहित्य म्हणावे. असे साहित्य समकालीन वाचकांचे सांस्कृतिक आणि सामाजिक वाङ्‌मयीन आत्मचरित्रच असते. समकालीन साहित्य समकालीन समाजाशी निगडीत असते. वाचकांचे अशा साहित्याशी जवळचे नाते असते. म्हणून असे साहित्य समकालीन समाजाचे आत्मचरित्र असते". (कुलकर्णी, मदन १९९३ पृष्ठ ३५)

प्रस्तूत शोधनिबंधात डॉ. मिलींद बोकील आणि दिलीप कुलकर्णी यांच्या समकालीन साहित्याचा विचार करण्यात आलेला आहे. "बरेचदा कधी कधी नकळतपणे योगायोगाने साहित्यात नाविन्य निर्माण होते आणि तशी कलाकृती वाचकप्रिय ठरली तर त्या प्रकारच्या कलाकृती लिहिण्याची लेखकाची प्रवृत्ती वाढीला लागते. काही समान पण विशिष्ट प्रवृत्ती व प्रेरणांनी प्रभावित होवून विविध प्रकृतीच्या लेखकांच्या साहित्य कृतीत समान वैशिष्टये येण्याने साहित्यांत प्रवाह निर्माण होतात. (कुलकर्णी, मदन १९९३ पृष्ठ ३८) या दोनही लेखकांच्या लेखनात १९८१ ते २०१८ या ३७ वर्षांच्या कालखंडातील पर्यावरणवादी विचार प्रवृत्ती दिसून येतात. मानवाच्या भोवतालच्या पर्यावरणाचा लेखाजोगा, पर्यावरणातील बदलती परिस्थिती, पर्यावरणीय समस्या, त्यावरील उपाययोजना, कृती किंवा जागतिक स्तरावर होणारा कृतींचा परिणाम, त्या त्या देशांनी अवलंबिलेली तात्कालिक तत्वप्रणाली व कृतीप्रणाली प्रत्यक्ष भेटीतून समजावून घेवून त्या त्या विचारांचे सामाजिक व पर्यावरणीय अंगाने केलेले विवेचन पर्यावरणीय क्षेत्रात मोलाचे योगदान देतात.

"साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध अतिशय निकटचा आहे. कोणत्याही प्रकारच्या साहित्यकृतीवर त्या त्या कालखंडातील समाज व संस्कृतीची छाप स्पष्टपणे पडलेली असते". (धोंगडे अश्विनी १९९३ पृष्ठ ९०) आघाडीचे समाज शास्त्रज्ञ लेखक डॉ. मिलिंद बोकील व पर्यावरणतज्ञ श्री. दिलीप कुलकर्णी यांच्या साहित्यावर १९८१ ते २०१८ या कालखंडातील समाज व संस्कृतीची छाप पडली आहे हे शोधून काढून हे साहित्य प्रेरणादायी कसे आहे या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.

दिलीप कुलकर्णींचे जन्मसाल १९५८ तर डॉ. बोकीलांचे १९६० दोघंही लेखक. व्यावसायिक शिक्षण अभियांत्रिकीची पदविका संपादन केलेले. आपल्या साहित्यात गीता, उपनिषदे, दासबोध यातील साराचा संदर्भ समान पातळीवर देतात. मिलिंद बोकिलांच्या लेखनाची सुरूवातव याच्या एकविसाव्या वर्षी म्हणजेच १९८१ साली "पुन्हा सुर्य आणि पुन्हा प्रकाश" किर्लोस्कर मासिकातून कथेच्या रूपातून साहित्यात भर घालते तर दिलीप कुलकर्णी आपलं पहिलं पुस्तक "निसर्गायण" १९८६ साली वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी लिहून हाता वेगळं करतात. दिलीप कुलकर्णींच्या निसर्गायण (१९८६) हसरे पर्यावरण (२००८), दैनंदिन पर्यावरण (२०१०), सम्यक विकास (१९९८) अभ्यासासाठी निवडले तर डॉ. मिलिंद बोकील यांचे वैचारिक व सामाजिक साहित्य समुद्रापारचे समाज (२००८) आणि गांधी, विनोबा, जयप्रकाश (२०१८) अभ्यासासाठी निवडले आहे.

दोघांच्याही वैचारिक साहित्याची शिर्षके पर्यावरण, निसर्ग, निसर्गातील घटकांशी अन्योन्य संबंध प्रस्थापित करतात. आधुनिक शेती पद्धतीमधे खतांचा व जंतूनाशकांचा होणारा वाढता वापर दिलीप कुलकर्णी "निसर्गायण" मधे शेतकऱ्यांच्या 'मीठ फुटणं किंवा कोड फुटणं स्थानिक भाषेत सांगतात. (कुलकर्णी दिलीप १९९२ पृष्ठ ११५) तेव्हा जमिनीच्या क्षारीकरणाच्या समस्या समजतात. "हयाच आधुनिक शेतीतील हरित क्रांतीचे दुष्परिणाम ब्राझीलमधे १९८० च्या दशकात दिसायला लागले. त्यावर उपाय म्हणून तेथे आता अनुसरलेली नैसर्गिक शेती पद्धती स्वतः मिलिंद बोकील प्रत्यक्षात अनुभवत होते व त्यातील उपयोगिता आपल्या लेखनातून समाजासमोर आणत होते. (बोकील, मिर्लींद २००८ पृष्ठ १३९) सँट्रो इकॉलॉजिको ह्या संस्थेच्या ब्राझीलच्या दक्षिणेच्या रिओ ग्रँड दोसूल या राज्यात शेतकऱ्यांच्या स्थानिक असोसिएशनने आयोजित केलेल्या शिबिराचे सहभागी सदस्य म्हणून ते अनुभवत होते. जे काम नैसर्गिक शेतीतून पुढे येते. त्याच्या सर्वेसर्वा जोसेबाई भारतात दोन-तिनदा येवून दक्षिण भारतातील नैसर्गिक शेतीतून स्फूर्ती घेवून ब्राझीलमधे काम करतात तेव्हा या विषयातील प्रत्यक्ष कृती किती मोलाची आहे हे समजते. "जागे झाले ब्राझीलचे शेतकरी" या मथळ्याचा साप्ताहिक सकाळ दिवाळी अंक या माध्यमातून आपल्यापर्यंत बोकील विचार पोहोचतात.

"माणसाच्या कृतीमुळे पर्यावरणाचं काय होतय याकडे माणसाचं लक्षच नाहिये. स्वतःच्या फायद्यासाठी माणूस निसर्गाचा विध्वंस करत चालला आहे. माणूस हजारो लाखो वर्षांची संपदा उधळून लावत आहे. इशावास्य उपनिषदातील श्लोक

**''ईशावास्यंइदम् सर्वम यत्किंचं जगत्यांजगत ।**

**तेन त्यक्तेन भुन्जीय मा गृधःकस्य स्विद्थनम ।** (कुलकर्णी दिलीप २००८, ४१)

उपनिषद्कार ऋषी म्हणतात ह्या जगतात जे जे म्हणून काही आहे, ते परमेश्वरानं व्यापलेलं आहे. त्या सर्वांत परमेश्वर आहे आणि म्हणून ह्या जगातलं तुझ्या वाटयाला जे काही आलेलं आहे ते तू अवश्य भोग, पण दुसऱ्याची कोणतीही गोष्ट लुबाडून घेवू नकोस हा श्लोक म्हणजे पर्यावरणाच्या विचारांचा गाभाच आहे असं कुलकर्णी "हसरे पर्यावरण" या ग्रंथात नमुद करतात तर मिलिंद बोकील हाच ईशोवास्योपनिषदाच्या ओळीतला समाजवाद व साम्यवाद ह्याच श्लोकाचा संदर्भ देवून (बोकील मिलिंद, २०१८, १९) गांधी, विनोबा व जयप्रकाश नारायण या तिनही समाज परिवर्तकांवर लिहिलेल्या वैचारिक लेखनातून स्पष्ट करतात. या जगात जे सगळं हलतं चालतं त्यावर ईश्वरानं पाघंरूण घातलेलं आहे. म्हणजेच त्यात ईश्वर भरून राहिलेला आहे. हे समजून त्याचा मोह सोडून तू उपभोग घे, मात्र कोणाच्याही धनाचा अपहार करू नकोस.

याचाच अर्थ ईशावास्योपनिषदाच्या मार्फत पर्यावरणाच्या विचारांचे मर्म दोघही लेखक आपल्या लेखणीतून सांगायचा प्रयत्न करतात. समकालीन विचारांचे समकालीन साहित्यातून दिसणारे हे पडसाद प्रेरणादायी नक्कीच आहेत.

"वाढत्या गरजा, वाढते उद्योगधंदे, नफा, कच्चामाल कोठून येणार? निसर्गातूनच. ह्या संदर्भासाठी महाभारतातील श्लोकांचा संदर्भ देताना कुलकर्णी म्हणतात. "न जातु कामा कामानाम् उपभोगेन शाम्यति। हविषा कृष्ण वर्त्मेव भूय पवाभिवर्धते।" अग्नी पेटलेला आहे तर त्यात कोळसा टाकला तर आग वाढणार तसेच उपभोग घेतल्यानं उपभोगांची इच्छा वाढतच जाणार" (कुलकर्णी, दिलीप २००८, ५६)

ह्याच विचारांच्या साम्य स्थळांचा बोकील यांच्या लेखणीने टिपलेले वाक्य म्हणजे स्वतः महात्मा गांधींचे त्यांनी लिहिलेले विचार "प्रत्येक वस्तू तयार करायला पृथ्वीवरचा कच्चा माल, खनिजं, उर्जा, माणसांचे श्रम, अन्न अशा गोष्टी खर्ची पडत असतात आणि त्या त्या प्रत्येक वेळी सृष्टीची काही ना काही तरी हानी होतच असते. कोणतीही नवीन वस्तू आकशातून तर पडत नाहीच. आताच पृथ्वीवर अब्जावधी वस्तू आहेत आणि प्रत्येक क्षणाला तितक्याच नवीन निर्माण होतायत. या उपभोगाला काही सीमा आहे की नाही". (बोकील मिलिंद २०१८, २९) हा प्रश्न गांधीजी विचारतात. ह्याच विचाराचे बीज बरोबर घेवून जाणारे कुलकर्णी महात्मा गांधींनी सांगितलेले एक महत्त्वाचे तत्व म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, इंधन ह्या आणि अशा काही मुलभूत गरजा माणसाला रहाणारच. त्या टाळता येणारच नाहीत. पण तरीही त्यांना मर्यादा आहे. गरजा अमर्याद वाढल्या तर त्या पुऱ्या होणं शक्यच नाही. "निसर्ग हा माणसांच्या गरजांसाठी पुरेसा आहे पण हाव भागवण्यासाठी मात्र नाही. (कुलकर्णी दिलीप २००८, ५५)

औद्योगिक क्रांतीनंतर दोन-तिनशे वर्षात पर्यावरणाचा माणसाने विध्वंस केला. भविष्याविषयी त्याने चिंता निर्माण करून ठेवल्या आहेत असं म्हणणारे कुलकर्णी आशावादी होतात. ह्या त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घ्यायच्या "मिणमिणती पणती अंधाराला भित नाही. ती आपल्या कुवतीनुसार प्रकाश देते" अंधार नष्ट होतो. आपल्यालाही तसेच वागावे लागेल. हा आशावाद आपण घेतला पाहिजे. "पर्यावरणाच्या वाढणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून दैनंदिन जीवनात आपण बदल करणं महत्त्वाचं आहे. काय करायचे, काय टाळायचे याचा विचार करून "पर्यावरणीय दृष्टी' अंगी बाणवून प्रत्यक्ष शंभर कृति - कणिकांच्या माध्यमातून ते वाचकांमधे आत्मविश्वास निर्माण करतात. पर्यावरणासाठी मला हे सहज करायला जमेल असा पुस्तक रूपाने आत्मविश्वास निर्माण करतात" आपल्याला कार्यप्रवृत्त करतात. छोटया छोटया गोष्टीतून पर्यावरण आपल्याला वाचवता येतं. त्या खोलीत घरातील कोणी व्यक्ती नाही तिथला दिवा बंद हे ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मार्गारेट थंचरच्या बाबतीत घडलेल्या प्रसंगातून आपण बोध घ्यावा. पत्रकार मुलाखत घेण्यासाठी आले असताना आतल्या खोलीतील काम आटपून थॅचरबाई बाहेर आल्या. आतल्या खोलीतला दिवा बंद करून विजेचा अपव्यय टाळायला पाहिजे ही प्रेरणा घेवून (कुलकर्णी दिलीप २०१०, २०)

"दैनंदिन पर्यावरण" या वैचारिक पुस्तकात एडमंड बर्कचे एक वाक्य. वाचकांना अशीच प्रेरणा देवून जाते. "समस्या जगड्व्याळ आहे म्हणून घाबरून जावू नका नि निष्क्रियही बनू नका. आपण फारच थोडं काही करू शकतो असं म्हणून, जो काही करत नाही तो, ती सर्वात मोठी चूक करतो. (कुलकर्णी दिलीप २०१०, १५) म्हणून पर्यावरण वाचविण्यासाठी त्याचं संवर्धन करण्यासाठी आपल्या पासून सुरूवात करूया.

आपल्या चैनीसाठी फर्निचर सजावट करण्यासाठी झाडांचा घेतलेला बळी वापरणाऱ्याच्या लक्षात येतच नाही हे जेंव्हा कुलकर्णी दैनंदिन पर्यावरण पुस्तकात (कुलकर्णी दिलीप २०१०, २५) प्रदिपादन करतात तेव्हा पर्यावरणाबद्दल

कळकळ असणाऱ्या प्रशिक्षणार्थी म्हणून झिम्बाब्वे येथे आमंत्रित केल्या गेलेल्या बोकीलांनी केलेल्या झिम्बाब्वेमधे जेव्हा ब्रिटिशांचे राज्य होते तेव्हा काळ्या लोकांना रेल्वेच्या सेकंड व फर्स्ट क्लासमध्ये अर्थातच प्रवेश नव्हता. त्यात भारतीय सुद्धा आलेच. १९५० नंतर थोडा मोकळेपणा आला आणि सेकंड क्लासमध्ये प्रवेश मिळू लागला. फर्स्ट क्लास गोऱ्या लोकांसाठीच होता. तो डबा मिलिंद बोकील यांना बघण्याची उत्सुकता होती. ज्या रेल्वे डब्यातून गांधीजींना धक्के मारून बाहेर काढले होते. झिम्बाब्वे नॅशनल रेल्वे पूर्वीची 'होडेशियन नॅशनल रेल्वे' होती. रेल्वेची आतली सजावट खानदानी भारदस्त होती. हे सर्व लाकूड उत्तम तेलपाणी दिलेले होते. रेल्वे बांधकामासाठी ब्रिटिशांनी सर्वत्र प्रचंड जंगलतोड केली. या इतिहासाची प्रचिती आली असं मिलिंद बोकील म्हणतात. (बोकील, मिलींद २००८, ८३)

सम्यक विकास म्हणजे सुयोग्य विकास हा बौद्ध तत्वज्ञानातला हा 'सम्यक' लोकप्रिय शब्द आहे. सम्यक प्रतिमानातील शेती ही निसर्गाच्या मर्यादेच्या आत होणारी असेल. जमीन, तिच्यातील जीवजंतू जिवंत राहण्यासाठी त्यांना सेंद्रिय द्रव्याच्या रूपानं त्यांचं अन्न देवून शारीरिक श्रम वापरून इंधनावरचं अवलंबित्व टाळणारी इंधनाचं संधारण करणारी शेती. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देवून आधिकाधिक लोकांना उपजीविका उपलब्ध करून देणारी, संकरित बियाणांऐवजी निसर्गात सुस्थापित झालेल्या स्थानिक बियाणांचा वापर करणारी अशा अनेक सम्यक विकासाच्या नोंदी वाचायला मिळतात. (कुलकर्णी दिलीप १९९८, ७०) ह्याच विचारांच्या समपातळीतील महात्मा गांधींनी प्रतिपादिलेले विचार मिलींद बोकील व्यक्त करतात व प्रेरणा देतात. "गांधीजींच्या स्वप्नातला भारत हा खेडयांमध्ये वसलेला भारत होता. कृषिकेंद्रित, ग्रामोद्योगाधारित, पशुपालक, स्वयंशासित, स्वावलंबी, निर्मळ आणि आपले गाव म्हणजे 'एक कुटुंब मानणाऱ्या पर्यावरण स्नेही समूहांची गांधींनी कल्पना केली होती" (बोकील, मिलींद २०१८, ४८)

अमेरिकेमध्ये न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो, लॉस एंजल्स अशी मोठ मोठी शहरे असली तरी बहुसंख्य लोक लहान टुमदार गावांमध्ये राहतात. एका बाजूने ही गावे जागतिक अर्थव्यवस्थेचा हिस्सा असली तरी आपल्या कारभाराच्या बाबतीत स्वयंपूर्ण असतात. तिथले पर्यावरण तर निसर्गरम्य असतेच पण गावांची शाळा, दवाखाना, वाचनालय हे स्वतःचा कारभार स्वयंशिस्तीने आणि सभ्यपणाने चालवत असतात. मुख्य म्हणजे तिथले जीवन हे बऱ्यापैकी स्वास्थ्यपूर्ण असते. गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना ही खरे तर अमेरिकेमधल्या लहान गावांनीच साकार झालेली आहे. मुख्य त्यांच्या विचारांचा गाभा स्वस्थ आणि समृद्ध वसतिस्थानांची उभारणी गरजेचे आहे हा आहे. शहर का खेडी हा मुद्दा महत्त्वाचा नाही. शांत, सभ्य, समृद्ध वसतिस्थानांमधे माणसे सभ्यतेने, सौजन्याने, संपन्नतेने जगतील. जिथले वातावरण स्वच्छ, निरोगी आणि प्रदुषण मुक्त असेल, जिथे सर्वांना सहजपणे आपली उपजीविका चालवता येईल, निसर्गाचे सान्निध्य आणि सोयीसुविधांची समानता असेल. (बोकील, मिलींद २०१८, ४९)

उद्योगधंद्यांना विकेंद्रित करणं, हस्तोद्योग, कुटिरोद्योगाला महत्त्व उर्जेची बचत तसेच घराजवळ उद्योग, शेतीही घराजवळ प्रदुषण नाही हा अपेक्षित दिलासा कुलकर्णी आपल्या "सम्यक विकास" या पुस्तकात विस्ताराने मांडतात. "आयुष्य नासवून टाकणाऱ्या अशा औद्योगीकरणाला सम्यक् प्रतिमानात स्थान नाही. उद्योग आहेत पण ते छोटे, कुटिरोद्योग आहेत सोपं, सहज तंत्रज्ञान, माणसाचं कौशल्य आणि शक्ती ह्यांचाच केवळ वापर कच्चामाल स्थानिक आणि उत्पादनानं गरजा भागणार स्थानिकच. (कुलकर्णी दिलीप १९९८, ८४)

अशाप्रकारे गांधीजींच्या स्वप्नातील भारत व त्यातील विकासाची प्रतिमान दिलीप कुलकर्णी विस्ताराने सम्यक विकासाच्या रूपातून वर्णन करतात. म्हणजेच समकालीन साहित्यामध्ये जरी गांधींचे विचार जुने वाटत असले तरी "गांधी हे केवळ सत्य व अहिंसा या दोन कोनातूनच समजून घेता येणार नाहीत. सत्य, अहिंसेबरोबरच अस्तेय, ब्रष्चर्य, अपरिग्रह, शरीरश्रम, अस्वाद, भयवर्जन, सर्व धर्म समानता, स्वदेशी आणि स्पर्श भावना ही त्यांची ११ व्रते समजून घ्यायला हवीत" गांधी, विनोबा व जयप्रकाश ही व्यक्तिमत्व अफाट आहेत. त्यांच्यावर बरंच साहित्यही उपलब्ध आहे. तरीही नव्या साहित्याची गरज भासते. कारण हे महापुरूष प्रत्येक वेळी नवं काही तरी देतात (गणेश कदम म.टा. संवाद - २०१८ पृष्ठ ६)

सम्यक विकास, गांधीजींच्या स्वप्नातील भारत, भारतापासून कोसोदूर अंतरावरील कोस्टारिकाला अमेरिकेतल्या रॉक फेलर फाऊंडेशनने जागतिक विकासाचे प्रश्न यावर अभ्यासक्रमांत देशविदेशातून गेलेल्या प्रशिक्षणार्थीमधे मिलिंद बोकिलांना आमंत्रित केले जाते. या देशात पर्यटन उद्योगाला महत्त्व दिलं गेलं. निसर्ग पर्यटन, जंगल सफारी, नौकानयन, अरण्यातला मुक्काम, मासेमारी, ट्रेकिंग, ज्वालामुखी भेट, गिर्यारोहण, घोडेस्वारी, पक्षी व प्राणी निरीक्षण अशा प्रकारच्या पर्यटनाला प्रोत्साहन देणाऱ्या देशात १९९४ साली साडे सात लाखांपेक्षा अधिक परदेशी पर्यटक भेट देतात. सर्वात जास्त परकिय चलन मिळवून देणारा व्यवसाय, शहरवासीय गोंगाटाला व प्रदुषणाला कंटाळून या देशात पर्यटनाला येतात. (बोकील मिलिंद २००८, ३९ - ४१) अशा पर्यटनातून देशाला पन्नास कोटी अमेरिकन डॉलर्सच्या वर उत्पन्न मिळाले. परंतू पर्यटनाचे इतर वाईट परिणाम मुख्यतः प्रदुषणाने प्लॅस्टिकचा कचरा, हॉटेलचे सांडपाणी सगळे खाडीतच टाकले जाते. एवढे असूनही लेखकाला हा व्यवसाय सभ्य आणि सुसंस्कृत वाटला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव जास्त चांगली असल्याचे जाणवले.

अशा या प्लॅस्टिकच्या वापरावर "दैनंदिन पर्यावरण" या पुस्तकाच्या रूपाने दिलीप कुलकर्णी सांगतात. प्लॅस्टिक हा आध्यात्मिक पदार्थ आहे. एकदा तो तयार झाला की झालाच. तो नाहीसा होत नाही तो विघटनक्षम नाही म्हणून त्याचा वापर टाळणं कमीत कमी करणं हा कृतीवरचा आशावाद आपल्यात जागृक करतात.

**नैन छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।**

**न चैनं क्लेदय न्त्यापो न शोषयति मारूतः।**

ह्या भगवद्गीतेतील श्लोकाचे वर्णन आत्म्याइतकचं प्लॅस्टिकला लागू आहे. कुठल्या शस्त्राने नष्ट करता येत नाही आत्मा जाळून टाकता नाही येत आत्मा, पाण्यामधे तो विरून जावू शकत नाही, वारासुद्धा त्याला नष्ट करू शकत नाही त्याप्रमाणे हे प्लास्टिक (कुलकर्णी दिलीप २०१०, ३९)

जेथे प्लास्टिकचा वापर पर्यटकांकरवी निसर्गाचा घात करतो अशा कोस्टारिकामधे प्रत्यक्ष अनुभव घेणारे मिलिंद बोकील त्यांच्या विचारातून कृतीची अपेक्षा आपल्याकडून करतातच ती वाचकाला समजावी अशी माफक अपेक्षा असतेच.

**निष्कर्ष**

१. समकालीन साहित्यकृतीमधे लेखकांचे विचार त्या त्या काळातील समस्या व त्यांच्यावरील उपाययोजनांवर केंद्रित झालेल्या दिसतात.
२. दोनही लेखकांच्या लेखणीतून पर्यावरणीय जाणीवांचा मागोवा घेतलेला दिसतो.
३. साहित्यकृतींवर तत्कालीन समाजाची व संस्कृतीची छाप पडलेली दिसते.

४. विदेशातील भेटी व प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले विचार प्रेरणादायी

५. उपनिषद, भगवत गीतेतील श्लोकांची चपखल उदाहरणे प्रेरणादायी.

६. सम्यक विकासाच्या संकल्पनेत व्यक्ती, समष्टी, सृष्टीला महत्त्व

७. प्रत्यक्ष कृतीअधिष्ठित विचारांमुळे दोन्ही लेखकांचे साहित्य तत्कालिन काळाला कवेत घेणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. बोकिल, मिलिंद. 'समुद्रापारचे समाज' मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती : जुन २००८ पृष्ठ क्रमांक ३९, ४०, ४१, ८३, १३९

२. बोकिल, मिलिंद. 'गांधी, विनोबा आणि जयप्रकाश' मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस, मुंबई, पहिली आवृत्ती : जून २०१८ पृष्ठ क्रमांक १९, २९, ४८, ४९.

३. कदम, गणेश. 'म.टा. संवाद' ९ डिसेंबर २०१८ पृष्ठ क्रमांक ६.

४. कुलकर्णी, दिलीप. 'निसर्गायण' राजहंस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण जुन १९९२ प्र.आ. ऑगस्ट १९८६ पृष्ठ क्रमांक ११५.

५. कुलकर्णी, दिलीप. 'हसरे पर्यावरण' राजहंस प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती : नोव्हेंबर २००८, पृष्ठ क्रमांक ४१, ५५, ५६.

६. कुलकर्णी, दिलीप. 'दैनंदिन पर्यावरण' राजहंस प्रकाशन, पुणे, बारावी आवृत्ती, जानेवारी २०१०, पृष्ठ क्रमांक १५, २०, २५.

७. कुलकर्णी, दिलीप. 'सम्यक विकास' राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी १९९८ पृष्ठ क्रमांक प्रस्तावना, ७०, ८४.

८. लिंबाळे, शरण कुमार. (संपा) 'मराठी वाङ्.मयातील नवीन प्रवाह' कुलकर्णी मदन, समकालीन साहित्य, मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे प्रथम आवृत्ती ऑक्टोबर १९९३, पृष्ठ क्र. ३२,३८,

९. लिंबाळे, शरण कुमार. (संपा) 'मराठी वाङ्.मयातील नवीन प्रवाह' धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी साहित्य, मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे प्रथम आवृत्ती ऑक्टोबर १९९३, पृष्ठ क्रमांक ९०.

# साठोत्तरी समकालीन मराठी ग्रामीण कथांतील काही आकलन

**प्रा. डॉ. जगताप यु. एम.**
शारदा महाविद्याल, परभणी

समलीन ही संज्ञा मुलतः काळाशी निगडीत आहे. काळाबरोबर असणे म्हणजे समकालीन परंतु काही साहित्याकलाकृती समकालीन नसतानाही त्या समकालीन जीवनाचे प्रतिनिधीत्व करीत असतात. म्हणुनच त्यांना मानवी जीवनाचे समकालीनत्व प्रवाहीत करण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले पहावयास मिळते.

साधारणतः १९४५ पासुनच्या मराठी साहित्याला समकालीन साहित्य म्हटले जाते. १९४५ ते १९६०, १९६० ते १९८० आणि १९८० ते १९९० असे काही ढोबळ मानाने अभ्यासाच्या सोयीसाठी कालखंड पाडले जातात. समकालीन साहित्याची संकल्पना स्पष्ट करताना डॉ. शशिकांत ठकार म्हणतात.

"जे साहित्य परिवर्तनाच्या प्रक्रियला प्रभावित करु शकते. त्या प्रक्रियचे अंगच असते आणि त्या रात्रंदिनीच्या शुध्द प्रसंगाची प्रचीती देते तेच ख-या अर्थाने समकालीन म्हणावे लागेल. ते केव्हाही लिहिलेले असले तरी समकालीन संदर्भातच त्याचा कस लागतो."

वरील विधानातून डॉ. ठकार यांच्या मते समकालीन घटना विचाराचे प्रतिबिंब लावून जसेच्या तसे मानवी भाव भावना, दुःख, वेदना, आशा-आकांक्षा, संघर्ष, मान-अपमान, अस्मिता, शोषण वगैरेचा सहजपणे त्यात अविष्कृत होत असते. असा मतिथार्थ लक्षात येतो.

१९६० ते १९७० या कालखंडातील शंकर पाटील, रा.रं. बोराडे, आनंद यादव, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, सखा कलाल उध्दव शेळके, चंद्रकुमार नलगे अशा अनेक लेखकांनी आपल्या कथांमधून ग्रामीण जीवनातील विविध प्रसंगाचे वास्तव चित्रण केले आहे यापैकी काही कथाकाराच्या कथांचा येथे विचार करता येईल.

स्वातंत्र्य पूर्वकाळातील खेडी, स्वातंत्र्यानंतर काही प्रमाणात बदलली असे मानले जात असले तरी ख-या अर्थाने, या बदलत्या परिस्थितीत खेडयातील समाजमन, सामुहिक जीवन यात फारसा बदल झाल्याचे जाणवत नाही. अर्थकारणात थोडया-फार प्रमाणात बदल झाला परंतु ग्रामीण माणसांच्या जगण्यात, (१९६० ते १९७०) मानपान, आत्मसन्मान, जातियता, रुढी पंरपरा संस्कृती या बाबींवर फारसा परिणाम झलेला दिसत नाही. शंकर पाटील, रा. रं. बोराडे, आनंद यादव यांच्या कथांतून ग्रामीण जीवन प्रकट झालेले आहे. म्हणूनच त्यांच्या कथातुन नातेसंबंध, परंपरा, नैसर्गिक अरिष्ठ यात सापडलेल्या स्त्री जीवनावर प्रभावीपणे प्रकाश पडलेला दिसतो.

उदाहरण घ्यायचे झाल्यास शंकर पाटील यांच्या "वेणा कथेतील भागा, 'सारावण' कथेतील हिरा आणि 'भुजंग' कथेतील जनाई, तर रा.रं. बोराडे यांच्या 'आटापिटा' कथेतील भागा, गाठोडं कथेतील जनाई, 'पीळ,'रुसवा, 'सिमंता' या कथेतील विविध स्त्री व्यक्तिरेखा आणि आनंद यादव यांच्या 'वरातीलचा शालू' कथेमधील अंजना या सर्वच स्त्रियांच्या दुःखाची कारणे वेगवेगळी असली तरी त्यांच्या दुःखाचा केंद्रबिंदू 'दारिद्रय' हाच आहे. शंकर पाटील यांच्या बहुअंशी कथा या ग्रामीण माणसांच्या दुःखाचे, वेदनेचे आणि समस्यांचे चित्रण करणा-या आहेत तर रारं बोराडेच्या कथा नात्या गोत्यातील तणाव, दारिद्रय, असहाय्यता अशा गुंतागुंतीचे ताण तणाव व्यक्त कथा आहेत तसेच आनंद

यादवही ग्रामीण माणसांच्या जीवनातील दु:ख वेदनांचे चित्रण आपल्या कथामधून करतात. म्हणूनच आनंद यादव, शंकर पाटील आणि बोराडे यांच्या अनेक कथा सारख्याच वळणाच्या आहेत असे पाहवयास मिळते.

ग्रामीण संस्कृतीची रचना ही अधिक तर निसर्गसन्मुख असल्यामुळे येथ लोककथा, लोकगीते, सण, उत्सव यांचा पगडा जास्त असतो. यातुनच रुढ झलेल्या प्रथा, परंपरा, संकेत श्रध्दा- अंधश्रध्दा यांना महत्वाचे स्थान प्राप्त होते. एवढेच नव्हे तर या गोष्टी त्यांच्या रक्ता रक्तात इतक्या भिनल्या जातात की, त्यामुळे सत्य-असत्य समजून घेण्याच्या भानगडीत न पडता अशा लोक संकेतावर व लोक रुढीवर ही ग्रामीण माणसे विश्वास ठेवून राहतात. या बाबी दर्शवणारे काही संदर्भ समकालीन साठोत्तरी कथेतून पाहवयास मिळतात. उदा. शंकर पाटील यांच्या 'पोरं' कथेतील सखुबाला मूल नसते पण ज्योतिबाच्या दर्शनाहुन परतणा-या सखुबाला एक बेवारस मूल सापडते तेंव्हा देवच आपल्याला पावला असे वाटून तो त्या मूलाला घरी घेऊन येतो तेंव्हा त्याची आई म्हणते,

"आरं म्हणायचं- तिथ येऊन पुरण-पाळीचा निवद करीत, आमुक येवढं नारळ वाढविन, दस-यास पाहिल्या माळेला शेरभर तूप जाळील"

यातुन ग्रामीण माणसांची श्रध्दा अंधश्रध्दा, शकुन-अपशकुना विषयीच्या त्याच्या दृढ झालेल्या कल्पना दिसून येतात. शंकर पाटील यांच्याच 'सय', 'वळीव', 'भुजंग' या कथेतून तर बोराडे यांच्या 'झाड', 'बुरुज', ' या कथेतुन आणि आनंद यादव यांच्या 'वरातीलचा शालू' या कथांमधून लोकसमजुतीचे बहुआयामी दर्शन घडते.

खेडे आणि तेथील ग्रामीण जीवन म्हटले की, विशिष्ट संस्कृती आपल्या नजरेसमेर साकार होते. खेडयातील माणसे ही ग्रामसंस्कृती जोपासून तिला वाढविण्याचे कार्य सतत आणि निष्ठेने करत असतात. समाजात रुजलेल्या या संस्कृतीमुळेच समाजात परस्पर सहाकार्याची भावना वाढीस लागते या संदर्भात लिंटन म्हणतात "संस्कृती ही मनुष्याची मागर्दशक आहेत. संस्कृतीने मनुष्याकरीता काही आचारणाचे नियम घालून दिले आहे आणि त्याद्वारे मानवास वैयक्तिक व सामाजिक जीवन जगणे शक्य झाले आहे "

यावरुन संस्कृती टिकवण्याचे केंद्र म्हणजे खेडे असे लक्षात येते. न्याय, निती, धर्म, निष्ठा, कृतज्ञता ही मुल्ये प्रामुख्याने ग्रामीण भागात प्रकर्षाने रुजली गेली आहेत. शेतीच्या संदर्भात तर त्यांची मातेची आधिमातेची भावना असते तिला 'काळी आई' मानले जाते. म्हणुनच कृतज्ञ होऊन सुणीमध्ये अन्यधान्य पूजा, डव्हारा, नवान्न, पोर्णिमेसारखे सण साजरे केले जातात. या परंपरेच्या संस्कारातून आलेली माणसे सहाजिकच विचार-आचारांनी समृध्द झालेली असायची याचा प्रत्यय शंकर पाटील, आनंद यादव, रा रं बोरोडे यांच्या कथांमधून आल्याशिवाय राहत नाही.

स्वातंत्र्योत्तर खेडी बदललली असली तरी १९६० ते १९७० च्या आसपास जो बदल झाला तो अतिशय मंद गतीने झाला असावा असे वाटते, तसे तर पंचवार्षिक योजनेमुळे काही प्रमाणात शहरांना परिवर्तनाची पुसटशी चाहूलचही लागली होती परंतु ग्रामीण जीवन हे संथ वाहणारे असल्याकारणाने तसेच पारंपारिकतेचा आधिक प्रभाग अंर्तमनात रुजल्यामुळे पिढीजात ग्रामीण समाजाला हे परिवर्तन फारसे आवडले नाही असेच लक्षात येते या संदर्भात आपले मत व्यक्त कराना डॉ. वाघचौरे म्हणतात.

"या परिवर्तनाची चाहूल स्वातंत्र्योत्तर काळात शहरी जीवनाला प्रथम जाणवली संथ गणतीने या जीवनाने ती स्वीकारलीही परंतू कित्येक काळापासूनच पारतंत्र्यांचं सरंजामशाहीचं , रुढी-प्रथा परंपरागतेचं जोखड आपल्या

मानगुटीवर रुतवून घेतलेल्या ग्रामीण जनतेला हे परिवर्तन फारसं चटकन स्वीकारता आलं नाही, किंबहुना त्यांच्या पुर्वसंस्कारित मनाला ते फारसं पेललं नाही. जुन्या-नव्यांच्या सिमारेषेवरच हा माणूस केवळ भटकत राहिला."

स्वातंत्र्योत्तर काळात होऊ लागलेल्या परिवर्तनाचे वारे ग्रामीण समाजजीवनापर्यंत पोहचल्यामुळे ग्रामीण भागातही सामाजिक, राजकीय, आर्थिक, संस्कृतिक क्षेत्रावर त्याचा परिणाम होऊ लागला. त्या परिवर्तनाला सामोरे जाताना ग्रामीण समाजातील माणसांच्या मनाची द्विधा आवस्था निर्माण होऊ लागली होती. जुन्या आणि नव्या मुल्यांचा मेळ घालताना ग्रामीण माणसाच्या मनात निर्माण झालेले अनेक प्रश्न आणि त्यांची उकल न झाल्यामुळे त्यांची झालेली मानासिकता, यातुन अनेक विसंगती निर्माण झाल्या या विसंगतीचा धागा पकडूनच शंकर पाटील, रा.रं. बोराडे, आनंद यादव यांनी कथा लिहिल्या. त्या कथांतून विनोद निर्मिती झालेली असली तरी ते ग्रामीण समाजावर परिवर्तनाचा झालेला परिणाम होता असेच म्हणावे लागेल कारण शासनाच्या योजनांचा फारसा अर्थ न समजल्यामुळे या ग्रामीण माणसांनी आपआपल्या परीने त्याचा अर्थ लावला याची काही उदाहरणे पहावयाची झाल्यास खालील प्रमाणे पाहता येतील.

राजकारणातली अल्पशी जाण असलेली ग्रामीण माणेस तशी संधी साधू आहेत. ग्रामपंचायात मार्फत फारसे फायदे नसले तरी त्यापासुन मिळणा-या मान सन्मानाची त्यांना आपेक्षा आहे म्हणूनच आपला फोटो वृत्तपत्रातून यावा म्हणून गावाचा सरपंच गावाच्या विकासाचा प्रश्न पुढे करुन उपोषणाला बसतो. परंतु उपोषणाला बसण्याचे नियम त्याला माहित नसल्यामुळे त्याची फजिती होते आणि त्यातुन विनोद निर्मिती होते रा.रं. बोराडे यांच्या 'साक्षरताप्रसार, योजना' मिटिंग' या सारख्या कथेतुन परिवर्तनाच्या संकल्पनेतुन होत गेलेला विपर्याय विनोंद निर्मितीला कारणीभूत ठरतो.

ग्रामीण सुधारणांचा एक भाग म्हणून 'व्यसनमुक्ती' ला प्राधान्य दिले गेले. त्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी, शिक्षक ग्रामसेवकांनी या कार्याला वाहून घेतले होते. परंतु या परिर्तनवादी कार्याला ग्रामसंस्कृतीत कितपत प्रतिसाद मिळाला याचे चित्रण बोराडेंच्या 'व्यसनमुक्ती' आणि 'विसर्जन' तर शंकर पाटील यांच्या 'धिंड' या कथेतून पाहवयास मिळते यातुन असे लक्षात येते की, सामाजिक परिवर्तनाच्या शासकीय योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या परंतू त्या केवळ वरवरच्या अंगानेच.

एकुणच साठोत्तरी समकालीन साहित्याचा विचार केल्यास असे लक्षात येते की, या कालखंडातील नव्या प्रवाहाच्या मागे अनेक प्रेरणा आहेत. औद्योगिकरण, शिक्षण, स्त्री शिक्षण, शहरीकरण, दळणवळणाची साधने इत्यादीतून ग्रामीण समाजाला नवप्रवाहाची रुजवणुक कशी झाली, ती कशी रुजली व बहरली याचे चित्रण समकालिन साहित्यिकांनी प्रभावीपणे केलेले आहे याचा अवर्जून उल्लेख करावा लागेल. समकालीन वातावरण, परिवर्तने, सुधारणा ज्ञान- विज्ञानातील क्रांती, जागतिकीकरण यामुळे लेखकांच्या लेखनातुन अंत:सूत्र व्यक्त होतात. म्हणजेच कला, समाज, संस्कृती, पुर्वपरंपरा, प्रेरणा, विचारविश्व, प्रदेशचित्रण व मूल्यमापन अशा अनेक गोष्टींचा पाठपुरावा करत करत त्या त्या लेखकाच्या व त्यांच्या समकालीन वास्तव उलघडत जाते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) शंकर पाटील, 'भेटीगाठी,' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.
२) आर. एन. राजपुत, "समाजशास्त्राची मुलभूत संकल्पना व सिध्दांत, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर.
३) डॉ. भीमराव वाघचौरे, "रा. रं. बोराडे यांचे साहित्यः स्वरुप आणि आस्वाद", विहित प्रकाशन, औरंगाबाद.
४) डॉ. आनंद यादव, "ग्रामीण साहित्यः स्वरुप आणि समस्या," मेहता पब्लिशिंग हाऊस.

# समकालीन मराठी साहित्य : दलित स्त्रियांची आत्मकथने

**प्रा. विलास कचरू पंडित**

मराठी विभाग प्रमुख जिजामाता कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नंदुरबार

**प्रस्तावना-**

दलित स्त्रियांच्या आत्मकथनाचा विचार करताना ,त्यांचे स्वरूप वैशिष्ट्ये आणि भारतीय समाज व्यवस्थेचे स्वरूप सुद्धा विचारात घ्यावे लागेल. विश्वातील प्रत्येक समाजामध्ये स्तरीकरण अस्तित्वात आहे .जात हा धर्माधारित वर्ग आहे .जातीच्या आधारावर समाजाचे विविध भागात विभाजन केले जाते. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५० ला देशात भारतीय संविधान लागू झाले. भारतीय संविधानाने सर्व भारतीय नागरिकांना अधिकार बहाल केले. त्यात शिक्षणाचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, भाषण स्वातंत्र्याचा हक्क, विचार स्वातंत्र्याचा हक्क, लिहिण्याचा हक्क हे सर्व अधिकार मिळाल्यामुळे १९६० नंतर दलित साहित्यिक आपले विचार साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करू लागले. पुरुषांबरोबरच स्त्रियासुद्धा आपण अनुभवलेले दुःख, स्त्रियांच्या जाणिवा आपल्या आत्मकथनामधून व्यक्त करू लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले ,सावित्रीबाई फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव या दलित स्त्रियांच्या साहित्यावर दिसतो. डॉ. आंबेडकरांनी शोषित असलेल्या समाजाला त्यांची जाणीव करून दिली आणि त्यांना उठून बंड करण्याचा सल्ला ही दिला. सिंहासारखे जगा. शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा ह्या त्रिसूत्रीतून त्यांनी समाजाला दिशा दिली.

१९६० पूर्वीच्या स्त्रियांचे जीवन आपण विचारात घेतले तर बंधनात राहणारी, चौकटीत राहणारी सर्वकाळ पुरुषांच्या बंधनात असणारी स्त्री .१९६० नंतर ती शिकू लागली ,नोकरी करू लागली, पुरुषांच्या बरोबरीचे निर्णय घेऊ लागली, म्हणून तिच्या जीवनामध्ये घडलेल्या जीवन अनुभवाचे चित्रण आत्मकथनातून करू लागली.

बाबुराव बागुल म्हणतात- "दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू म्हणते. माणसाच्या सुख-दुःखाशी समरस होते. माणसाला सम्यक क्रांतीकडे घेऊन जाते. दलित साहित्य हे माणसामाणसांमध्ये वैरभाव न पसरविता ते माणसामाणसांमध्ये प्रेमभाव पसरविते. दलित साहित्य हे एकांगी नसून बहुअंगी आहे. इतरांचा तिरस्कार न करता सर्वांना बंधुभावाने बुद्ध तत्वज्ञानाशी जोडणारा विचार म्हणजे दलित साहित्य होय."१

दलित आत्मकथने विषयी श्री. गं.बा.ग्रामोपाध्ये म्हणतात- "आत्मचरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या जीवनात घडलेल्या व त्यांच्या संबंधित असलेल्या हाकिकतीचे केलेले निवेदन, लेखकाच्या जीवनाशी घट्ट बांधलेले, त्यांची काल्पनिक सरमिसळ यत्किंचितही न केलेले असे लिखाण ."२

आत्मकथन हा असा विषय आहे की लेखक स्वतःच्या जीवनात घडलेल्या घटनांचे कुठल्याही स्वरुपाची सरमिसळ न करता केलेले लिखाण म्हणजे आत्मचरित्र होय असे गं.बा. ग्रामोपाध्ये सांगतात.

डॉ. जनार्दन वाघमारे- "भारतीय दलिताला अनेक शतकापासून संस्कृतीच्या धार्मिक व सामाजिक जीवनाच्या बांधणीत व विकासात बरोबरीचा हिस्सा असूनही त्याला वारसा प्राप्त झाला नाही. तो या देशाचा पण हा देश त्याचा कधीच होऊ शकला नाही असा तो दलित".३

डॉ. म.ना. वानखेडे यांच्या मते- "दलित म्हणजे केवळ बौद्ध व मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले गेलेले असे

श्रमजीवी आहेत, ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात . दलित साहित्याला समृद्ध करणारा साहित्य प्रकार म्हणजे आत्मकथने होय".४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या परिसरामध्ये प्राचार्य म.भि. चिटणीस यांनी आंबेडकरी प्रेरणेतून दलित विद्यार्थ्यांना आपले अनुभव लिहिण्याचे प्रोत्साहन दिले .१९६४ च्या वार्षिक अंकात प्र.ई. सोनकांबळे व इतरांचे अनुभव त्यातून आले. १९७१ पासून गावकुसाबाहेर आमचे काही स्तर ही नवी दोन सदरे, त्या काळात सुरू झाली होती. डॉ. म.ना. वानखेडे यांनी मिलिंद साहित्य सभा ही साहित्य संस्था स्थापन केली होती. अस्मितादर्श दिवाळी अंकातून मी आणि माझे लेखन अनुभव, आठवणी ,मुलाखती, आम्ही सांगतो असे जगलो असंच जगतो, अशा शीर्षकाखाली विविध जीवनानुभव साहित्य सभेतून प्रकाशित होत होती. बाबुराव बागूल यांनी 'जेव्हा मी जात चोरली' होती. १९७६ साली दया पवार यांचे 'विटाळ', 'कोंडवाडा'. आत्मपर लेखनातून आत्मलेखनाच्या पूर्व खुणा स्पष्ट झाल्या. अस्मितादर्श नियतकालिकाने प्र.ई.सोनकांबळे चे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन प्रकाशित केले होते. दलित आत्मकथने प्रारंभी पुरुषांनीच लिहिली असे दिसते. त्यात बलुतं- दया पवार, आठवणीचे पक्षी -प्र.ई. सोनकांबळे, काट्यावरची पोट- उत्तम बंडू तुपे, फांजर- नानासाहेब झोडगे, गबाळ- दादासाहेब मोरे, गावकी - रुस्तुम अचलखांब इत्यादी.

ज्या काळात पुरुष आपले विचार व्यक्त करत होते, त्याच काळात स्त्रियांनी सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने अतिशय ताकदीने आपले विचार मांडले आहेत. यांच्यापुढे सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाच आदर्श होता. ज्यात 'माज्या जल्माची चित्तरकथा'- शांताबाई कांबळे १९८०,'जिणं अमुचं'- बेबीताई कांबळे १९८०, 'रात्रंदिवस आम्हा'- शांताबाई दाणी १९९०, 'मरणकळा'- जनाबाई गि-हे १९९३ इत्यादी.

**दलित स्त्री आत्मकथनाच्या प्रेरणा-**

ज्याप्रमाणे दलित पुरुषांच्या साहित्य लिखाणासाठी आणि आत्मकथनासाठी बुद्ध, चार्वाक महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही त्यांच्या साहित्याची प्रमुख प्रेरणा आहे. कारण जगत असताना ज्या यातना सहन कराव्या लागल्या, जे दुःख भोगावे लागले, ते दुःख दूर करण्याचा शोषितांना बाबासाहेब आंबेडकरांनी जो संदेश दिला, तीच खरी प्रेरणा या साहित्याचे आहे. शोषितांना बाबासाहेब आंबेडकरांनी बंड करून उठा, सिंहासारखे जगा, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. तो संदेश म्हणजेच स्त्रियांच्या दलित आत्मकथनाची प्रेरणा आहे. याच प्रेरणेने प्रभावित होऊन दलित स्त्रिया सुद्धा आपली आत्मकथने स्वतःच्या अनुभव व्यक्त करू लागल्या.

**दलित स्त्री आत्मकथनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये-**

1. दलित स्त्रियांची आत्मकथने ही पारंपरिक आत्मकथनं अपेक्षा वेगळी आहेत. त्यांचे दुःख वेगळे आहेत. त्यांच्या जाणिवा वेगळया आहेत. दलित साहित्याचे लिखाण अल्पप्रमाणात झाले असले तरी, सत्य आणि वास्तव स्वरूपाचे आत्मकथने म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.
2. स्त्रियांना मुळातच कमी दर्जाचे स्थान होते. ते आपणास सांगत असताना १९६० च्या नंतर सुरुवातीस पुरुषांची आत्मचरित्र प्रकाशित झाली. जवळपास १९८० पासून दलित स्त्रियांची आत्मकथने पुढे आलेले

दिसतात.

3. स्त्रियांच्या आत्मकथानामधून आलेली चित्र ने व्यक्तिगत वाटत असली तरी, ती चित्रणे समस्त समाजजीवनाचे असतात. ते संपूर्ण समाजाची अभिव्यक्ती असते.
4. दलित स्त्रीच्या आत्मकथनामधून येणारे जे समाज चित्रण आहे ते, अत्यंत उपेक्षित अशा समाजजीवनाचे, संस्कृतीचे वास्तव चित्रण त्यांच्या आत्मकथनातून व्यक्त झालेले आपणास दिसते.
5. दलित स्त्री आत्मकथनामध्ये त्या स्त्रीवर होणारा अन्याय, जुलूम समोरच्या पिढीला कळावा, समाजामध्ये असलेली वर्णव्यवस्था, विषमता या समाजव्यवस्थेचे दोष समोरच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम या आत्मकथनातून झालेली दिसते.
6. दलित स्त्री आत्मकथनामधून आलेले चित्रण हे वैयक्तिक पातळीवरचे न राहता, ते सामाजिक पातळीवरचे ठरतात. त्या आत्मकथनामध्ये परखडपणा, निर्भीडपणा, धीटपणा, विद्रोह नकार, वेदना आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी तिची धडपड आपणास पाहावयास मिळते.

**स्त्रियांची दलित आत्मकथने-**

१.'जिणं अमुचं '- बेबी पंढरीनाथ कांबळे १९८०, 'जिणं अमुचं ' या आत्मचरित्राच्या लेखिकेच्या आईचे नाव सुंदरा, जात महार असून त्यांचे गाव फलटण लेखिकेची वडील कॉन्ट्रॅक्टर होते. ते दानशूर होते. बाबासाहेबांच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. पारंपरिक मानसिकता असणारे ग्रहस्थ म्हणून त्यांची ओळख होती. स्वतःचा व्यवसाय सोडून ते बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रबोधनाचे कार्य करू लागले. लोकांनी समजावून सांगितले पण ते ऐकत नव्हते. म्हणून लेखिका आपल्या आजोळी रहात असे. या आत्मकथनातून लेखिका पूर्वाश्रमीच्या महार व्यक्तीची संपन्नता आणि श्रीमंती त्यांचा दर्जा तो कितव्या वाट्याचा मालक आहे, यावरून ठरत असे. त्यात किती उतरंडी आहेत. जनावराला किती दावणं आहेत. बोकड्याचे वाळवण, देव्हारा केवढा, अंगात देव येतो की नाही. अर्ध्या ढोराचा वाटा, आठ बोरसे, आईला काळीज बोक यावरून त्यांची श्रीमंती ठरत असे.

**स्त्रियांचे जीवन-**

बेबी कांबळे आपल्या 'जिणं अमुचं' या आत्मकथनामधून तत्कालीन स्त्रियांच्या जीवनाचा आढावा घेतला आहे. ते अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने जीवन चित्रित करतात. लेखिकेने आत्मकथनामधून आई व आजी या दोन व्यक्तिरेखा आल्या आहेत. त्यावेळची स्त्री पहाटे उठून जात्यावर दळण दळते. त्यामधून नातू - नातीचे कौतुक करते. ती म्हणते खडकावर बारीक दगड घासून पिठासारखा करून त्याने दात घासावेत . चहा सोबत शिळी भाकर त्याची न्याहरी, जळण गोळा करून त्या विकणे, भरपावसात गवताचे भारे आणणे. आई घरी परतेपर्यंत एक वाजेपर्यंत मुले उघडे-नागडी शेंबडे हिंडत. त्यावेळी रोगाची साथ आल्यास मेलेल्या जनावरांना गोठ्याबाहेर काढून पुरुष स्वच्छ करीत. स्त्रिया आपल्या वाट्याला आलेली कामे करत. ओल्या शेणाच्या टोपल्या डोईवर वाहून नेत. अंगावर घाणीचे ओघळ वाहत. मांस घारीने नेऊ नये म्हणून, घार -घार असे ओरडत. सवर्ण माणूस समोरून आला तर त्याला म्हणत- "मारणी पाया पडणं घालत्यात धनी" अशा वेळी चुकून काही कृतिशून्य घडून आले असेल किंवा नसेल त्यावेळी सवर्ण व्यक्ती मोठा गोंधळ घालत असे. त्याची समजूत घालण्यासाठी सासू आपल्या सुनेला बोलून त्या सवर्ण व्यक्तीची मर्जी संपादन करत असे. "हिला काय धरूम माहित हाय! अग ती आपली मायबाप हायत आपल्या धरूमा

परमान आपुन वागायचं! तुजी आय गाडवीण बिडवीन होती का काय, तिला नाही कळत लेकीला शिकून द्यावे आज धा माणसात सासरा उठतुया, धा माणसात आणि त्याची व्हय,रांड अब्रू घालवतीस तू?" यावरून वर्णवर्चस्ववादी लोक दलिताना कशी वागणूक देत होते हे स्पष्ट होते.

**स्त्री जातीचे दुःख**

बेबी कांबळे यांनी आपल्या आत्मचरित्रातून दलित स्त्रियांची दयनीय अवस्था चित्रित केली आहे. दलित समाजात अतिशय भयंकर स्वरूपाचे दारिद्र्य असे. बाळांतीणीला दूध येण्या इतकं सुद्धा अन्न मिळत नसे. मूल जन्मल्यानंतर त्या आईला अन्नासाठी खूप याचना करावी लागत असे. तुटक्या तरकटावर बाळंतिणीला तळमळत पडावे लागे. बाळंतिणीची आई कण्या ज्वारी मागून आणत असे. त्या जात्यावर भरडून तिला जेवण बनवून देत. मुली अल्पवयीन वयात लग्न झाल्यामुळे त्यांना जास्त त्रास सहन करावा लागत असे. आडाणी असलेली सुईण तिला अधिक त्रासदायक वाटत असे. बाळंतपणात होणारा रक्तस्त्राव रोखण्यासाठी त्यांच्या कुटुंबात चिंधीसुद्धा उपलब्ध असायची नाही. अशा स्वरूपाचे दहाक चित्रण बेबी कांबळे यांनी केली आहे.

**जातीयता आणि सवर्ण स्त्रियां-**

महार स्त्रिया मोळी विकण्याचे काम करत. त्यामुळे ब्राह्मण आळीतच सर्व मोळया विकल्या जात. त्या ठिकाणचा प्रसंग चित्रित करताना लेखिका म्हणते. "महाराच्या विटाळाच्या भितीनं ओटा छातीएवढा उंच असे. महार दारापर्यंत पोचू नये, याचीही दक्षता घेतली जाई." त्यांना लाकडाचाही विटाळ होत असे. "अगं देवादिकांना हे चालणार तरी कसं, देवी टाळतील ना ? म्हणून म्हणतेय, तुम्ही त्याला काही ठेवू नका".

**शाळेतील प्रसंगाचे चित्रण-**

शाळेत जाणाऱ्या शूद्र मुलींची सवर्ण मुली हेळसांड करतात. त्यांचा किळस येत असे. त्यां तुच्छतेने वागणूक देत असत. शूद्र मुलींना वर्गात प्रवेश न देता दाराच्या कोपऱ्यात बसण्याची वेळ येत असे. तेव्हा शूद्र मुलीसुद्धा सवर्ण मुलींना धडा शिकवीत पण त्यावेळी शाळेच्या शिक्षिका शूद्र मुलींना, तुम्ही वर्गात का गेलात ? म्हणून शिक्षा देत असत.

**बाबासाहेबांच्या विचाराचा प्रभाव-**

बेबी कांबळे यांच्या आत्मकथनातून बाबासाहेबांचा परिवर्तनवादी विचार आलेला दिसतो. बाबासाहेबांच्या हयातीतच पाडव्या ऐवजी जयंती साजरी करण्याची प्रथा सुरू झाली. नवीन कपडे मिळाले, पुरणपोळी मिळाली. मिरवणूकीत सर्व स्त्रिया या स्काउट ड्रेसकोडमध्ये होत्या. गाव स्वच्छ केले गेले .८४ गावाचे लोक एकत्र येऊन जत्रेसारखे गोळा झाली. बैलगाडीमध्ये बाबासाहेबांचा फोटो ठेवून त्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली.घरोघरी दोन- दोन तीन -तीन पायल्या पीठ भाकरी गोळा केले. बाबासाहेब जेव्हा गावात आले तेव्हा सर्वांनी जमिनीला डोके लावून, बाबासाहेबांना अभिवादन केले. असाही प्रसंग आत्मचरित्रातून बेबी कांबळे यांनी चित्रित केला आहे.

**2. दलित आत्मकथा 'माज्या जल्माची चित्तरकथा' - शांताबाई कांबळे**

'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनात शांताबाई कांबळे यांनी आपल्या या सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक समस्या उपस्थित केल्या आहेत लेखिकेचे माहेरचे नाव शांताबाई सखाराम कबीर जन्म १ मार्च १९२३

कराड पंढरपूर रस्त्यावर महुद बुद्रुक हे गाव आहे. अस्पृश्यता, चातुर्वर्ण्यव्यवस्था, आर्थिक साधनांचा अभाव या सर्व कारणांमुळे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक दर्जा खूप खालचा होता. वडील कुटुंबप्रमुख लेकीचे बालपण अतिशय हलाखीत गेले. कुटुंबाचा शैक्षणिक दर्जा उच्च होता, कारण लेखिका सातवीपर्यंत शिक्षण घेतलेली कुटुंबातील स्त्री होती. नवरा शिक्षक होता. आटपाडीच्या शाळेवरील शिक्षक लेखिकेच्या विवाहावेळी हुंडा किती देणार हा प्रश्न लेखिकेच्या लग्नात विचारला गेला होता. साठ रुपये ,साडी आणि सांड अशा स्वरूपाचे बोलणी झाली. नंतरच्या काळात पतीचे गैरवर्तन आणि तिच्या जीवनात संघर्ष निर्माण करणारे ठरले.लेखिका शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होती. मुलांना मोठे केले आणि जीवन यशस्वी बनविले.

कुटुंबातील राहण्याचे ठिकाण लेखिकेचे घर चार भिंतीचे, मातीच्या भेंड्याने बनवलेले, काड्यांनी साकारलेले असे तणाचे घर होते. घर आकाराने लहानच होते. घरामध्ये सामानाची खूप गर्दी होती. दाराजवळच उखळ, त्याच्या बाजूला जाते. जात्याजवळ देवाचा देव्हारा, देवा-यात आजी-आजोबांच्या सोनाराने रुप्यांनी घडविलेल्या मूर्ती, घरामागे ताईबाई देवीची देऊळ होती. देवा-यात दोन्ही बाजूला दोन चुली, चुलीजवळ गुडघाभर मातीची भिंत, कैकाडयाने दिलेली आहे. त्याच्या बाजूला पत्र्याचा डबा, त्यात दादाच्या टाक्या, पिचर, वळंबा इत्यादी साहित्य कोपऱ्यात, बैलाचा कासरा, कु-हाड ,चांदाकडच्या भिंतीला उतरंडी, वाळवलेल्या भाकरी अशा छोट्या घरांमध्ये सामानाची गर्दी असलेली दिसते.

**सामाजिक स्थितीचे दर्शन**

लेखिका आपल्या आत्मचरित्रातून, सामाजिक पार्श्वभूमी स्पष्ट करत असताना जातीयतेचे चटके याचा अनुभव व्यक्त करतात. समाजात जातीयता, अस्पृश्यता ही केवळ स्पर्श जातीपुरतीच मर्यादित नव्हती तर, मशिदीमध्ये सुद्धा महार व्यक्तीला प्रवेश दिला जात नसे. मज्जिदमधून दिला जाणारा मलिदा तो ही बाहेरुनच दिला जात असतो. तराळकी, कुत्री फेकणे बाजार झाडणे, मागून आणणे, दौंडी ही कामे महार व्यक्तीच्या वाट्यास आलेली दिसतात. बाबासाहेब यांची प्रेरणा घेऊन लंकेश्वर व बनसोडे हे कार्यकर्ते जलशाच्या माध्यमातून गावांमध्ये प्रबोधनाचे कार्यक्रम घेतात. गावकी सोडा. मेलेल्या जनावराचे मांस खाऊ नका. चांगले कपडे वापरा. मुलांना शिक्षण द्या. अशा स्वरूपाचा संदेश प्रबोधन माध्यमातून ते देत. गावातील महिलांनी एकत्र येऊन धर्मांतर करण्याचे ठरवले होते. तेव्हा गावातील सर्व सवर्ण त्यांच्या विरोधात गेले. त्यानंतर ३२ गावांचे महार एकत्र येऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्या घडलेल्या प्रसंगावर पाटील म्हणाला, “आम्ही मेलेल्या जनावर ओढू , मेलेल्यांची खबर आम्ही कळवू , पण महारानाही आम्ही बघूनच घेतो”. त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसात त्या पाटलाविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मात्र सवर्ण सरळ झाल्याचे चित्रण या आत्मकथनातून आले आ. १९६२ मध्ये दलितांनी गावकीचा नकार दिला होता तेव्हा गावातील सवर्ण लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता. त्यावेळी सुद्धा सवर्णावर फौजदारी गुन्हा दाखल केल्यानंतरच गावातील लोकांमध्ये वागण्यात, बोलण्यात बदल जाणवू लागला.

**आत्मकथनातून आलेले स्त्री जीवन**

शांताबाई कांबळे यांनी आपल्या आत्मकथनामधून चित्रित केलेले पात्र म्हणजे आई गंगूअक्का, धोंडी ही स्त्रीपात्र आलेले आढळतात. लेखिकेची आई लेखिकेला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देते, प्रेरणा देते, तिच्या मागे

खंबीर अशी उभी राहते. तिला शिक्षण घेण्यासाठी सर्व संधी उपलब्ध करून देते. घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे बाळांतपणात खायला काही नाही, म्हणून ते बारा दिवसातच लहान बाळाला टोपलीत टाकून बाजरी सोरण्यासाठी शेतात जाते आणि आलेल्या धान्यातून मुलाबाळांना पोटभर खाऊ घालते. असे विदारक चित्रण आत्मकथनातून आले आहे. आई मरताना आपल्या पतीजवळ ती सांगते की "पोरीची शाळा पुरी करा, तिला मास्तर नवरा करून द्या, माझी आन हाय तुम्हाला"

लेखिकेच्या बहिणीची आत्मकथनातून आलेली व्यक्तिरेखा ही, सर्वसामान्य दलित स्त्रीचे जीवन चित्रित करणारी आहे. कुटुंबातून सासुरवासाचे बळी होतानाचे चित्र पाहायला मिळते. समाजाची आर्थिक परिस्थिती, कुटुंबाचे कुपोषण, अन्नवस्त्र यांच्या गरजा भागत नाहीत. बाळंतिणीला, पुरुषांना खायला मिळत नाही. बाळाला पुरेसे दूध मिळत नाही. बारा दिवसाचे बाळ टोपलीत टाकून बाळाची आई शेतात जाते. मासिक पाळी आल्यानंतर, ती मुलगी मेली असे सांगण्याचा प्रघात होता. अशा स्त्रियांच्या विविध समस्यांचा पाढा शांताबाई कांबळे यांनी आपल्या ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मचरित्रातून वाचली आहे.

आत्मकथनातून मंदिर प्रवेशाला असलेली बंदी याचे चित्रण आलेले आहे. लेखिका आईला म्हणते "आपून पंढरपूरला आलुया अन् आपनाला देवळात जाऊ का देत नायती? मंग आपून कशाला पंढरपूरला आलुया?" या प्रसंगानंतर लिखिकेवर बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा घोर परिणाम झालेला आढळतो. दलित स्त्रिया आपसात बोलताना म्हणतात, "कशाला दगडाच्या देवाला पुजता? तो बघा आपला चालता-बोलता देव?" असं बाबासाहेबांना उद्देशून म्हणत आणि देवाची पूजा करण्याचे टाळत असत.

**सारांश-**

बेबी कांबळे यांच्या ‘जिणं अमुचं’ या आत्मचरित्रात आलेले सामाजिक जीवन, स्त्रीविषयक जाणिवा, लेखिकेच्या वैयक्तिक जीवनाचा वास्तव माहितीपट या आत्मकथनाला आहे. हे आत्मकथन आहे . या अर्थाने सामाजिक दस्तऐवज म्हणून ओळखला जातो. सामाजिक जीवनाचे अतिशय वास्तव आणि उत्कृष्ट चित्रण त्यांनी केले आहे. प्रत्यक्ष घडलेल्या जीवन वास्तवाचे चित्रण यातून आले आहे. ब्राह्मण आणि शूद्र या स्त्रियांचा मोळया विकत घेण्याचा प्रसंग, शाळेतील शूद्र आणि सवर्ण मुलींचा संघर्ष याचेही चित्रण आत्मकथनातून तंतोतंत आलेले आहे.

शांताबाई कांबळे यांच्या आईने शिक्षणसाठी प्रोत्साहन दिले. घरची कौटुंबिक परिस्थिती हलाखीची असून सुद्धा, शिक्षणाची गोडी दिसून येते. वडील घराकडे लक्ष न देता प्रबोधन चळवळीत काम करतात.आईचे स्वप्न मुलीला शिक्षक नवरा मिळावा. स्त्रियांचे दुःख इतके वाईट की बाळंतपणामध्ये दूध येण्याइतके सुद्धा अन्न तिला मिळत नसे. लहान बाळ घेऊन शेतात जात. तेव्हाच खायला मिळत असे. स्त्रियांना जातीयतेचे चटके, स्त्री वेदना, दुःख यांचे चित्रण शांताबाई कांबळे यांनी आपल्या आत्मचरित्रातून केले. हे आत्मचरित्र वैयक्तिक ठरत नाही तर समस्त स्त्री जातीचे दुःख व्यक्त करते.

**निष्कर्ष-**

१. दलित स्त्री आत्मकथनातून स्त्री पात्रे निर्भीडपणे व्यक्त होताना दिसतात.

2. दलित स्त्री आत्मकथनातून वेदना विद्रोह नकार प्रकट होतो.

3. दलित स्त्री आत्मकथनातून दारिद्र्य, अस्पृश्यता आणि काही अंशी अंधश्रद्धेचे चित्रण केले आहे.

४. दलित स्त्री आत्मकथनातून सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाच्या पुनर्मांडणीचा प्रश्न उपस्थित करतात.

५. दलित स्त्री आत्मकथनातून येणारे चित्रण हे वैयक्तिक स्वरूपाचे न राहता ते सामाजिक पातळीवरचे, समष्टीचे ठरतात.

**संदर्भसूची**

१. बेबीताई कांबळे, 'जिणं अमुचं ' मानसन्मान प्रकाशन पुणे.

२.तत्रैव पृष्ठ क्रमांक १८, ८३.

३. कांबळे शांताबाई, 'माज्या जल्माची चित्तरकथा' सुगावा प्रकाशन.

४. तत्रैव प्रस्थ २४, ६४.

५. डॉ. प्रतिभा अहिरे, समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद.

६. डॉ. शामाल गरुड, दलित स्त्री आत्मकथने, यशश्री प्रकाशन पुणे.

# समकालीन मराठी बालसाहित्य : 'बालकथा'

संशोधक विद्यार्थीनी

**सविता भिवा धनवडे**

मु.पो. टोप, आंबेडकर नगर,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,पिन कोड - ४१६१२२

समकालीन हा कालवाचक शब्द आहे. असे म्हणता येईल. 'सम' म्हणजे सोबत समांतर, एकसारखा, समान होय. यामध्ये जे साहित्य काळाबरोबर, काळासोबत असते. ज्यावेळी ते निर्माण होते त्यावेळचे, काळाचे, समाजाचे, त्या समाजामध्ये असणाऱ्या संस्कृतीचे प्रतिबिंब हे साहित्यामध्ये पडलेले दिसते. त्यालाच 'समकालीन साहित्य' म्हणतात.

मराठी साहित्यामध्ये जे वेगवेगळे जे साहित्यप्रवाह दिसून येतात. त्यामध्ये बालसाहित्य हाही एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह असलेला दिसून येतो. बालसाहित्यामध्ये मनोरंजनाला महत्त्व दिले जाते. मनोरंजनातून प्रबोधन केले जाते. शांता शेळके, इंदिरा संत, मंगेश पाडगांवकर, राजा मंगळवेढेकर, अरूणा ढेरे, कुसुमाग्रज, आरती प्रभु, निर्मला सारडा, दत्ता टोळ, महावीर जोंधळे, आशा गवाणकर, विजया जहांगिदार अशा किती तरी साहित्यिकांनी बालसाहित्यामध्ये मोलाची भर घातली आहे.

२० व्या शतकाच्या पूर्वाधात अनेक बालसाहित्यिकांनी बालकासाठी विविध विषयांवरचे लेखन केले आहे. साने गुरूजींनी तर 'श्यामची आई' या कथासंग्रहातून नैतिक जीवनमूल्यांबरोबर एक आदर्श नागरिक, देशसेवक, देशभक्त कसा घडला जातो. याचे वेगवेगळया कथांमधून संस्काराचे मूल्य पेरले आहे आचार्य आत्रेंनी 'विनूचे बिल', ना. धो. ताम्हनकर 'गोटया', 'चिंगी', भा.रा. भागवत यांचा 'फास्टर फेणे' इत्यादी सारख्या अनेक मानवंत बालसाहित्यिकांनी निसर्ग, कुटुंब, समाज, पशु-पक्षी, नद्या, डोंगर, द-या इत्यादी आपल्या बालसाहित्यातून साकारलेला दिसून येतो.

१९६० नंतरच्या काळात नवीन लेख्नाची भर त्यामध्ये पडलेली दिसते. नवनवीन संशोधने, तंत्र विज्ञानाचा प्रसार, विभक्त कुटुंबपध्दती, उद्योगधंदे, शरीकरण, याच शरीकरणाचा ग्रामीण भागावर पडलेला प्रभाव इत्यादी अनेक गोष्टी ज्याप्रमाणे प्रौढसाहित्यामध्ये आपल्या तशी त्या बालसाहित्यामध्येही आल्या. पाश्चिमात्य वाङ्मयाचा प्रभाव ही बालसाहित्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. बालबोधमुक्तावली पासून सुरु झलेली मराठीतील बालसाहित्य परंपरा बापू छत्रे, हरिकृष्ण दामले व वि.को. ओक यांच्या समकालीन मराठी बालसाहित्याने भाषांतरित व मुलांना समजेल उमजेल अशा भाषेत जाणीवपूर्वक निर्माण झाले. नंतर मात्र सानेगुरूजींचा काळहा बालसाहित्यामध्ये संस्काराच्या दृष्टीने महत्वाचा ठरलाा. बदलत्या काळाबरोबर नवनवे विज्ञान, कथा, गुढकथा साहसीकथा ह्या पुढे येऊ लागल्या.

अनेक बालसाहित्यिकांनी कथेचे दालन समृध्द केले आहे. बा.गो.आपटे यांनी चित्तरंजन भाग १ व २, भा.द.खेर यांनी 'साहसी सत्यकथा', अमरेंद्र यांनी वीर आणि परमवीर यासारख्या शौर्य आणि वीरता कथामधून मुलांवर संस्कार केले आहे. याच काळात मुलांसाठी विविध अंगानी लेखन होवू लागले आजचे युग तंत्रज्ञानयुक्त असल्याने मुलांचे पुस्तकांशी नाते कमी आणि मोबाईल, टी.व्ही.शी जास्त जडले आहे. त्यामुळे बालपिढीतील उत्सुकता, कल्पना शक्ती, कमी होत चालली आहे आणि ती जर जतन करावयाची असेल तर बालसाहित्यामध्ये ही आधुनिकता

असायला हवी, मुलांमध्ये जाणिवपूर्वक वाचनाची गोडी निर्माण करता आली पाहिजे. आजूबाजूचे सामाजिक जीवन बिघडत चालले आहे. अंगणात बागडणार बालपण मोबाईल, टी.व्ही.मध्ये बंदिस्त झाले आहे. त्यामुळे बालमनावर योग्यवेळी कोणत्या संस्काराची गरज आहे ? हे लक्षात घेऊनच बाबूराव शिरसार, रजनी हिरळीकर, श्याम कुरळे, अनुराधा फाटक, प्रा. मंदा कदम, बाळ पोतदार इत्यादी सारखे नामवंत बालसाहित्यिक पुढे आलेले आहेत.

समकालीन मराठी साहित्यिक बाबूराव शिरसाठ यांनी काळाचे पाऊल ओळखून बालकांच्या विकासासाठी आपले अयुष्य वेचले आहे. त्यांनी विज्ञाननिष्ठभावी पिढी घडविण्यासाठी व मुलांना लहानपणापासूनच वाचनाची गोडी लागावी यासाठी बालकथा, बालकविता, बालकादंबरी इत्यादी सारख्या साहित्याची निर्मिती केली आहे. त्यांनी संगणकाच्या युगात, वैाानिक दृष्टिकोन मुलांमध्ये रुजावा म्हणून चिमुकल्या मेंदूमध्ये गोंधळ न करता करमणुकीच्या मनोरंजनाच्या गोष्टीतून अवतीभोवतीच्या जगाची समाजाची ओळख बालसाहित्यातून करुन दिली आहे. अंधश्रध्देने भारावलेला समाज हा कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवायला पटकण तयार होतो. बाबूराव शिरसाठ यांनी मुलांच्यासाठी जाणिवपूर्वक बोधप्रधान, आदर्शवादी, संस्कारक्षम गोष्टी या 'मुलांच्यासाठी संस्कार गोष्टी' या कथासंग्रहातून मांडल्या आहेत.

'रमेश बदलला' ही पहिलीच कथा या कथेमधील रमेश नेहमी अस्वच्छ असतो. त्याच्या प्रत्येक अवयवांकडे लक्ष पुरवून त्याची निगा कशी राखता येईल याचे धडे शाळेत गुरुजी देतात या कथेतून शिरसाठ यांनी अस्वच्छता आजारास कशी कारणीभूत असते याची जाणिव 'शहाण्याला शब्दाचा मार' ही म्हणी प्रमाणे करून दिली आहे. त्याचप्रमाणे 'रडणारे झाड' या कथेतून झाडे आपल्याला महत्वाची नैसर्गिक देणगी आहेत आणि त्यांची काळजी आपणच घ्यायला हवी. ही कथा बालमनाला जास्त भावणारी आहे. या कथेतील झाडआपल्याला ऊन, वारा, पाऊस, स्वच्छ हवा, फुले, फळे देत असते. पण मानव मात्र अंधश्रध्देपोटी त्या झाडाच्या बुध्दांमध्ये नाग आकाराला आला आहे असे समजून त्याला मंदिराचे स्वरूप देतात. त्यांच्या फांदया छाटतात, हळदी-कुंकु वाहतात. सगळयांचे विश्रांती स्थान असणारे झाड मात्र मनोमन रडत असते त्याचे रडणे फक्त गुराख्याला समजते. पण त्याचा काही उपयोग होत नाही.

या सर्व कथांप्रमाणे 'झपाटलेला, देवाघरची फुले, बापूंचा संदेश, नेपाळचा बहादूर, गुणी विद्यार्थी, कष्टाचे फळ इत्यादी सारख्या अनेक कथांमधून शिरसाट यांनी मुलांना मनोरंजनातून प्रबोधनाच्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या कोणत्या ना कोणत्या संस्काराचे बिज हे प्रत्येक कथेमध्ये पेरल्याचे दिसून येते.

'जंगलातील उत्सव' हा रजनी हिरळीकर यांचा बालकथासंग्रह आहे. या मध्ये रजनीताई यांनी विविध विषयांवर छोट्यांना कथा सांगून समाजामध्ये आपल्या अवतीभोवतीच्या घटना सांगितलेल्या आहेत. कोण म्हणतंय हल्लीच्या मुलांना समज नाही. शहाणपणा नाही नुसता दंगा करायला हवा... छे! छे! रोहितची दोस्त मंडळी किती शहाणी, समजदार आहेत. आपल्या मित्राचे आजारपणातील अभ्यासाचे वर्ष वाचवले त्यांनी ? मित्र असावे तर असे अशा कथांमधून ऐकमेका साहाय्य करु या प्रकारे वागले पाहिजे. अडचणीमध्ये एकमेकांना मदत केली पाहिजे हे वरील उदाहरणातून साकार होताना दिसते. त्याच बरोबर चंद्र, सूर्य, झाड-वेली, ऊन-वारा त्यांची मानवाला असणारी गरज ही या कथांमधून सांगितली आहे. याचप्रमाणे 'जंगलातील उत्सव' या कथेतून हत्ती, वाघ, कोल्हे, खारुताई, माकड, टणक पाठीचे कासव, मोर, अस्वल, झप, सुसरी, चिऊताई इत्यादी अनेक प्राण्यांची ओळख रजनीताई यांनी करुन दिली आहे. यातील कथा ह्या अनंद देणा-या आहेत. मुलांचे या कथेतील शर्यतीतून मनोरंजन तर, होतेच पण 'एकीचे बल' किती महत्वाचे आहे याची जाणिव ही होते. मुले हसत खेळत या कथामधील निरनिराळ्या भावनांचा आनंद घेतात.

क्षणार्धात ही मुले प्रेरित होतात. अशाच पध्दतीची बालकथा ही रोहित कुमार यांनी 'जातक कथा' या कथासंग्रहातून मांडली आहे. 'गिधाड आणि वाघ' या कथेतून उत्कंठ मैत्रीचे वर्णन केले आहे वाघ हा जंगलाचा राजा आणि गिधाड हे खाण्यापिण्यासाठी वाघावर अवलंबून असते. पण कोल्ह्याच्या खोटया स्तुतीने भारावून जातो व आपणच वाघ आहे असा खोटा भ्रम करून घेतो आणि हत्तीची शिकार करायाला जातो पण स्वतःच तो हत्तीच्या पायात चिरडला जातो. या कथेतून रोहित कुमार यांनी खोटा अंहकार, स्तुती किती महागात पडते हे सांगितले आहे. गर्वाचे घर खालीच असते या उक्तींचा प्रत्यय अशा कथांमधून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

याचप्रमाणे २०२१ च्या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखिका सोनाली नवांगुळ यांनी 'जॉयस्टिक' नावाच्या बालकथा संग्रहातून मुलांमध्ये अनेक प्रकारचे संस्कार घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची 'जॉयस्टिक' मधील पहिलीच कथा यामध्ये मुलांच्या जन्मापासून आई-वडील मुलांसाठी फार कष्ट करीत असतात. मुलांची सर्वोतोपरी काळजीच एक प्रकारे घेत असत चिनार आणि जुई हे एकमेकाचे सखखे मित्र, त्यांना आपले आई-वडील अहोरात्र कष्ट करीत असतात आणि आपण मात्र त्यांच्यासाठी काहीच करू शकत नाही. आता आपण आपल्या आईवडिलांना कामात मदत करायची आणि तसाा प्रयत्न ही मुलं करतात, पण आई वडीलांची इच्छा "तुम्ही अभ्यास करा मोठे व्हा, स्वतःची काळजी घ्या, " अशी इच्छा व्यक्त करतात. चिनार आणि जुई आपण कोणाच्याच उपयोगी पडू शकत नाही. याची खंत व्यक्त करतात त्यांना वाटते आपण 'झाडं' होऊया झाड असा क्षणभर विचार करतात. कारण झाडं सगळ्यांना सावली देतात. फळ, फुल, औषधे, तसेच स्वच्छ हवा देतात. शिवाय झाडाची मुळे, खोड हे जमीनीत माती सुध्दा घट्ट धरून ठेवतात. तिची धूप होऊ देत नाहीत, नक्की आपण झाडेच व्हायचे या विचाराने जादूगाराला शोधतात. आम्हाला झाड बनवा, हा हट्ट करतात पण तो ही ह्या लहान मुलांच्या विचाराने भारावतो आणि चमत्कार वगैरे काही नसतो याची जाणिव मुलांना करून देतो.

सोनाली नवांगुळ यांनी या कथेतून एकाच वेळी नैतिकतेचा, सामाजिक बांधिलकीचा सुसंस्कार चिनार आणि जुई यांच्या वर्तनातून साकारलेला दिसतो. बालकांच्या मनामधील भावभावना मिश्र स्वरूपाच्या असतात. म्हणजेच कल्पनेचे विश्व हळू हळू संस्कृती मुल्यांकडे वळू लागते. याची जाणिव या 'जॉयस्टिक' मधील कथामधून होते.

अशा प्रकारे अनेक बालकथाकारांनी समकालीन मराठी बालसाहित्यातून मुलांचे मनोरंजन व्हावे, त्यांचा भावनिक बौध्दिक विकास व्हावा व नैतिक शिकवणीने चांगल्या वाईटाची जाण मुलांमध्ये निर्माण होवून त्यांचे व्यक्तिमत्व सुसंपन्न करण्यास हातभार लावलेला आहे असे लक्षात येते.

**संदर्भ साहित्य -**

१. थिंगळे वेदश्री, 'मराठी समकालीन कथा: आस्वाद आणि आकलन', प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती- २०१९
२. हिरळीकर रजनी, 'जंगलातील उत्सव', अरिहंत पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीयावृत्ती २०१५.
३. कुमार रोहित, 'जातक कथा', प्रकाशक माया कला मंदिर दिल्ली
४. शिरसाट बाबूराव, 'मुलांच्या साठी संस्कार गोष्टी', प्रतीक प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती २०१६
५. नवांगुळ सोनाली, 'जॉयस्टिक', माऊस मल्टिमीडिया प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१८

# आदिवासी कविताः इतिहास आणि जीवन


## शिवदास दगा पावरा

सहा. प्राध्यापक मराठी विभाग, गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अंबड, जि. जालना. – 431204


आदिवासी समूह हा मूळ रहिवासी असून देखील भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात उपेक्षित ठरलेला समाज आहे. सुरुवातीपासूनच हा समाज कोणत्याही प्रकारच्या गुलामगिरीत न अडकता स्वःअस्तित्व आणि अस्मिता अबाधित ठेवलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेले जीवन हे अतिदुर्गम भाग असल्याचे दिसते. आदिवासींच्या गरजा मर्यादित आणि निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्याने ते सहज उपलब्ध होत असणाऱ्या साधनांवर हा समूह आपले गुजराण करतो. कवी लिहितात–

**"बामनाच्या जल्माला जाशी लिखू लिखू मरशी।**
**मारवाड्याच्या जल्माला जाशी तोलू तोलू मरशी।**
**चांभाराच्या पोटी जल्माला जाशी नाड्या ज्योती करू मरशी।**
**वारल्याच्या पोटी जमाला जाशी जंगलाचा राजा होशील।"1**

अशाप्रकारे आदिवासी आपल्या महानतेचे वर्णन करताना दिसतात. इतर समाजात जन्माला आल्यावर त्या समाजाची कोण कोणती कामे आहेत. ती कामे करूनच मरशील. परंतु आदिवासींच्या पोटी जन्माला आलास तर या निसर्गाच्या सान्निध्यात राहून स्वच्छंदपणे, मनसोक्तपणे जीवन जगता येईल. त्यामुळे या जंगलाचा राजा होऊन आनंदित जगता येईल. असे वर्णन करतात. भारतात आर्य आगमनापूर्वी आदिवासी गोंड, भिल्ल, क्षेत्रिय समूहाची अवस्था कशाप्रकारची होती त्याबद्दल म. ज्योतिबा फुले लिहितात–

**"गोंड भिल्ल, क्षत्रिय होते मूळ धनी**
**इराणी मागुनी आले इथे**
**कोळी भिल्ल शराने तोडिले**
**हाकलूनी दिले रानोवनी"2**

आर्यांच्या आगमनापूर्वी आदिवासी समूहाचे या ठिकाणी राज्य होते. आदिवासी हा या भूमीचा मूळ रविासी असून आर्यांनी त्यांच्यावर आक्रमणे केली. त्यांच्यावर हल्ले केल्यानंतर शरण न जाता हा समूह आपले स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी डोंगर–दऱ्या, कपारीचा आश्रय घेतला. त्यामुळे आजचा आदिवासी समूह रानावनात वास्तव्य करताना दिसतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील हा समाज उपेक्षित जिणे जगत आहे. शासनाच्या योजना सुविधा पोहोचण्यास उशीर लागला. त्यामुळे आदिवासी समूह शैक्षणिक व्यवस्थेत उशिराने पदार्पण करत असल्याचे दिसते. या उपेक्षित वर्गाचे साहित्य जवळपास 1960 नंतरच निर्माण झालेले दिसते. उपेक्षित वर्ग शिक्षण घेतल्यावर आमचे प्रतिबिंब या साहित्यात दिसत नाही. म्हणून साठोत्तरी कालखंडात साहित्य निर्माण करू लागला. त्यालाच आज 'साठोत्तरी वांगङ्मयीन प्रवाह' असे आपण म्हणतो.

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समूह शिकू लागला, बोलू लागला, लिहू लागला व प्रस्थापित समाजव्यवस्थेने मूळ रहिवासी असणाऱ्या आदिवासींना वनवासीकरण केले. आदिवासी समूह निसर्गाच्या

सान्निध्यात मुक्तपणे जीवन जगणाऱ्या भोळ्या–भाबड्या आदिवासीं समूहावर संधी साधून अन्याय केला. अनेक प्रसंगी शोषण केले. त्यामुळे कवी भुजंग मेश्राम लिहितात–

**''ते आले तेव्हा भटकंती होती**
**आणि आमच्याकडे इतिहास.**
**आपण सर्वच करू आदलाबदल**
**अन् बदलू जग.**
**केला विश्वास**
**आता त्यांच्याकडे आहे इतिहास**
**अन् आमच्याकडे विमुक्त''3**

अशा प्रकारे कवी आपल्या मूळ व्यवस्थेबद्दल मांडणी करताना दिसतात.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आदिवासी मागे राहिले नाहीत, परंतु इतिहासाची मांडणी करणारा वर्ग आदिवासी क्रांतीकारांचा उल्लेख केलेलाच नाही. त्यामुळे वाहरू सोनवणे 'नाकारलेल्या आदिवासींचा इतिहास' या शीर्षकाखाली निबंध लिहितात. तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, खाज्या नाईक यासारखे अनेक शूरवीर क्रांतीनायक इंग्रजांविरुद्ध लढले. परंतु पराक्रमाचा खरा इतिहास रचना गेलेला नाही. उलट आदिवासींना चोर, लुटेरे, दरोडेखोर अशा प्रकारचा शिक्का त्यांच्या माथी मारला. याची खंत आधुनिक काळातील कवी वामन शेडमाके या सदंर्भात लिहितात–

**''आदिमा इतिहास तुझा सत्य आहे**
**संघर्ष क्रांती हाच तुझ्या मुक्तीचा मार्ग आहे**
**म्हणूनच क्रांतिवीर नारायणसिंह उईकेचे नाव अजरामर आहे**
**स्त्री होती मर्दानी राणी दुर्गावती गटमंडल्याची सम्राज्ञी**
**इंग्रजी सत्तेपुढे न झुकता**
**आदिवासींच्या प्रश्नाला न्याय दिला मिळवूनी.''4**

आदिवासी शूरविरांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला परंतु लिहिणाऱ्यांनी तो खरा इतिहास न लिहिता आदिवासींचा इतिहास दाबून टाकला. आदिवासींचा गौरवशाली इतिहास लपवून ठेवले. तो इतिहास आजचा तरूण आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडणी करत आहे. याबद्दल कवयित्री कुसुम आलाम लिहितात–

**''गलत लिहिणाऱ्यांनो लक्षात ठेवा**
**सुवर्णाक्षरांनी लिहिण्या जोगा आमचा इतिहास**
**मी अजूनही घडवत आहे**
**घडवतच राहणार आहे.''5**

असे इतिहास लिखाण करणाऱ्या लेखकांनी आदिवासींच्या शौर्य–पराक्रमांबद्दल खरे ते लिहिले नाही. तरीदेखील क्रांतिकारक यांपासून प्रेरणा मिळते. त्यांना जगण्याची नवी उर्मी प्राप्त हेते. ही उर्मी जीवनात बळही देते, त्या संदर्भात कवी विनायक तुमराम लिहितात–

**''गोंडवन पेटले आहे**
**गोंडवना तुझ्या भूईच्या**
**आदिपुत्रांचे घायाळ जगणे**

**देऊन जातो माझ्या जगण्याला आव्हान.''6**

आदिवासी समाज वर्षानुवर्षे उपेक्षित राहिला परंतु आजच्या तरुणांना शिक्षणामुळे आत्मभान आल्याने तो जागृत झाला. उपेक्षित जीवन त्यांच्या वाट्याला आले त्याचा शोध घेत–घेत आदिवासी इतिहासाची नवीन मांडणी करताना दिसतात. त्याचबरोबर मुख्य प्रवासाहातील दमणनीती कशा प्रकारची आहे. संदर्भात वाहरू सोनवणे 'स्टेज' या कवितेतून लिहितात–

**''आम्ही स्टेजवर गेलोच नाही**
**आणि आम्हाला बोलवलही नाही**
**बोटाच्या इशाऱ्याने आम्हाला**
**आमची पायरी दाखवून दिली**
**आम्ही तिथेच बसलो**
**आम्हाला शाबासकी मिळाली**
**आणि स्टेजवर ते उभे राहून**
**आम्हाला आमचेच दुःख ते सांगत राहिले**
**कधीच त्यांचे झाले नाही**
**आमची शंका आम्ही कुजबुजलो**
**ते कान धरून दम भरला**
**माफी माग नाहीतर......''7**

प्रस्तापित समाजव्यवस्थेने आदिवासींना त्यांची जागा दाखवून दिली आणि त्यांना तिथेच ठेवले. आदिवासी आपले जीवन जगण्याच्या संदर्भात हे तर आपलेच जीवन आहे. असे कुजबुज केली असता माफी मागण्यास सांगितले नाहीतर.... अशी दमकी दिली. आदिवासी समूह मुळातच साधा आणि सरळ मार्गी जीवन जगणारा, कमी बोलणारा असल्यामुळे स्वतःहून व्यासपीठावर गेलास नाही आणि त्यांना बोलवले देखील नाही. परंतु आधुनिक काळात शिक्षणाने जागृत झालेला तरूण पुढे येऊन अशा या अन्याय–अत्याचारा संदर्भात प्रश्न विचारू लागला. कवी दया पवार कोंडवाडा या काव्यसंग्रहात 'महाकवे' कवितेमधून लिहितात–

**''हे महाकवे**
**तुला महाकवी तरी कसे म्हणावे....**
**हा आमचा अन्या–अत्याचाराचा**
**एक जरी श्लोक तू रचला असतास**
**तर तुझे नाव काळजात कोरले असते.''8**

बहुजन समाजाला सुरुवातीपासूनच या वर्णव्यवस्थेने नाकारलेले आहे. त्यांच्यावर होणारे अन्याय–अत्याचार सतत होत राहिले. यासंदर्भात महाकवीने एक जरी श्लोक रचना असता तर तुझे नाव काळात रचले असते. त्यासंदर्भात कवींनी कवितेच्या माध्यमातून जॉब विचारत आहे. म. ज्योतिबा फुले यांनी 'जातीसाठी माती खाई' असे म्हटले आहे. आधुनिक काळात देखील स्वार्थासाठी याची बीजे समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारे पेरली जात असल्याचे दिसते.

आदिवासी समाज सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत असला तरी आर्थिक आणि सामाजिक शोषणातून सुटला नाही. घटनेने त्यांना अधिकार दिले असल्यामुळे त्यांचा विकास होताना दिसत आहेत.

तरीदेखील काही शोषणकर्ते शोषण करत असल्यामुळे रक्षण कर्तेच भक्षक होत असतात. त्यासाठी आपल्यात बदल होणे गरजेचे आहे. आदिवासी स्त्रियांनी परिस्थितीला सामोरे जाऊन मार्ग काढावा लागणार आहे.

**''सख्यांनो निर्धार करू या**
**आपण सावित्री फुले होऊ या**
**रणांगणा दुर्गा, झाशीची झलकारी होऊ या**
**आदिवासींची शक्ती होऊ या.''9**

आदिवासी मुली आता हातात लेखणी घेऊन सावित्रीबाई फुले यांच्या मार्गाने निघाले आहेत. त्यांचे विचार आत्मसात करुन स्वतःची प्रगती करण्यात मार्गस्थ झाल्या आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात त्यांच्यावर अन्याय अत्याचार करणाऱ्यांना जाब विचारतील. त्याचा प्रतिकार करण्यासाठी आदिवासी स्त्री उभी राहील.

आदिवासी स्त्रियांवर सुधारलेल्या सुशिक्षित आणि प्रस्तापित वर्ग शोषण कशा पद्धतीने करतो. त्यांची कावळ्यासारखी दुष्ट नजर असते. यासंदर्भात उषाकिरण आत्राम म्होरकी या काव्यसंग्रहात 'पैशाची लाल आग होय' ही कविता लिहितात–

**''वाटेने जाते तर समध्या डोयाला आग लागेल**
**राणे तुझ्यावर नजर समध्या सुधारलेल्या बापट्यांचीच**
**तू रातराणी होऊन ग होशील तर पैशाची लाल आग होय**
**नाहीतर बिबयाची फुल होय**
**तू सूर्यसुळी नागकमळी सुर्यफूल होय**
**हो तांबडी पळसाची लाल अंगार**
**तरच उठून दिसेल या बाजार सुक्याले तुझा शृंगार''10**

मुख्य प्रवाहातील प्रस्थापित लोकांकडून होणारे आदिवासी स्त्रियांवरील अन्याय अत्याचार हे आज काही विकृत मानसिकतेच्या या लोकांकडूनच वाढताना दिसत आहे. स्त्रियांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचार या बद्दल कवी वाहरू सोनवणे 'स्त्री' या कवितेत लिहितात–

**''एक वस्तू अशी आहे**
**तिला वाटेत घाटेत सापडेल तिथे रोखावे**
**वाटले तर मिठीत घ्यावे**
**हौस फिटली तर सोडून द्यावे**
**आप नहीं गम नहीं।''11**

आदिवासी समूह हा मुळातच वंचित आहेत. स्त्रियांवर अत्याचार करून देखील प्रकरणे दाबली जातात. कारण पुढे गेल्यावर त्यांना न्याय मिळेलच असे नाही. उलट त्यांची पत, इज्जत, अब्रू चव्हाट्यावर आणण्याचे प्रयत्न केले जातात. या उपेक्षित समाजाला वाली कोणीच नसेल तिथे योग्य तो न्याय मिळेलच असे नाही. अशा प्रकारचे अनेक प्रश्न आदिवासींच्या वाट्याला आलेले दिसतात. अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.

आदिवासींचे शोषण वर्षानुवर्षे होत राहिले. परंतु आधुनिक काळात ते आम्ही सहन करणार नाही. त्यासाठी शोषणकर्त्या समाजव्यवस्थेला कवी इशारा देत आहे. आज 'उलगुलान' सारखे

काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत. सर्वांगीण क्रांतीची भाषा कवी करताना दिसतात. कवी बाबाराव मडावी लिहितात–

**''आता आम्ही लाचारी पत्करून**
**काही सांगणार नाही, शोषणकर्त्यांचे मुर्दे**
**पाडल्याशिवाय थांबणार नाही''12**

आदिवासींवर केलेला अन्याय अत्याचार आजपर्यंत पुर्वजांनी सहन केला, पण ते आता यापुढे लाचारी पत्करून जीवन जगणार नाही. काही सांगणार नाही तर त्यांचे मुर्दे पाडल्याशिवाय राहणार नाही. अशा प्रकारे क्रांतीची भाषा आदिवासी कवी आपल्या काव्याच्या माध्यमातून करताना दिसत आहे.

सुरुवातीच्या काळापासून अनेक राज्यकर्त्यांनी आदिवासींवर अन्याय अत्याचार तर केला, प्रदेश काबीज केला. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातही शासन कर्ते, राज्यकर्ते आणि अधिकारी वर्ग कोणत्या ना कोणत्या स्वरुपात शोषण करतच राहिले. शासन दरबारी आदिवासींच्या विकासाकरिता मोठ्या प्रमाणात निधी जाहीर केला जातो. परंतु तो निधी पोहोचविणारा वर्ग, अधिकारी त्याची अंमलबजावणी पूर्णपणे करतात का? या समूह पार्यंत योजना पोहोचण्यासाठी पुरेपूर वापर करायला हावा. परंतु दुर्दैव असे की, फक्त आपुलकीची मानसिकता दाखवून थोड्या प्रमाणात उपयोगात आणणे आणि राहिलेला निधी गिळंकृत करणे. किंवा उपयोगात न आणणे. अशाप्रकारे शासनाचा आदिवासीं करिता आलेला निधी उपयोगात आणल्याचे दाखविले जाते. बऱ्याच वेळा तर हा निधी विकासाकरिता न वापरता परत जात असतो. आदिवासी समूह ज्या प्रदेशात राहतो. त्या भागात जाण्याकरिता रस्त्याची आवश्यकता असते. तेथे दळणवळणाची कमतरता असतील. अशा ठिकाणी अधिकारीवर्ग जाईल का? प्रत्यक्ष भेटी देऊन त्या कामाची पाहणी करेल का? अशा प्रकारच्या अनेक समस्यांना अधिकारी वर्गांना सामोरे जावे लागते. त्याच बरोबर सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भाषेची अडचण असते. यामुळे आदिवासी समूह दुर्लक्षित असल्याने आधुनिक काळातील कवी त्यांचा नाकारलेला इतिहास, दुःख, दैन्य, दास्य, शोषण, अन्याय अत्याचार, स्त्रियांचे दुःख आपल्या काव्याच्या माध्यमातून साकारताना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ :**


1. कुमरे सुनील, तिरकामठा, गोंडवन साहितय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1991, पृ.क्र. 34
2. मेश्राम भुजंग, उलगुलान, साकेत प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती 1995, पृ.क्र. 85
3. महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा फुले समग्र वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, आवृत्ती पाचवी 1991, पृ. क्र. 496
4. रोंगटे तुकाराम, आदिवासी कवितेचा उषःकाल, डिंपल पब्लिकेशन ठाणे, प्रथमावृत्ती 2007 2007, पृ.क्र. 58
5. आलम कुसुम, रान आसवांचे तळे, मुद्रक बनहट्टी नागपूर, प्रथमावृत्ती 1998, पृ.क्र. 39
6. मुनघाटे प्रमोद, आदिवासी मराठी साहित्य स्वरुप आणि समस्या, प्रतीक्षा प्रकाशन पुणे, प्र.आ. 2007, पृ.क्र. 89
7. सोनवणे वाहरू, गोंधळ, सुगावा प्रकाशन पुणे, आवृत्ती 2006
8. दया पवार, कोंडवाडा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
9. कांबळे अमर, मराठी आदिवासी साहित्य, निर्मिती संवाद, प्रा. लि. 873 क/2. सी वार्ड सिद्धीर्थ प्लाझा, कोल्हापूर, प्रथमावृत्ती 2016
10. वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्यः एक अभ्यास, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2009

# मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टिक्षेप

**शेख शफी बोल्डेकर**

संस्थापक, ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, मु. पो.बोल्डा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली.

मराठी साहित्य विश्वात अनेक साहित्य प्रवाह रूढ झाले आहेत . आणि हे सर्व एकाएकी घडले असे नाही. या प्रवाहांच्या पाठीमागे वैचारिक बैठक आहे. ह्या आधुनिक मराठी साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्य समृध्द केले आहे. तत्वतः काही परिवर्तनेही घडविली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाचा प्रसार व प्रचार वाढत होता. निरनिराळे समाजस्तर शिक्षणाच्या कक्षेत येत होते. अभ्यासक्रमाच्या निमित्ताने किंवा आवड म्हणून साहित्य वाचले जायचे, पण त्या साहित्यातून आपला गांव, आपली माणसे, आपला समाज, आपला शिवार, आपली माती, आपली सुखदुःखे, आनंद, यशापयश, विचार, आंदोलने, आणि भावना यांचे दर्शन होत नव्हते. गावगाड्यातला माणूसपणाचा धडा शिकवणारा मुसलमान साहित्याचा नायक होऊ शकलेला नाही. म्हणूनच १९५० नंतरच्या काळात साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत गेला व नवनवीन प्रवाह निर्माण झालेत, त्यामुळे एकूणच मराठी साहित्य विकसित होण्यास मदत झाली आहे. "मुस्लिम मराठी साहित्य" हा साहित्याचा प्रमुख साहित्य प्रवाह आहे.तर ग्रामीण मुसलमान हा त्याचा प्रमुख मूलाधार आहे. मुस्लिम मराठी साहित्य ही संज्ञा साहित्य व्यवहारात रूढ करणारे सांगलीचे आद्य साहित्यिक पहिले आमदार सय्यद अमीन यांची चौवीस पुस्तके प्रकाशित आहेत तर अनेक मुस्लिम मराठी संतकवींनी मराठी साहित्य समृध्द केले आहे. ग्रामव्यवस्थेमधील प्रमुख घटक असणारा ग्रामीण मुसलमान गावगाड्यात इतर धर्मीयांशी सहजीवन जगत आला आहे. गावगाड्यात तो शेती व शेतीची कामे, गवंडीकाम, कुठेकुठे मुलाण्याचा व्यवसाय करताना दिसतो.ज्या ग्रामव्यवस्थेमध्ये कवी, लेखक राहतो, ती ग्रामव्यवस्था त्यांच्या साहित्यातून अजाणता का होईना, प्रकट होत राहते. या अर्थाने ग्रामीणत्वाच्या स्पष्ट खुणा त्यांच्या वाङ्‌मयात सापडतात.

भारत हा मुळात शेतीप्रधान आणि खेड्यापाड्यांचा देश आहे. बहुजनांची साहित्यपरंपरा येथल्या ग्रामजीवनाभोवती गुंफलेली आहे. त्यामुळे अनेक समुहाच्या अनेक भाषा आहेत. त्यात बोली भाषा व व्यवहारी भाषा अशा भिन्न भाषा अनेक समुहात बोलल्या जातात. ग्रामीण मुस्लिम समाजात बोलीभाषा व व्यवहारी भाषा अशा भिन्न भाषा आहेत. हा समाज घरी दखनी-उर्दू तर दारी मराठी भाषेत व्यवहार करताना दिसतो .शहरी भागात क्वचितच घरी मराठी भाषेत बोलतो. तसे पाहता ग्रामीण मुसलमान घरी-दारी मराठीतून व्यवहार करताना दिसतो . नव्वदच्या दशकानंतर मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तने घडली. हा समाज मराठीतून मोठ्या प्रमाणात शिक्षण घेताना दिसतो आहे. त्याचाच परिणाम म्हणून तो मराठी भाषा उत्तम बोलतो, वाचतो आणि आपले अनुभव लिहितोही आहे. साहित्य ही एक सामाजिक घटना आहे. हे आता कळायला लागले. म्हणून १९९० साली सोलापूरात अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. स्वर्गीय हाजी अब्दूल लतीफ नल्लामंदू ( कासिदकार) , स्वर्गीय फकरोद्दीन बेन्नूर , स्वर्गीय डॉ .मीर इसहाक शेख, गझलकार ए. के . शेख, डॉ. अजीज नदाफ, कवी मुबारक शेख, शाहीर विश्वासराव फाटे, का. विलास सोनवणे, डॉ. इक्बाल मिन्ने, उदय टिळक यांनी सोलापूरात दोन दिवसीय अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन २३ ,२४ मार्च १९९० ला

हुतात्मा स्मृती मंदीर नामकरण (शहीद कुर्बान हुसेन नगर) येथे प्रा.फ. म. शहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न केले. या संमेलन यशातून अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची कायदेशीर नोंदणी करुन महाराष्ट्रात आठ संमेलने स्वबळावर घेऊन साहित्याचा इतिहास रचला. पुढे वैचारिक मतभेद निर्माण झाले व परिषदेचे कार्य मंदावले. पुन्हा कालांतराने डॉ. शेख इक्बाल मिन्ने यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य व सांस्कृतीक मंडळाची स्थापना झाली. व साहित्यिक उपक्रमाला गती मिळाली असे असले तरी ग्रामीण भागातील साहित्यिकापर्यंत साहित्याची चळवळ पोहचली पाहिजे. या ध्येयाने सन २००१ साली ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळ सुरू झाली. आजघडीला महाराष्ट्रात ही चळवळ सर्वत्र ओळखली जाते.

ग्रामीण भागामध्ये खेड्यात मुस्लिमांची मोजकीचं घरे असली तरी खेड्यातून मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज राहतो. त्यांच्या सभोवतालचा संपूर्ण परिसर मराठीमय असतो यात शंका नाही. त्यामुळे तो शहरी भागातील मुस्लिमांपेक्षा मराठी उत्तम बोलतो उत्तम लिहितो. ग्रामीण भागामध्ये साजरे होणारे सण- उत्सव, पिराचा- वलींचा उरूस, ग्रामदैवतांची जत्रा यांच्याशिवाय ग्रामसंस्कृती पूर्ण होत नाही. हे ग्रामसंस्कृतीचे घटक त्या त्या गावचे एक मानसविश्व निर्माण करतात. सर्व धर्माच्या सर्व मराठी संताच्या अभंगाची भाषा ग्रामीण भागात बोलली जाणारी आहे. अभंगसृष्टीमधून बोलीचा सहज वापर होताना दिसतो.

ग्रामीण परिसरातून झपाट्याने पुढे येणारा नवा उत्साही लेखकवर्ग आपल्या जीवनसमुहातील सुख-दुःख, सामाजिक समस्या यांचे चित्रण आपल्या बोलीभाषेतून अभिव्यक्त करु लागला. अशा साहित्याच्या दरबारात जे मागे मागे उभे आहेत. त्याच्याकडे आता लक्ष दिले पाहिजे. त्यांना आत्मविश्वास दिला पाहिजे. मराठी साहित्याचा दुर्लक्षित मध्यवर्ती ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह प्रवाही व्हावा ! त्यात नवे नवे अनुभव व्यक्त व्हावेत, त्याचे सामर्थ्य वाढावे, भाषाविषयक सामर्थ्य अधिक गतिमान व्हावे, आणि इथल्या संस्कृतीशी असलेले नाते दृढ व्हावे आणि एकूणतः मराठी साहित्य सर्व बाजूंनी समृध्द व श्रीमंत व्हावे ! ग्रामीण साहित्याची चळवळ सांस्कृतिक चळवळ आहे, ग्रामीण साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य आहे. त्याची स्वतःची एक जीवनदृष्टी आहे. अशी भूमिका घेऊन ग्रामीण भागातून लिहीणा-या मुस्लिम मराठी साहित्यीकांची ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळ प्रवर्तक / संस्थापक तथा केंद्रीय कोषाध्यक्ष शेख शफी बोल्डेकरांनी निर्माण केली.

ज्यांच्या घरात शेकडो वर्षांपासून अज्ञान व दारिद्र्य नांदत असेल अशा प्रतिभावंताना या चळवळीची आवश्यकता निश्चितच अधिक असणार आहे यात शंका नाही. महंमद पैगंबर, सूफी संत , संत कबीर , महात्मा फुले , छत्रपती शाहु महाराज , डाॅ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांचे विचार ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्याचे मानदंड आहेत. ही चळवळ हक्काने बोलतो ही मराठी आणि लिहितोही मराठी अशी मराठीची सर्वांगाने साक्ष देणारी आहे. या ऐतिहासिक ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीला मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश या क्षेत्रात अधिक गतिमान करण्यासाठी अनेक मान्यवर साहित्यीकांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. ही चळवळ १ मे २००१ ला स्थापन झाली आहे. आता चळवळीतून (शासन नोंदणीकृत) "ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य" या नावाने संस्था स्थापन करण्यात आली आहे. गेल्या काही दशकापासून मुस्लिमांविषयी जाणिवपूर्वक द्वेष पसरविला जातो. त्याचाच परिणाम म्हणून एकनाळी गावात मुस्लिमांना प्रवेशबंदी करणे. त्यांच्यापासून माल विकत न घेणे, माल लुटणे , अपमानित करणे अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा परिस्थितीत साहित्यीकांनी जागृत राहून

अशा घटनांना शब्दबध्द करून कविता, कथा, कादंबरी, नाटक, असे साहित्याचे विविध प्रकार हाताळणारे साहित्याचं साहित्यपण जपून गुणवत्तापूर्ण साहित्य निर्माण करणारे साहित्यिक निर्माण होत आहेत. ही चळवळीच्या दृष्टीने अत्यानंदाची बाब आहे.

ग्रामीण मुसलमान हा गावगाड्यात रमणारा समाज असला तरी जाणीवपूर्वक प्रस्थापितांनी कानाडोळा केलेला दुर्लक्षीत समाज आहे. खुल्या प्रवर्गात असल्यामुळे त्याला कुठल्याचं शासकीय योजनेचा फायदा होत नाही. राहायला घर नाही, टोपलं टेकवायला शेत नाही. मग जगायचं कसं ? नेहमीच संघर्षात असल्यामुळे त्याची दैन्यदशा झाल्याचे दिसून येते व सोबतच भरीसभर म्हणून

वाढलेले धार्मिक कर्मकांड, हिंदूमुस्लिम तणाव अशा परिस्थितीत अज्ञानी आणि मूढ लोकांचे उद्बोधन करणे, मुस्लिम साहित्यीकांना मोठे विचारपीठ मिळवून देणे. साहित्याद्वारे समाजाचे प्रश्न मांडणे व सोडवणे. भाषिक ऐक्य निर्माण करणे. समतावादी संविधानीक समाजाच्या निर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे. ग्रामीण मुस्लिम समाजात शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व मराठी राजभाषेतून शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हे या चळवळीचे प्रमुख उद्देश आहेत. वाङ्‌मयीन चळवळ ही वाङ्‌मयापुरती असत नाही तर ती जीवनसंघर्षाचा एक अपरिहार्य भाग बनते. ग्रामीण जीवनातील आज निर्माण झालेले बहुसंख्य प्रश्न जातीव्यवस्थेने निर्माण केले आहेत. तसेच अर्थव्यवस्था ही कारणीभूत आहे. याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे सर्वच पदाधिकारी साहित्यिक आहेत. संस्थेचे अध्यक्ष कवी हाशम इस्माईल पटेल लिखीत 'संग्राम' २०१३ व 'डोंगराचा आक्रोश' २०२१ हे कवितासंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांची 'शांतीगीत' या शिर्षकाची कविता आतंरभारती इयत्ता नववी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक शेख शफी बोल्डेकर यांचा 'आम्ही मराठी मुसलमान' २००७ हा काव्यसंग्रह ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्यातला एक महत्त्वाचा काव्यसंग्रह आहे.तसेच "डिझेलगाडी" २०१४ हा बालकवितासंग्रह बालसाहित्यातला पहिला दीर्घ बालकवितासंग्रह म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस यांनी या संग्रहाचा जाहिर गौरव केला आहे . औरंगाबादचे डॉ. हबीब भंडारे यांचे 'माळावरची पेरणी', ढेकळाचा गंध', ' मरणाच्या दारात जगण्याचा अर्थ शोधणारी माणसं', 'जगणं विकणा-या माणसाच्या कविता' हे काव्यसंग्रह महत्वाचे संग्रह आहेत. गझलकारांमध्ये बदिऊज्जमा खावर यांचे नाव अग्रेसर आहे. मूलत: कोकणातले उर्दू भाषी असलेले हे शायर. यांच्यामुळे मराठी गझल समृद्ध झाली. त्यांच्या गझलांचे संकलन डॉ. राम पंडित यांनी केले आहे.

तसेच सोलापूरचे सरफराज अहमद हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे इतिहास अभ्यासक आहेत.ते मध्ययुगीन इतिहासकार म्हणून प्रसिद्ध आहेत. हे स्वातंत्र्यवीर टिपू सुलतान स्थापित "सल्तनत-ए -खुदादाद" या पुस्तकाचे लेखक .आत्तापर्यंत या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. सोलापूरचे बदीऊज्जमा बिराजदार उर्फ साबीर सोलापूरी हे प्रख्यात गजलकार व समिक्षक आहेत. उस्मानाबादचे कवी डि. के. शेख हे उत्तम लावणीकार आहेत. बुलडाणा येथील शेख बिस्मिल्ला सोनोशी यांचा "मीच त्याचं बोट धरलं" हा काव्यसंग्रह विशेष गाजला. बार्शीचे शब्बीर मुलाणी यांच्या नावावर विपुल ग्रंथसंपदा आहे. मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचा लेखाजोखा शब्दबद्ध करून स्मृतीग्रंथ प्रकाशीत केले आहेत. मेहबूब जमादार यांचे 'ऊरूस' २००९, 'माया' २०११, 'माफी' २०१२ हे कथासंग्रह प्रकाशीत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील शौकत नदाफ यांची "आनंदचक्र" २०२० ही कादंबरी

अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आली. प्रा. सैय्यद अल्लाउद्दीन, कवी मुबारक शेख, अजीम नवाज राही, प्रा.डॉ. रफीक सूरज, फारूक काजी, प्रा. रसूल सोलापूरे, डि. के. शेख, साहिल शेख, रमजान मुल्ला, सफरअली इसफ यांचे लेखन महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष बशीर मुजावर, पुणे यांच्या नावे १४ कथासंग्रह आहेत. समाजवास्तवाच्या जाणिवा प्रकट करणारा चंद्रपूरचा युवा कवी इरफान शेख यांचा "माझ्यातला कवी मरत चाललाय" हा कवितासंग्रह प्रतिष्ठीत पुरस्काराने सन्मानित झाला आहे. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्यात मुस्लिम स्त्री साहित्यिकांचे योगदान दखलपात्र आहे .अनिसा सिकंदर शेख व दिलशाद यासीन सय्यद संपादित "फातिमाबी शेख " २०२१ हा ऐतिहासिक प्रातिनिधिक काव्यसंग्रह ठरला आहे. सोलापूरच्या नुरजहाँ शेख यांचा "माझं शिवार" २०१४ काव्यसंग्रह, अनिसा शेख लिखीत 'संवाद हृदयाशी', 'सांगाती' २०२१, तर दिलशाद सय्यद लिखित 'रंग उन्हाचे' २०२१. रायगडच्या कवयित्री सायराबानू चौगुले यांचा "चांदण शब्दांचं "२०२१ हे कवितासंग्रह ,परवीन कौसर लिखीत 'मानसी' २०२१ कथासंग्रह, नसिम जमादार लिखीत बालकथासंग्रह " सारिका " २०२१ ही पुस्तके उल्लेखनीय आहेत. कवयित्री निलोफर फणिबंद यांचे सूत्रसंचालन प्रभावी असते. जस्मिन शेख बालकवयित्री म्हणून प्रसिध्द आहेत त्यांचा "गट्टी मुळाक्षरांशी" २०१७ ला हा बालकाव्यसंग्रह प्रकाशीत झाला. जबीन शेख यांचा "नदी आणि मी" २०२० ला तर सिन्नरच्या कवयित्री मलेका शेख यांचा "मानसमेघ" काव्यसंग्रह २०११ ला प्रकाशित झाला. तर अहमदपूरच्या कवयित्री शाहिदा सय्यद यांचा "प्रतिबिंब" हा काव्यसंग्रह सन २०१८ साली प्रसिद्ध झाला. लातूरच्या तहेसीन मसुदअली सय्यद यांचा "घन बरसुन गेले" हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सदस्य राहिलेल्या फरझाना इकबाल लिखित "हुंदका" २००७ व "इमान मातीशी" २००९ ह्या कवितासंग्रहाच्या आवृत्ती प्रकाशित आहेत .नेरूळच्या शबाना मुल्ला, शगुफ्ता शेख, हसीना पठाण, रेश्मा नदाफ, आयशा नदाफ, नजमा शेख, शबाना शेख, शरीफा तांबोळी, ॲड. शबाना मुल्ला, रजिया दबीर, डॉ. सामिया शेख, कमरूनिसा शेख, हसिना मुलाणी, परविन मीठागरी

ह्या उत्तम कवयित्री आहेत. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीची संरचना गावप्रमुख, तालुकाप्रमुख, जिल्हाप्रमुख, विभागप्रमुख अशा पध्दतीची असून महाराष्ट्रात ही चळवळ अधिक गतिमान होताना दिसते आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात चळवळीसाठी पदाधिकारी निवडल्या जात आहेत. केंद्रीय अध्यक्ष तथा मराठवाडाप्रमुख ॲड. हाशमपटेल, मार्गदर्शक प्रा. मैनोद्दीन मुल्ला साहेब, केंद्रीय सचिव डॉ. सय्यद जब्बार पटेल हे संत नामदेव चरित्राचे अभ्यासक असून कवी आहेत. केंद्रीय कार्याध्यक्ष डॉ. महंमद रफी शेख यांनी मुस्लिम मराठी साहित्यावर संशोधन केले आहे. केंद्रीय सदस्य इस्माईल कादरसाहाब शेख हे दर्जेदार कवी आहेत. कवी वाय. के. शेख यांचा "चांदण फुले" २०२१ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. केंद्रीय सदस्य महासेन शंकर प्रधान हे सामाजिक जाणिवेचे कवी आहेत. विदर्भ विभाग प्रमुख शेख बिस्मिल्ला सोनोशी, खानदेश विभागप्रमुख ॲड. जमील देशपांडे हे मुस्लिम मराठी साहित्याचे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. केंद्रीय उपाध्यक्ष तथा पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख खाजाभाई बागवान हे नव्या दमाचे कवी आहेत. पुणे जिल्हाध्यक्ष बा. ह. मगदूम यांचे 'नक्षत्रपेरणी', 'अक्षरकाकरी' २०२१ हे काव्यसंग्रह आहेत. बुलडाणा जिल्हाध्यक्ष कवी बी. एल. खान यांचा "नवरंग" हा गीतकाव्यसंग्रह २००२ साली प्रकाशित झाला आहे. नांदेड जिल्हाध्यक्ष शेख निजाम गवंडगांवकर यांची 'प्रेमप्रबोधन'

२०२० ही कादंबरी प्रसिद्ध आहे. लातुर जिल्हाप्रमुख अॅड. शेख इक्बाल रसूलसाब, परभणी जिल्हाप्रमुख सय्यद चाँद तरोडकर हे ग्रामीण कवी म्हणून प्रसिध्द आहेत. इचलकरंजीचे विद्रोही कवी रशिद बाबू तहसीलदार लिखीत

"आरसा शोध अंतरमनाचा" हा कवितासंग्रह २०२० साली प्रकाशित झाला आहे. सांगलीचे मुबारक उमराणी, सिराज शिकलगार. अहमदनगरचे लतीफ मोहम्मद पटेल, रज्जाक शेख. रत्नागिरीचे इम्तियाज सिद्दीकी. पालघरचे गौसपाशा शेख यांच्या कविता दखलपात्र आहेत. भंडारा येथील ज्येष्ठ कवी दौलतभाई पठाण यांचे झाडीबोली भाषेतील साहित्य प्रेरणादायी असते.

सांगलीचे लेखक आदम युसूफ पठाण लिखीत 'स्वातंत्र्य संग्रामातील मुस्लिम सैनिक' हा ग्रंथ मुस्लिमांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान नव्या पिढीला सांगतो. औरंगाबाद जिल्हाध्यक्ष हबीब भंडारे, सोलापूर जिल्हाप्रमुख जाकीर मोहम्मद तांबोळी,दक्षिण सोलापूर तालुकाप्रमुख सौ. शाहीन शेख, बार्शी तालुकाप्रमुख गौस शेख, वैराग विभाग प्रमुख मोहीद्दीन नदाफ यांच्या मुस्लिम जाणिवा प्रगल्भ आहेत. अहमदनगर जिल्हाध्यक्ष सौ. दिलशाद यासीन सय्यद ह्या उत्तम सूत्रसंचालन करतात त्यांचे प्रभावी वक्तृत्व चैतन्य निर्माण करते. जळगाव जिल्हाप्रमुख मोहसीन मुनाफ शेख यांचे शैक्षणिक व साहित्यिक कार्य सातत्याने सुरू असते. हिंगोली जिल्हाध्यक्ष अहमद पिरनसाहाब शेख हे नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेत. ' गिळली माणसं हुंड्यानं' हे सामाजिक नाटकाचे पुस्तक प्रकाशित आहे. औरंगाबादचे आसेफ शेख (अन्सारी) हे बालनाटककार यांची "आम्ही नाटक करीत आहे" २००७, "कस्तुरी" २०१३ आदि बालनाट्ये प्रसिद्ध आहेत. निपाणी येथील सलीम शेख यांचा १९९२ साली "वळवाचा पाऊस" हा कथासंग्रह प्रकाशित झाला. उस्मानाबाद जिल्हाप्रमुख शेख शाहीद हे उत्तम कवी, गझलकार आहेत. गोंदिया जिल्हाप्रमुख डॉ. नुरजहाँ पठाण यांच्या कविता महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. चिपळूणचे शाहीर शाहिद खेरटकर हे कोकणातील एकमेव शाहीर म्हणून प्रसिध्द आहेत. पंढरपूर तालुकाप्रमुख फिरोजखान बन्सीलाल बागवान हे उदयोन्मुख कवी आहेत. केंद्रीय सहसचिव तथा दौंड तालुकाप्रमुख अनिसा सिकंदर शेख यांची चळवळीमध्ये अग्रणी भूमिका असते. केंद्रीय सदस्य तथा नांदेड तालुकाप्रमुख शेख जाफर राजेसाहाब यांची गीते खूपच मंजुळ असतात त्यांनी ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचे गीत लिहिले आहे. कंधार तालुकाप्रमुख शेख युसूफसाहाब व बिलोली तालुकाप्रमुख जाफर आदमपूरकर हे युवा कवी यांचे लेखन आशावादी आहे. देगलूर तालुकाप्रमुख फजल मुल्ला, नायगाव तालुकाप्रमुख पिंजारी गौस साहाब, मोहोळ जि.सोलापूर येथील कवी, गीतकार सिकंदर मुजावर लिखीत "आपली माणसं आपल्या कविता" हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कळमनुरी तालुकाप्रमुख फ्याज शेख यांचे योगदान चळवळीसाठी मोलाचे आहे. नागपूरचे प्रख्यात साहित्यिक प्रा. जावेद पाशा कुरेशी यांची ग्रंथसंपदा विपुल आहे. 'भारतीय शोषितांचा विद्रोही आवाज - इस्लाम' हा त्यांचा बहुचर्चित ग्रंथ नवी प्रेरणा देणारा आहे. ख्यातनाम कवी खलील मोमीन यांचे वृत्तबद्ध काव्यलेखन मनमोहक असते. सोलापूरचे लक्षवेधी साहित्यिक डॉ. इ. जा. तांबोळी यांनी विपुल ग्रंथलेखन केले आहे. ठाण्याचे युसुफ शेख यांची डिसेंबर २०२१ मध्ये प्रकाशित झालेली "हुसेनभाईचा कुणी नाद न्हाय करायचा !" ही कादंबरी ग्रामीण मुस्लिम समाजाचे वास्तव चित्रण करणारी आहे. साप्ताहिक "कासिद" चे संपादक अयुब नल्लामंदू हे साहित्याचे उत्तम जाणकार असून साहित्य संमेलन आयोजनात पुढाकार घेतात. "स्पंदन" त्रैमासिकाचे संपादक इंतेखाब फराश हे समिक्षक म्हणून ओळखले जातात. मुस्लिम मराठी साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शेख इक्बाल मिन्ने महाराष्ट्रातले नामवंत गजलकार

आहेत. सोलापूरचे प्रा.डाॅ. शकील शेख लिखित "जुबा" कादंबरी प्रसिद्ध असून मुस्लिम साहित्यिकांच्या आत्मचरित्रावरील त्यांचे संशोधन प्रसिद्ध आहे.प्रख्यात व-हाडी साहित्यिक मिर्झा रफी अहमद बेग, चिपळूणचे मुझफ्फर सय्यद हे सर्व मान्यवर मुस्लिम मराठी साहित्यिक आहेत . मुस्लिम मराठी साहित्यिक कसा ओळखावा याविषयी शफी बोल्डेकर म्हणतात मराठी मुलखात जगत असताना साहित्याच्या अंगाने आपले अनुभव विश्व निर्भिडपणे मराठीतून अभिव्यक्त करणारा तोच खरा मुस्लिम मराठी साहित्यिक होय. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीसाठी अन्य भारतीय साहित्यिक बंधू आगे बढोचा सल्ला देत आहेत. त्यात ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस सरांचा वाटा महत्वाचा आहे. मुस्लिम मराठी साहित्य समीक्षेने मराठी साहित्यात मोलाची भर घातली. ते मूल्यवान ग्रंथ पुढीलप्रमाणे १) प्रा. फ. म. शहाजिंदे संपादित "मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरुप आणि लेखक सूची" २) स्व. प्रा. डॉ. अक्रम पठाण लिखीत" मुस्लिम मराठी साहित्य " ३) जळगाव येथील प्रा. डॉ. नसीमा देशमुख लिखीत "मुस्लिम मराठी साहित्य : स्वरुप आणि समीक्षा" ४) प्रा. फ. म. शहाजिंदे व प्रा.फारुख तांबोळी संपादित "मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप " हे ग्रंथ मुस्लिम मराठी साहित्याचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी सज्ज आहेत.

# समकालीन साहित्य : नाटक

(शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहला)


## प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश

डॉ. बाबासाहेब आंबेडक महाविद्याल औंध – पुणे - ६७


समकालीन साहित्य या शब्दात समकालीन म्हणजे आजच्या काळातले अथवा आजच्या काळाबरोबर जाणारे जे साहित्य असते त्याला समकालीन असे म्हणतात. हा शब्द काळाचा निदर्शक आहे. आजच्या काळातील समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले असते,असे साहित्य समकालीन साहित्य होय. त्यातून आजच्या ग्रामीण अथवा दलित समाजाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक चित्रण केले गेले. तत्कालीन समाज जीवनाचे वास्तव चित्रण या साहित्यातून आल्याने ते साहित्य समकालीन साहित्य ठरते.साहित्य म्हटले की समाजजीवनाचे प्रतिबिंब. साहित्यामध्ये समाजातील रूढी- परंपरा, विचार -आचार, जगण्याच्या काही विशिष्ट पद्धती, विशिष्ट संस्कृती इत्यादीसारख्या अनेक विविध गोष्टींचे दर्शन साहित्यातून होत असते. म्हणजेच एकूणच मानवी संस्कृतीचे दर्शन आपल्याला साहित्यातून होत असते. ही संस्कृतीची बीजे समकालीन मराठी साहित्यामध्ये रुजलेली दिसतात. समकालीन म्हणजे काळाबरोबर असणे होय. यातील सम म्हणजे सोबत, बरोबर, समान या अर्थाने याचा बोध होतो. वाचकाच्या व लेखकाच्या सभोवतालचे वर्तमानकालीन आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैचारिक, सांस्कृतिक वास्तव हे एक संघ किंवा एकसारखे नसते तर ते आपल्या प्रत्येक जातीनुसार धर्मानुसार आपआपल्यापरीने, रूढी-परंपरेने घालून दिलेल्या बंधना प्रमाणे असतात. काही ठिकाणी एकाच जातीतील लोक काही चैनी खोर तर काही लोक फक्त कष्ट आणि कष्ट करत राहतात. यामुळे श्रीमंत आणि गरीब, स्पृश्य आणि अस्पृश्य, सवर्ण आणि दलित अशा वर्गवारीत लोकांचे विभाजन झालेले दिसते. या सर्वांचे प्रतिबिंब हे कथा,कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यातून आलेले दिसते. समाजात येणारा प्रत्येक क्षण लेखक संवेदनशील पद्धतीने वास्तवाशी निगडित कलात्मक पद्धतीने चित्रीत करीत असतो. समकालीन म्हणजेखऱ्या अर्थाने १९८०-९० नंतरचे साहित्य हे समकालीन साहित्य मानले जाते. यामध्ये ग्रामीण ,स्त्रीवादी, दलित विद्रोही असे प्रवाह पुढे आलेले दिसतात. समाजातील वास्तवतेचे हुबेहूब वर्णन करणारे व त्या वास्तवातील विसंगतीवर बोट ठेवून त्यावर प्रहार करणारे साहित्य म्हणजे नाटक.हा सगळयात महत्त्वाचा साहित्य प्रकार म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची औद्योगिकक्रांती आणि विज्ञानाने माणसाला मिळालेल्या भौतिक सुखसोयी यातून अनेक प्रश्न निर्माण झाले, या प्रश्नातून अनेक नाटकास अनेक नवनवीन विषय मिळत गेले. म्हणजे नाटक हे जाणीवपूर्वक मनाशी काही हेतू धरून नवी वाट चालून पहाणे होय.असेच हेतुपूर्वक, आशयगर्भ असे नाटक म्हणजे 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' हे होय, राजकुमार तांगडेयांनी याचे लेखन केले असून लोकशाहीर संभाजी भगत यांच्या अथक प्रयत्नातून हे नाटक रंगभूमीवर साकारले गेले. शिवाजी महाराजांचा खरा विचार काय होता आणि वेगवेगळया समूहांनी शिवाजीराजांचा वापर कसा करून घेतला याची मार्मिक उलटतपासणी करणारे हे नाटक. शिवाजीराजांचा खरा विचार समजून घेण्यास मदत करणारे हे नाटक विचार करायला लावते.आधुनिक मराठी रंगभूमीच्या ऐंशी पंच्याऐंशी वर्षांच्या वाटचालीत २०१२ साली दोन नाटकं परंपरेला छेद देत, सरळ चाललेल्या प्रवाहाला वळण देत रंगभूमीवर आली. एका

नाटकाचे लेखन वीस एक वर्षांपूर्वीच झाले, पण ज्याला रंगमंचावर यायला बराच काळ जावा लागला असे गो.पु.देशपांडे यांनी लिहिलेले व अतुल पेठे यांनी दिग्दर्शित केलेले आणि पुणे महापालिकेच्या सफाई कामगार अभिनीत 'सत्यशोधक' हे नाटक. तर दुसरे नाटक राजकुमार तांगडे लिखित, नंदू माधव दिग्दर्शित आणि जालना जिल्ह्यातील शेतकरी ग्रामीण कलाकारांद्वारा अभिनीत 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला'. २० मे २०१२ रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नाट्यगृहात या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.

शिवाजी महाराजांचा खरा विचार कसा होता हे या नाटकातून दाखवून दिले आहे? शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्माच्या समाजासाठी मानवतावादी क्रांतिकारक विचाराचे बीज पेरले होते. पण राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपले वर्चस्व राखण्यासाठी काही सत्ताधारी वर्गाने आपल्या हितासाठी, स्वार्थासाठी लेखकांकडून आदर्श व्यक्तींची चरित्रे आपल्या पद्धतीने बदलून घेतली. त्यातूनच जातीय दंगली, विषमता, उच्चनीचता, भेदाभेद, गरीब-श्रीमंत इत्यादींसारखे अनेक प्रश्न देशापुढे उभे राहिले. अशा प्रश्नांवर प्रहार करण्यासाठी हे नाटक एक ऐतिहासिक सत्य सांगते. चळवळीचे नाटक म्हणून हे नाटक जरी पुढे आले असले तरी ते वादाच्या भोवऱ्यात कुठेही अडकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वच जातींना आपलेसे करणारे युगपुरुष होते. त्यांची ओळख या नाटकाच्या माध्यमातून करून देण्यात आली आहे. शिवाजी महाराज कोणा एका जातीचे, धर्माचे किंवा पंथाचे नव्हते, तर ते कष्टकरी जनतेचे, दीनदलितांचेहोते. शिवाजी महाराज हे सर्वच जाती-धर्मातील लोकांना माणूस म्हणून जगण्यास प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व होते. आजही हाच आदर्श जनतेपुढे असायला हवा, पण काही समूह गट आपल्या स्वार्थापोटी शिवाजी महाराज एका जातीमध्ये गुंफायला जातात. शिवाजी महाराज हे कोणी दैवी अवतार नव्हते, पण माणसाशी माणसा प्रमाणे स्वतः वागणारे व इतरांनीही त्याप्रमाणे वागावे यासाठी आपल्या मतावर ठाम असणारे असे देव माणूस नक्कीच होते. ही बाब प्रत्यक्षपणे आपल्या डोळयासमोर उभे करण्याचे काम 'शिवाजी अंडर ग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकातून होताना दिसते. आपण बारकाईने बारकाईने बघितले असता असे लक्षात येते की यामध्ये काहीतरी वेगळे आहे. ते म्हणजे शिवाजी, मोहल्ला, भीमनगर असे तीन शब्द.हे तीन शब्द हिंदू, मुस्लिम, दलित या जातींकडे लक्ष केंद्रित करतात. या नाटकाच्या प्रवेशाच्या वेळी पडता उघडताच एक गोंधळ सुरू होतो. तेव्हा इंद्र यांना लोकसाहित्यातील दशावताराकडे घेऊन जातो. मनोरंजनातून प्रबोधन होणेसाठी लेखक येथे दशावताराचा, शाहिरी पोवाड्याचा उपयोग करून घेतो. एके दिवशी स्वर्गाचा अधिपती इंद्र हा यमराजाला पृथ्वीतलावरून शिवाजी महाराजांना घेऊन यायचा हुकूम सोडतो. यमराज शिवाजी महाराजांना शोधायला लागतो. ते सापडतात.इंद्राला शिवाजी महाराजांचे आचार-विचार हवे असतात. शिवाजी महाराज हे पृथ्वीतलावर आहेत असे यमाने इंद्राला सांगितलेले स असते. यम जेव्हाशिवाजी महाराजांना न्यायला येतो तेव्हा ते आपला फेटा त्याच्या जवळ देऊन ते परत पृथ्वीतलावर येतात.इंद्र देखील त्याच्या पाठोपाठ येतो. हे सर्व दुष्ट अनुभवताना खूप मजेशीर वाटायला लागते. हे महाराजांना शोधत शोधत भिमनगर मोहल्ला नामक या शहरातील भागात पोहोचतात. तिथे त्याला शिवाजी महाराज कसे होते? त्यांचे वेगळे रूप कसे लोकांनी समजावून घेतले आहे हे त्यांच्या लक्षात येते. याच नाट्यातील दुसरा बहुजन नायक शिवाजी महाराज व महात्मा फुले यांना आपले दैवत मानतो. पण देवांचा राजा इंद्र पृथ्वीवरच्या देवाच्या काळजीने म्हणतो की शिवाजी महाराजांच्या विचारांच्यासहीत त्यांना जेरबंद करून आण. मग यम रेड्यावर टांग मारतो आणि निघतो.

मारली रेड्याला टांग। निघाली यमाची स्वारी।
स्वारी भूतलावरी। री री रं री।।
काहूर यमाच्या मनी। रागाचा पारा।
डोळ्याला धारा।। री री रं री।।

अशा पद्धतीने लोकशाहीर संभाजी भगत यांनी आपल्या कवनातून, आकलनातून आणि आपल्या इच्छाशक्तीतून या नाटकाला संगीताची जोड दिली आहे. त्याचबरोबर रंजनासाठी विनोदी भाषेचाही वापर केला आहे. समाजाची नैतिकता टिकवण्यासाठी मनोरंजनातून प् या नाटकामध्ये जीवनदर्शन रंजन आणि बोध या तिन्ही गोष्टींचा मेळ एकाच वेळी झालेला दिसतो. आणि म्हणूनच या नाटकाच्या बांधणीला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. राजकुमार तांगडे, त्यांची मुलगी वय वर्ष दहा, वसुंधरा, कैलास वाघमारे, श्रावणी लांडगे, मीनाक्षी राठोड, अश्विनी भालेकर या सर्व पात्रांच्या हालचालीतून, त्यांच्या संवादातून वास्तवाची असणारी जाणीव दिसून येते. देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात जातीय दंगली, भाषिक वाद यासारख्या प्रश्नांचे थैमान चालू असताना अशा स्थितीत हे नाटक प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून जगा, इतरांना जगू द्या. असा संदेश देते. जाती-धर्मात न अडकता फक्त माणूसपण राखून कसे जगता येऊ शकते. याचे प्रबोधन हे भारतीय थोर वीरांच्या आचार विचारातून सांगण्याचा खूप मोलाचा प्रयत्न या नाटकातून झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, महात्मा फुले यांना कोणत्या जातीमध्ये बंदिस्त करू नका. तर त्यांचे विचार, त्यांची शिकवण ही देशातील सर्वच लोकांसाठी महत्त्वाची आणि मोलाची आहे. याची जाणीव या नाटकातून करून दिली गेली आहे. अशाप्रकारे 'जुने ते सोने' या उक्तीप्रमाणे आता ही आधीच्या नाटककार यांनी घालून दिलेले संस्कार आधुनिक पद्धतीने बिंबवण्यासाठी किंवा सामाजिक प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी समकालीन मराठी नाटककारांनी फार मोलाचे प्रयत्न केले आहेत. आणि आजही करीत आहेत असे लक्षात येते.दोन गोंधळयांच्या नमनात्मक संवादापासून सुरू होणारं हे नाटक 'फॅण्टसी'च्या तारेवरून तोल सांभाळत इतिहास आणि वर्तमान सहजपणे उलगडून दाखवते. सत्य आणि सत्यच सांगण्याचा वसा घेऊन प्रेक्षकांना नाटकाचा पडदा पडण्याच्या वर्तमान क्षणापर्यंत एका विचाराने बांधून ठेवते.

समारोप :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, महात्मा फुले यांसारख्या महापुरुषांना समजून घेताना त्यांचे आचार, विचार समजून घ्या. त्यांना कोणत्याही एका चौकटीत बंदिस्त न करता त्यांची शिकवण आचरणात आणण्याचा प्रयत्न करा.

निष्कर्ष :

१) समकालीन साहित्याची संकल्पना स्पष्ट झाली.

२) शिवाजी महाराजांची असणारी सर्वसमावेशक दृष्टीचे दर्शन झाले.

३) नाटक या वाङ्मय प्रकारचे असणारे वेगळेपण लक्षात आले.

४) शिवाजी महाराजांविषयीचा खरा इतिहास समजण्यास मदत झाली.

संदर्भ ग्रंथ:

१) समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रेरणा – द.भी.कुलकर्णी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००३

२) २००० नंतरच्या साहित्य प्रवाहांचे स्वरूप आणि आकलन – संपा.डॉ.मारुती कसाब, सिद्धी पब्लिकेशन हाउस, नांदेड.

३) साप्ताहिक साधना – २५ फेब्रुवारी २०२२

# समकालीन मराठी साहित्यात नंदा खरे यांचे योगदान

**प्रा. अभिजीत इंगळे**

**प्रस्तावना:**

अनंत यशवंत खरे ऊर्फ नंदा खरे हे मराठी भाषेतील एक महत्त्वपूर्ण साहित्यिक आहेत. त्यांच्या स्वतंत्र व भाषांतरित लेखनामध्ये समाजशास्त्रीय, ऐतिहासिक आणि वैज्ञानिक विषयांना मध्यवर्ती स्थान दिलेले आढळते. 'वीसशे पन्नास', 'अंताजीची बखर', 'बखर अंतकाळाची', संप्रति' आणि 'उद्या' ह्या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'ज्ञाताच्या कुंपणावरून', 'डार्विन आणि जीवसृष्टीचे रहस्य', 'जीवोत्पत्ती....आणि नंतर', 'कहाणी मानवप्राण्याची आणि 'दगड धोंडे' इत्यादी विज्ञानविषयक त्यांचे संग्रह प्रकाशित आहेत.

त्यांची भाषांतरित पुस्तकेदेखील प्रकाशित आहेत. त्यांमध्ये 'वारूळपुराण', 'कापूस कोंड्याची गोष्ट, 'ऑन द बीच', आणि 'इंडिका' यांचा समावेश आहे. तर 'गावगाडा:शतकानंतर' हे त्यांचे संपादित पुस्तक प्रकाशित आहे. सभोवतालच्या वास्तवाला, जगभरातील घटना घडामोडींना कवेत घेणारे आणि मूल्यात्मक -हासाची चिंता व्यक्त करणारे नंदा खरे यांचे लेखन वाचकांना अंतर्मुख करीत जाणारे आहे. नंदा खरे यांचे साहित्य समजून घेताना खूप संयम बाळगावा लागतो. परत परत मागे जाऊन वाचावे लागते आणि त्यानंतर जगभरातील कितीतरी घटना-प्रसंगांची एकमेकांमधील गुंतागुंत आणि ताणेबाणे उकलू लागतात.

विवेकवादी आणि विज्ञानाधारित भूमिकेचा पुरस्कार त्यांनी केल्याचे त्यांच्या लेखनात दिसून येते. साहित्य आणि विज्ञान एकत्र करणारा लेखक, जागतिक पातळीवर झपाट्याने होत असलेल्या सामाजिक, तांत्रिक, आर्थिक बदलांच्या दिशेवर भाष्य करणारा भविष्यवेधी टीकाकार म्हणून मराठी साहित्य विश्वातील नंदा खरे यांचे लेखन महत्त्वपूर्ण ठरते.

नंदा खरे अनेक विषयांत रूची असणाऱ्या प्रज्ञावंत अशा अपवादभूत लेखकांपैकी एक आहेत. मानवाच्या उत्क्रांतीच्या इतिहासापासून, स्थापत्यविज्ञान, पर्यावरण, अनुभवकथन, सृष्टिविज्ञान, विज्ञान व सामाजिक स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे.

नंदा खरे यांनी मराठीतील रूढ ऐतिहासिक कादंबरीला नवे परिमाण देण्याचे काम केले आहे. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून 'व्यक्तिकेंद्रा' ऐवजी समाज-संस्कृती समूह इत्यादींचे संदर्भ अधिक सापडतात. या कादंबऱ्यांमधून त्यांनी ऐतिहासिक, समकालीन सामाजिक वास्तव आणि भविष्याचा वेध घेतला आहे. तत्कालीन सामान्य माणसांचा व घटना घडामोडींचा तटस्थ इतिहास शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

नंदा खरे यांच्या कादंबऱ्यांमध्ये अनेक शक्यता वर्तवल्या आहेत. वर्तमानाच्या भूमीवरून इतिहास आणि भविष्याच्या संभव शक्यता यांच्या कादंबरीत आहेत. आधुनिकता आणि उत्तर आधुनिक काळातील अंतर्विरोध आणि महापेचांनी यांचे लेखन आकाराला आले. त्यांच्या साऱ्या लेखनामागील खोलवरची मानवीयता समजून घेणे हे खरे वाचकांसमोरील आव्हान आहे.

खरे हे चिंतनशील कादंबरीकार आहेत. भोवताल, स्थानिकता ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील बदलदृष्टी त्यांच्या लेखनात आहे. या बदलाचे मानवी जीवनावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहे. वैचारिक कादंबरी म्हणून त्यांच्या कादंबरीला विशेष महत्त्व आहे. मराठीतील वास्तववादी कादंबऱ्यांच्या पार्श्वभूमीवर खरे यांच्या कादंबरीमध्ये अभिनव आणि प्रयोगशीलता आढळते. त्यांत सामाजिक, राजकीय जाणिवांचे गडद असे सूचन आहे. खरे यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप रूढ कादंबऱ्यापेक्षा वेगळे आहे. कथनतंत्रे, पात्ररचना, प्रयोगशीलता व भाषा या बाबतीत वेगळ्या गोष्टींचा अवलंब नंदा खरे यांनी केला आहे. नायकविरहीत कादंबरीत

अनेक आवाज मिसळले आहेत. विभिन्न स्वरूपाची आशयसूत्रे, चित्रणप्रदेश, मानवी स्वभाव व भाषारूपांचा आढळ त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये बघावयास मिळतो. सामाजिक, आर्थिक बदलाची व भयमूल्यांची संसूचना देणाऱ्या अनेक गोष्टींचा अवलंब ते करतात. त्यात संवादचर्चा विपूल आढळते. आधुनिकोत्तर काळाचे एक सूचन म्हणून विकीर्ण, अशी सूत्रे भाषेच्या सरमिसळीतून त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये साकारली आहेत. प्रश्नविचारांची वाहक म्हणून त्यांची पात्रे क्रियाशील आहेत. तसेच कथन कमालीचे तटस्थ आहे, तरी त्यात कथनकर्त्यांचा 'आवाज' अध्याहृत आहे. नोटबुकातील नोंदी, प्रशासकीय अधिकाऱ्याचे अहवालपत्र नमुने, संख्यात्मक आकडेवारीचे ठिकठिकाणी निर्देश आदींचा समावेश त्यांच्या आकृतिबंधात आढळतो. कादंबरी हा साहित्यप्रकार म्हणजे ज्ञानमाहितीचा प्रचंड साठा असतो, याचा पुरेपूर प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, भूगोल,जीवशास्त्र अशा ज्ञानशाखांतील माहितीचे अनेकविध तपशील त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहेत.

शैली आणि आशयाच्या दृष्टीने 'अंताजीची बखर' व 'बखर अंतकाळाची 'ह्या त्यांच्या कादंबऱ्या लक्षणीय ठरतात. अठराशे सत्तावनच्या संदर्भात राजेरजवाडे यांवरील लेखनाला अपवाद करीत या काळातील एका सामान्य शिपाई असणाऱ्याला नायकत्व देऊन सभोवतालचे वास्तव टिपण्याचा प्रयत्न त्यांनी 'अंताजीची बखर' या कादंबरीतून केला आहे. तत्कालीन जनजीवन समजून घेण्याचा हा अफलातून प्रयोग आहे, असे मानले पाहिजे. इतिहासाचे वाचन करण्याची ही एक स्वतंत्र पद्धती असावी, हे त्यांनी यानिमित्ताने ठसठशीतपणे अधोरेखित केले.

नंदा खरे यांची बखर अंतकाळाची 'ही कादंबरी देखील इतिहास काळातील राजेरजवाड्यांच्या सत्ता, सनावळ्या, त्यांच्या लढाया यावरच केंद्रित राहत नाही. तर तत्कालीन सामान्य लोक काय करीत होते, कसे जगत होते यावर भाष्य करणारी कादंबरी होय. एका शिपुड्याच्या तोंडून कथन करणारे, तत्कालीन सामान्यांचा जीवन जगण्याचा लेखाजोखा मांडणारे तसेच इतिहास समजून घेण्याची नवी दृष्टी देणारे नंदा खरे खरोखरच मराठी साहित्याला खरा चेहरा देणारे ठरतात. या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून मराठी साहित्य विश्वातील ऐतिहासिक कादंबऱ्यांची मांडणी करणे, ही बाब खूपच आव्हानात्मक व चिकित्सेला वाव देणारी ठरेल.

१९९३ ते २०१७ ह्या दरम्यान खऱ्यांनी 'आजचा सुधारक' ह्या विवेकवादी वैचारिक मासिकाच्या विश्वस्त मंडळावर काम केले. यापैकी २००० ते २०११ या काळात ते कार्यकारी संपादक' होते. 'आजचा सुधारक' या पुरोगामी मासिकाची धुरा ते दीर्घ काळ वाहत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, एकही जाहिरात नसलेले व गुणवत्तेशी कधीही तडजोड न करणारे व २५ वर्षांपेक्षा जास्त काळ चाललेले मासिक म्हणून या मासिकाची ख्याती होती. या मासिकाने अनेक विचारवंतांना घडविले. अनेक वाचकांना लिहिते केले व वैचारिक विषयातील वैविध्यतेची जपणूक केली. त्यांच्या या यशात नंदा खरे यांचा फार मोठा वाटा आहे. 'आजचा सुधारक' या वैचारिक नियतकालिकात लिहिलेल्या लेखांच्या विषयांची वर्गवारी करून त्यांची चिकित्सक मांडणी करणे, ही बाब निश्चितच वैचारिक समृद्धता लाभणारी ठरेल, असा विश्वास आहे.

त्याचप्रमाणे १९८४ ते १९९१ ह्या कालखंडात ते मराठी विज्ञान परिषदेशी संलग्न होते. विवेकवादी विज्ञानाचा प्रसार व्हावा ह्या हेतूने माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ते शैक्षणिक कार्यक्रम घेत असत यातून त्यांची सामाजिक बांधिलकी व विज्ञानप्रसाराचे कार्य लक्षात येते.

भविष्याचा वेध घेणारी व संपूर्ण मानवीसमुहा समोरील प्रश्नांचा आव्हानाचा, नजिकच्या काळातील संकटांच्या संदर्भातील नंदा खरे यांची मानवतावादी आणि मानवी मूल्यांसंबंधातील मांडणी महत्त्वपूर्ण ठरते.

नंदा खरे यांनी वाढत्या जमातवादाकडे त्यांच्या साहित्यकृतीतून डोळेझाक केली नाही. जमातवादाचे सत्यस्वरूप त्यांनी अधोरेखित केले आहे. जमातवादाविरुद्ध त्यांनी आपल्या लेखनातून प्रहार केले आहेत. खरे यांचे साहित्य समजून घेताना त्यांचा दृष्टीकोण आणि भूमिका अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.

आधुनिक समाजव्यवस्थेत जीवनाच्या अनेक क्षेत्रात जगण्याच्या आणि वर्गीकरणाच्या नव्या नव्या कल्पना आणि संकल्पना निर्माण होत असतात. त्या त्या समाज जीवनाची वैशिष्टये त्या-त्या काळातील साहित्यात उमटत असतात. त्या साहित्यातून त्या समाजाच्या स्थित्यंतरच्या अवस्था, विकासाचे निरनिराळे पैलू, संघर्ष, वेदना, वैशिष्टये या बाबी प्रतिबिंबीत झालेल्या असतात.

आज ध्रुवीकरण वाढत आहे. मूलतत्त्ववादी शक्ती मोठया प्रमाणात आक्रमक व हिंसक होत आहेत. वर्तमानात व भविष्यात या प्रवृत्तींचा सामना करण्यासाठी नंदा खरे यांचे विचार मार्गदर्शक ठरतील. नंदा खरे समाजाकडे बुद्धिवादी भूमिकेतून पाहातात. त्यांचे विचार आधुनिक व विवेकवादी आहेत. ते आजच्या काळाशी सुसंगत व मार्गदर्शन असेच आहेत.

साहित्य हे केवळ स्वांतसुखाय असून चालत नाही, तर त्याची एक सामाजिक भूमिका आणि सामाजिक बांधिलकी देखील असते, याची जाणीव वेळोवेळी खरे यांचे साहित्य वाचताना होते. नंदा खरे यांचे' ऐवजी' हे आत्मपर लेखन अभ्यासताना लेखकाबरोबरच अनेक नातलग, मित्र, हितचिंतक यांचा एक मोठाच परिसर आहे. त्यामुळे त्यांचे आत्मकथनपर लेखन अभ्यासताना आपण खूप मोठ्या कुटुंबाचे व त्यातल्या विविध घटकांचे जग न्याहाळतो आहोत असे वाटत राहते. पंडित नेहरूंच्या काळापासून आजच्या जागतिकीकरणाच्या वा नवउदारमतवादाच्या काळापर्यंत या लेखनाचा व्याप आहे. या लेखनातून मोठा सामाजिक, आर्थिक, राजकीय पट अभ्यासण्यास मदत होते.

प्रादेशिक विविधता, भौगोलिक किंवा राजकीय कारणांनी निर्माण झालेली सामाजिक दरी आणि मानवी जीवनावर होणारा त्यांचा परिणाम याबाबत नंदा खरे आपल्या साहित्यातून भाष्य करतात. मध्यमवर्गीय समाजाची मानसिकता, प्रस्थापित समाज व्यवस्था आणि विचारसरणी, जाती परंपरा, भेदाभेद, माणसाचा धर्माकडे आणि धर्मातून माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे सगळे नीट समजून घेण्यासाठी नंदा खरे यांचे साहित्य उपयुक्त ठरते.

निष्कर्ष:

१) नंदा खरे यांच्या वैचारिक भूमिकेचा संदर्भ अभ्यासताना सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक समकाळाचा उलगडा होतो.

२) नंदा खरे यांची मांडणी मानवतावादी व मानवी मूल्यांसंबंधातील आहे.

३) नंदा खरे यांच्या साहित्यात विविध ज्ञानशाखांतील अनेकविध तपशील आहेत.

४) ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन करताना त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती व सर्वसामान्य माणसाचे जगणे केंद्रस्थानी ठेवले आहे.

५) नंदा खरे यांचे लिखाण भविष्याचा वेध घेणारे आहे.

संदर्भ:

१) वाङमयीन संज्ञा - संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग.रा. भटकळ फाउण्डेशन,मुंबई,२००१

२) मराठी कादंबरीचा इतिहास, चंद्रकांत बांदिवडेकर,मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,१९९६

३) मराठी साहित्य व प्रेरणा व स्वरूप, संपा, गो.मा.पवार, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई.

# समकालीन मराठी कवयित्री : प्रेरणा व्यवहारे

**डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव**

सहयोगी प्राध्यापक, श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माहूरजि. नांदेड

आपण समाजात वावरत असतांना नकळत पणे अनेक प्रसंग मनात गुढमळत असतात. इतर कोणाचाही अनुभव यापेक्षा निराळा नसतो. स्वत:ला आलेले कडू-गोड अनुभव मूकपणे मनातल्या मनात शब्दबद्ध झालेले असतात. सर्वच व्यक्ती आपले अनुभव परस्परांना सांगत असतात. प्रत्येक व्यक्तीच्या मनात निरनिराळे भांडार असते. यासाऱ्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभवांचे मंथन त्याच्या मनात होत असते. ते मंथन मनाला बेचैन करत असते. त्यामुळे साररुपाने ते मंथन कविच्या कवितेतून बाहेर पडते. ऐकलेल्या, वाचलेल्या, अनुभवलेल्या, गुदरलेला अनेक प्रसंगांना मूर्तरुप मिळत जाते आणि कविता निर्माण होते. अशाच प्रकारे प्रेरणा व्यवहारे यांची कविता निर्मिती झाल्याचे 'वर्तुळ' हा कवितासंग्रह वाचल्यानंतर लक्षात येते. प्रेरणा व्यवहारे यांचा 'वर्तूळ' हा पहिलाच काव्यसंग्रह असून, सन २०००मध्ये प्रकाशित झाला आहे.

एका माणसाच्या जीवनात विविध प्रकारे येणारे अनेक अनुभव प्रत्येक माणसाच्या जीवनात मागे-पुढेच्या फरकाने येतच असतात. म्हणजेच प्रत्येक माणसाचं जीवन म्हणजे एक स्वतंत्र वर्तूळ असते. जीवनाच्या वर्तुळातील अनुभव आपल्या काव्यात समर्थपणे मांडण्याची ताकद प्रेरणाव्यवहारे यांच्या कवितेत आहे. त्या म्हणतात,

"कुणी ध्रुवतारा असतो,
कुणी असतो शीतल चंद्रा सारखा,
कुणी असतो चांदण्यांसारखा
तर कुणी तापतासूर्य" (वर्तूळ)

भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे. आज पुरुष स्त्रियांवर अन्याय करताना, तिचा छळ करताना दिसतात. अशाच हुंडा बळीची बळी ठरलेल्या स्त्रियांचे स्वप्न प्रेरणा व्यवहारे आपल्या काव्यात रंगवून करुण रस निर्माण करतात-

"तुझ्या मिटलेल्या डोळयांकडे
पाहून वाटलं,
फक्त हुंड्या अभावी
एवढं अर्थशुन्य जीवन आहे का ग?
तुझं... माझं.... तीच... ?" (हुंडाबळी)

अशा प्रकारे अन्याय, अत्याचाराचा बळी ठरणारी स्त्री सामर्थ्यवान, कर्तृत्ववान असल्याचे प्रेरणा व्यवहारे या अतिशय दमदारपणे व ठासीव शब्दांत 'मी' कवितेत सांगतातात. त्यांच्या कवितेत किंचितसाही आक्रस्ताळ पणा जाणवत नाही.

"मेघातून गरजले

तर गर्जनामी,

कलेतून जन्मले

तर शिल्पकार मी,

गालावर ठसले

तर हसूमी" (मी)

स्त्री मधील सामर्थ्याची जाणीव असणारी कवयित्री कधीकधी संभ्रमात देखील पडते. ती म्हणते,

"कशी करु मी कविता

अबोल झालेल्या शब्दांची

नुकत्याच चार लोकांच्या धाकांनी

मिटलेल्या त्या ओठांची...?" (बंधन)

भारतीय स्त्री ही शोषित आहे. तितकीच ती सामर्थ्यवान आहे. या दोन वृत्तीच्या दरम्यानची प्रत्येक भारतीय स्त्रियांमध्ये प्रत्येकाला येणारी वृत्ती म्हणजे समपर्ण वृत्ती होय. या कवयित्रीच्या 'तुझ्यासाठी' याकवितेतून व्यक्त झाली आहे. ती म्हणते,

"एक एक क्षण

एक एक कण

तन – मन - धन...

तुझ्यासाठी..." (तुझ्यासाठी)

प्रत्येक कविच्या जिव्हाळयाचा काव्य विषय म्हणजे प्रेम हा असतो. प्रेमाच्या नंतर प्रत्येक कवी आपल्या काव्यात आईला व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. आई विषयी व्यवहारे लिहितात. तिच्या समपर्ण वृत्ती बरोबरच तिचं प्रेम हे कुठल्याही मोजमापाच्या मोजण्या पलीकडचं असतं. हे अगदी मर्यादित शब्दात सांगतात.

"सारं आकाशच मावतं मनात

पण चांदण्या कशा मोजू

तुझ्या प्रेमाच्या,

हेच मला कळत नाही...?"(आई)

'वर्तूळ' मधील कवितांतून कवयित्रीच्या स्वप्नाळू मनाचा ही प्रत्यय येतो. मिटलेल्या मनाला कवयित्री सांगते,

"एक झेप घे नभाशी
माझ्या मनात तू पाखरु होऊनी
एक गोष्ट सांग नभाच्या कानी
भागव जमिनीची तहान...
पाडूणी पाऊस पाणी" (मिटलेल्या मना)

हेच स्वप्नाळू मन कधी तरी या कवितेत नियतीच्या आणलेल्या संकटांना आत्मविश्वासाने, धैर्याने सामोरे जाताना दिसतं.

"पाहून तरी किती पाहावी
सुखाची वाट,
नको म्हणू तरी किती
बघायचा दु:खाचा थाट..."(कधी तरी)

प्रेरणा व्यवहारे यांचा हा पहिलाच कवितासंग्रह आहे. परंतु या संग्रहातून त्यांच्या भविष्यातील वैभवशाली कवितेच्या खुणा दिसतात. कारण जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन आणि विचारांची प्रगल्भता या 'वर्तुळ' मधून प्रत्ययास येणाऱ्या कवितायाची साक्ष पटवितांना दिसतात.

स्त्रियांच्या जीवनाचे वेगळे संदर्भ, व्यथा, वेदना, अगतिकता, असाह्यता यांना संघर्षोन्मुख करण्याचा यशस्वी प्रयत्न या समग्र कवितेतून प्रत्ययाला येतो. भाषेच्या संबंधाने कुठेही आक्रमकता नाही, शिवराळ पणा नाही, विद्रोहाची भाषा आक्रमकच असते किंवा असावी लागते असं समजण्याचे कांही कारण नाही. यापूर्व परपरेला छेद देवून विश्वव्यापक, शांतीच्या, सयंमाच्या वाटेने हळूवार जाणारी भेदक अन्प्रज्ञाशील वाटेचा पत्कार करणारी ही कविता साकारतांना प्रेरणा व्यवहारे यांनी केलेला हा प्रयत्न स्तुत्य असाच आहे.

या कवितेत प्रंसग विशेषी कुठे मधुरता, रसाळता. माधुर्यता तर कुठे अग्नी सांरखी दाहकता प्रसवणारी विचार धारा उत्कट पणे अवतरली आहे. शांतीचे आणि क्रांतीचे मार्ग भिन्नभिन्न असावे तरी ही समन्वयाच्या आधिष्ठाना वरस्तवण करणारी ही कविता ममत्वाचा आणि समत्वाचा तोल सांभाळून सम्यक परिवर्तनाच्याच दिशेने वाटचाल करणारी आहे.

समाज जीवनाच्या शुक्ष्म छटा अतिशय कलात्मक आणि हळुवाररित्या अलगद पणे शोधतांना प्रेरणा व्यवहारे ह्या संग्रहात कमालिच्या यशस्वी झाल्या आहेत.

मनुष्य जीवनाच्या एका वर्तुळाचा परिघ छेदित-छेदित पूर्णत्वाला पत्करणारे यशस्वी जीवनाचे सुत्र आपसुकच सांगणारी ही कविता 'बंदिस्त' असूनही बुध्दत्वाला हयात साठवतांना कमालिची हळवी बनते. अन्नितीला चारित्र्याला बुध्दत्वाला शोधते. ही तिची शोध यात्रा अव्याहत पणे चालू आहे. त्यातूनच नव्या मानवी मूल्यांचा अविष्कार प्रकटतो. त्या शोधाचं संशोधन हाच 'वर्तुळा' चा ध्यास आहे.

या काव्यसंग्रहाचं मुखपृष्ठ देखील प्राचार्य प्रमोद दिवेकर यांनी बोलकं काढलं आहे. जीवनाच्या वर्तुळात स्त्रीचं जीवन हे आजही दु:खान, वेदनेनं टचून भरलेलं असून, काळ पुरुष त्यावर्तुळाला आजही व्यापून उभा राहिला आहे, असे दिसते.

अवती - भोवतीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ ह्या संग्राहत जागोजागी प्रत्ययाला येतात. वैचारिक चिंतनाचा परिपोष, अनुभवांची व्यापकता आणि विविधता हीच कलात्मक मूल्यांची जोपासना असते. अशा कलात्मक मूल्यांची जोपासना सृजनशील मनाने टिपलेल्या 'वर्तुळा'तून प्रत्ययाला येते.

**संदर्भ :**

१) प्रेरणा व्यवहारे, *वर्तुळ* (काव्यसंग्रह), अश्वघोष सार्वजनीक वाचनालय प्रकाशन, नागापूर ता.भोकर जि.नांदेड, प्रथमावृत्ती - सप्टेंबर,२०००.

# 'बिलामत' कादंबरीतील उत्कृष्ट व्यक्तिरेखा: श्यामा कोलाम

**प्रा. डॉ. मदकुंटे पी. एम.**

श्री रेणुकादेवी महाविद्यालय माहूर, जि. नांदेड

साठोत्तरी काळानंतर अनेक वांग्मय प्रवाह उदयाला आले. या काळात वास्तववादी साहित्य लिहिल्या जाऊ लागले. यानंतर नव्वोदोत्तर काळात जागतिकीकरण ही संकल्पना अस्तित्वात आली.या काळात जग जवळून निघाले. परंपरागत मूल्यांना छेद दिल्या गेले .बदललेल्या वास्तवाचं भान साहित्यिकांच्या लेखणीतून लिहिल्या जाऊ लागले. या काळात मूल्ये बदलली माणूस हा केंद्रबिंदू ठरल्या गेला.समकाळाचे लेखन महत्त्वाचे वाटू लागले. समकाळ म्हणजे प्रश्न पडतो, वय, काळ, मुल्ये, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय अन्वयार्थ लावणारे लेखन.या काळात अनेक वांग्मय प्रकारा बरोबर कादंबरी वांग्मय प्रकाराचेही लेखन झालेले आहे. कादंबरी लेखनात अनेक नवीन फॉर्म येऊ लागले. असाच नवीन फॉर्म घेऊन बिलामत कादंबरीचा लेखन दिनकर दाभाडे यांनी केला आहे.त्यांनी प्रथम पुरुषी एकवचनी हा फॉर्म या कादंबरीच्या लेखनासाठी वापरला आहे .त्यामुळे ही कलाकृती अगळी वेगळी ठरली आहे.

'बिलामत' ही कादंबरी चरित्रात्मक कादंबरी आहे. .या कादंबरीचा नायक आदिवासी आहे. त्याचे नाव श्यामा कोलाम. या श्याम कोलामाची व्यक्तिरेखा लेखक दिनकर दाभाडे यांनी अतिशय जिवंतपणे साकारलेली आहे. श्यामा कोलाम हा एक टेरर व्यक्ती. अपघाताने तो डाकू बनला.आपल्याला रामायण आणि महाभारत या महाकाव्यातील व्यक्तींना वनवास भोगावा लागला ज्ञातच आहे. महाभारतात तर अज्ञातवास पांडव भोगले. परंतु वास्तव जीवनात हा श्यामा कोलाम 14 वर्षे अज्ञातवासात काढली. 19 वर्ष तुरुंगात काढली. धनोडा गावच्या रंगारी नावाच्या सावकाराचा खून करण्यासाठी राजा, चंदन व महंमद हे तिघे शिकारीच्या निमित्ताने सोबत घेऊन जातात. या लोकांनी खून करण्यासाठी जात आहोत हे श्यामा कोलामाला सांगत नाहीत. धनोडयाला गेल्यानंतर महंमद रंगाऱ्याचा खून करतो आणि पोलिस खून करणाऱ्या च्या शोधात असतात त्यावेळी श्यामा कोलाम माहूर गाव सोडतो.

जंगलात वास्तव्य करतो. पोलीस खुनी लोकांवर लक्ष ठेवलेले आहेत. हे त्याच्या लक्षात येते.आणि शामा कोलामाला वाईट वाटते.आपल्याला या घटनेची कल्पना देखील नव्हती आणि आपण गोवल्या गेलो स्वतः खून केलो नसलो. तरी त्यांच्या सोबत आपण होतो म्हणजेच पापाचा धनीच! असे तो मानतो. असा हा अगदी प्रामाणिक माणूस गरिबांसाठी देवासमान नव्हे तर साक्षात देवच होता. अपघाताने डाकू बनला. आणि संपूर्ण त्याचे जीवनच बदलून गेले.

प्रत्येक घटनेला अनुसरून शामा कोलामाचे प्रसंगावधानता तर थक्क करणारे आहे. त्याला लिहिता वाचता येत नसले तरी तो अत्यंत चाणाक्ष बुद्धीचा होता. अनेकांवर विश्वास टाकायचा परंतु आणि अनेकदा त्याला धोका पत्करावा लागला. तो सतत म्हणायचा मी चांगल्यासाठी चांगला व बुऱ्या साठी लय बुरा हाव! अनेक घटना चित्तथरारक आहेत. अनेक वेळा पोलिसांनी त्याच्यावर हल्ले केले परंतु ते त्याच्या प्रसंगावधानतेमुळे सुखरूप

राहायचा. श्यामा कोलामाचे कुटुंबावर अत्यंत प्रेम होते. आईवर, भावांवर विशेष म्हणजे पत्नीवर. आपण फरार झाल्यावर पुन्हा कुटुंबात येऊन राहणे शक्य नाही. याचा विचार करून तो आपल्या पत्नीचे भावाच्या मदतीने लग्न लावून देण्याचा वचन घेतो. पत्नीची इच्छा

दुसरे लग्न करून घेण्याची नव्हती. तो तिला म्हणतो," रडतं कायले ? मी तुया आयुष्याची बरबादी होऊ देत नाय ,तुले दुसरे भ्रतार करून द्यायले लावतो. आपल्या माघारी पत्नी भिवरा चे व मुलगा दशरथाचे आबाळ होऊ नये म्हणून विचार करतो. असा हा सारासारविवेकबुद्धी चा नायक बिलामत वाचत असताना पावलोपावली दिसून येतो.पुढे त्याचा मुलगा दशरथ तो जेलमध्ये असताना आंतरधर्मीय विवाह केल्याची बातमी श्यामा कोलामा पर्यंत पोहोचली. मुस्लिम धर्मीय मुलीचा सून म्हणून नव्हे माझी मुलगी म्हणून तो स्वीकार करतो. या ठिकाणी त्याच्या ठाई असलेला मनाचा मोठेपणा काळाची पावले ओळखनारा हा व्यक्ती कादंबरी वाचत असताना पानोपानी दिसून येतो.

ज्या लोकांनी शामाचे विश्वास घात केले त्या लोकांना मात्र तो शिक्षा दिल्याशिवाय राहिला नाही. अशीच एक घटना म्हणजे, तो त्याच्या चुलत भावाकडे गेला होता. त्याचे नाव चंडक्या. तो श्यामाला व्यवस्थित पाहुणचार वगैरे केला, परंतु शेवटी तो पोलिसांना खबर दिली. यात शामा वाचला. परंतु त्याच्या डोक्यात चंडक्या मात्र पक्का बसला. काही दिवसांनी श्यामा कोलाम कामाचं निमित्त करून चंडक्याकडे आला. आणि त्याला भर गावठाण्यात आणला. त्याचे दोन कान आणि नाक कापून टाकला. ही घटना बघून अख्खा गाव हादरला. अशा अनेक घटना पावलोपावली कादंबरीत वाचताना दिसतात. प्रत्येक घटनेतून शामा सहीसलामत सुटतो. यातून त्याचे चतुरपणा आपल्याला दिसून येते.

कादंबरीतील एका घटनेवरून शामा कोलामाचे प्रामाणिकपणा लक्षात येतो. ती घटना अशी, एका गावातले तीन सख्खे भाऊ सावकार होते. त्यांना अशी भीती होती की शामा डाकू आपल्या घरावर डाका घालेल म्हणून.त्या तिघा भावांनी रात्रीला गरिबांच्या झोपडीत जाऊन झोपायचे आणि सकाळी आपल्या घरी परतायचे. ही गोष्ट श्यामाला कळली. तो स्वतः त्यांना जाऊन भेटला आणि सांगितला की, मी तुमच्या घरावर डाका टाकणार नाही तुम्ही भाऊ मला भिण्याचे कारण नाही. झोपडीत झोपायला जाऊ नका. एखाद्यावेळेस ते लोकं तुमचं सामान घेऊन जातील आणि नाव माझं खराब व्हयाचं!.

श्यामा कोलाम प्रभु रंगारी याचा खुणी नसताही त्याला 14 वर्षे जंगलात राहावे लागले. हा अपघातच म्हणावा लागेल. जंगलात असताना तो 14 वर्ष पोलिसांना सापडला नाही. त्याचा विश्वास पूर्ण देवावर होता. त्याला माहूरचा परिसर आणि आजूबाजूची खेडी अत्यंत प्रिय होती. तो कधीही देवाच्या दरबारात गोळीबार केली नाही. रेणुका देवी वर महंत महाराजावर आणि शेक फरीद बाबा वर अत्यंत श्रद्धा होती. त्याला नेहमी वाटायचे देव आहे म्हणून आपण सुखरूप जंगलात राहत आहोत, ते खरेच म्हणावे लागेल.शेवटी धोकेबाजी मुळे 14 वर्ष फरारी नंतर तो पोलिसांच्या हाती लागला. आणि त्याची रवाना तुरुंगात झाली. त्या ठिकाणीही त्याचे वर्चस्व म्हणजे लोकप्रियता कायमच राहिली. पोलीस देखील त्याला शामादादा म्हणायचे. त्याच्यातील दमदार नेतृत्व सर्वांच्या डोळ्यात भरायचा. तेथील कार्यपद्धती अगदी चोख पार पाडायचा. हा शामा फरारी जीवनात अनेक गरिबांना पैसे कपडेलत्ते आदींची मदत केली होती. कोणत्याही गरिबाचे लग्न अंत्यविधी त्याने पैशावाचून आडू दिले नाहीत.

अनेकांना उद्योग धंद्यासाठी पैशांची मदत केली. गरीब लोकांना लुटून श्रीमंत लोकांनी जमा केलेल्या पैशातील वाटा श्यामा जमा करायचा. हाच पैसा गोरगरिबांना वेळप्रसंगी द्यायचा. एकंदरीत या कादंबरीच्या नायकाचा स्वभाव गरिबांना मदत करण्याचा आहे. त्यामुळे त्याला खेड्यातील लोक तुरुंगात भेटण्यासाठी जात होते. जाताना सोबत खाद्यपदार्थ नेत होते. गरीब लोकांचा तो देवदूतच बनला होता. श्यामाला जेव्हा पोलीस ठाण्यातून कोर्टात नेत होते तेव्हा तुरुंगाबाहेर प्रचंड गर्दी होत होती. चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून नंतर पोलीस ठाण्यातच कोर्ट उभ करावं लागलं. या घटनेवरून श्मामाचे व्यक्तिमत्व लक्षात येते.

वीस वर्ष जेल ची सजा काढलेला माणूस, कोणावरही आकस धरला नाही. कैदी जीवनातही त्याचा आदर्श कायम टिकून होता. कैद्यांना गांजा चरस दारू पिऊ न देणे, त्यांना शिस्त लावली. कैदी इन्चार्ज म्हणून त्यांना चांगले मार्गदर्शन केले कारागृह सोडताना चांगले राहा म्हणूनही सांगितला. कारागृहात झाडे लावण्यासाठी वरिष्ठांकडून परवानगी घेऊन आंब्याची झाडे लावली. अशीच विधायक कामे करणारा नायक कादंबरी वाचत असताना दिसून येतो.

अशा या नायकाच्या उंचीमुळे त्याची जेव्हा तुरुंगातून सुटका होते तेव्हा जंगी मिरवणूक काढण्यात आली. त्या मिरवणुकीला एवढी गर्दी होती की लोकांची फक्त डोकीच दिसत होती. पोलिसांना ही गर्दी आटोक्यात येत नव्हती. आपण चित्रपटात किंवा मालिकेत पाहतो डाकू ची प्रतिमा कशी असते? डाकू म्हटले की घाबरतो. परंतु हा शामा अपवाद होता. त्याच्या चांगुलपणा मुळे तो लोकांच्या मनात कायम घर करून राहिला.

या कादंबरीत अशा अनेक घटना घडून गेल्या आहेतकी, त्याचे चित्रण लेखकाने कमालीच्या जिवंतपणे केले आहे. या कादंबरीत आलेल्या व्यक्तिरेखा अत्यंत ताकतीने रंगविलेल्या आहे. श्यामा, राजा, महंमद, चंदन, भाऊसाहेब, श्यामा सोबत 14 वर्ष जंगलात राहिलेली शारजी आदी. एकंदरीत लेखक दिनकर दाभाडे यांनी माहूर परिसर, आजूबाजूची खेडी, तेथील गावकरी मंडळी गोर -गरीब, सावकार, बारा बलुतेदार या सगळ्यांचे वर्णन अत्यंत वास्तववादी जिवंतपणे केले आहे. त्यामुळे ही कादंबरी वाचकांना अंतर्मुख करते.

श्यामा कोलाम हा आदिवासी माणूस. त्याचे व्यक्तीचित्रण लेखक अतिशय उत्कृष्ट रित्या साकारले आहे. या कादंबरीची भाषा वराडी बोली आहे.सुंदर शब्दकळा, ओघवती लेखनशैली मुळे वाचक एकदा हातात कादंबरी घेतली की पूर्ण वाचून झाल्याशिवाय उठणार नाही. अशा प्रकारे नव्या विषयाची कादंबरी वाचकांना मनात रूंजी घालत राहते, एकूणच महत्त्वाचे म्हणजे श्यामा कोलाम या व्यक्तिरेखेला कोणीही विसरू शकत नाही.

**संदर्भ:**

१) 'बिलामत' ,दाभाडे दिनकर, कॉपर कॉइं प्रकाशन नवी दिल्ली .दुसरी आवृत्ती. फेब्रुवारी 2018

# समकालीन मराठी साहित्यः नव्वदोत्तर महानगरीय कविता

प्रा. चैताली चिदानंद कोळी
सेंट झेवियस् महाविद्यालय म्हापसा, गोवा

कविता हा साहित्यप्रकार कितीही आत्मनिष्ठ मानला तरी तो समकालीन सामाजिक वास्तव आणि जाणिवांपासून वेगळा राहू शकत नाही. मराठी साहित्यात केशवसुतांपासून समकालीन समाजवास्तवाशी आणि समकालीन जाणिवांशी नाते प्रस्थापित करणारी कविता लिहिली गेली आहे. लघुनियतकालिकांची चळवळ, ग्रामीण व दलित साहित्यचळवळींचा उदय, पाश्चात्य साहित्यप्रवाहांचा परिचय अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्राच्या साहित्यक्षेत्रात १९७५ च्या सुमारास अनेक बदल झाले. परिणामी मराठी साहित्याचे स्वरुपही काही प्रमाणात बदलले. १९७५ नंतर मराठी कवितेत काही प्रवृत्ती-प्रवाह निर्माण झाले त्यात दलित कविता, ग्रामिण कविता, अस्तित्त्वादी जाणिवेतून लिहिली जाणारी कविता तसेच महानगरीय संवेदनशीलतेतून लिहिल्या जाणाऱ्या कवितेचा समावेश होतो. जागतिकीकरणामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती झाली. त्याचे परिणाम साहित्यक्षेत्रातही दिसतात. १९७५ पूर्वी महानगरीय कविता लिहिली जात होती पण १९९० नंतर जागतिकीकरणाच्या जोडीने ती अधिक गतिमान झाली. या निबंधात नव्वदोत्तर महानगरीय कवितेचा विचार केला आहे. विस्तारभयास्तव वर्जेश सोलंकी, सचिन केतकर, मन्या जोशी आणि श्रीधर तिळवे या कवींचा विचार या निबंधात सूत्ररुपाने केलेला आहे. नव्वदोत्तर माहानगरीय कवीतेचा चेहरा या कवींच्या कवीतेतून मुखर होतो त्यामुळे हे कवी निवडलेले आहे.

१९९० नंतर सुरु झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जे बदल झाले त्यांचा निर्णायक असा परिणाम एकूणच समाजजीवनावर होऊ लागला. डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात “सर्वत्र वाढत चाललेली आर्थिक विषमता, शेतीची आणि देशी उद्योगधंद्याची दुरवस्था, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, धरणे आदी विकास योजनांच्या नावाखाली आदिवासींचे होत असलेले विस्थापन आणि शोषण , वाढते शहरीकरण, प्रदूषण, फोफावत चाललेली मॉल संस्कृती, प्रसारमाध्यमांची दादागिरी, जाहिराती आणि चित्रपटादी माध्यमांतून स्त्रीदेहाला प्राप्त झालेले वस्तुरुप, वाढती असुरक्षितता, गतिमान जीवनपध्दती आणि त्यामुळेच बोकाळलेला चंगळवाद, नोकरी- व्यवसायाच्या निमित्ताने होणारी स्थलांतरे, विस्थापने आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न, कलाव्यवहाराला आलेले बाजारु स्वरुप, जीवनातील शाश्वत मूल्यांना लागलेली ओहोटी आणि वाढती व्यक्तिवादी आत्मकेंद्रितता ही सर्व जागतिकीकरणाचीच परिणती आहे”.[१] या समाजजीवनाचे प्रतिबिंब वर्जेश सोलंकी, सचिन केतकर, मन्या जोशी आणि श्रीधर तिळवे या चार कवींच्या कवितेत पडते.

वर्जेश सोलंकी यांचा ‘वर्जेश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता’ हा पहिला कवितासंग्रह २००२ साली प्रकाशित झाला. वर्जेश यांच्या कविता वाचताना वाचकांसमोर मुंबई महानगर येते. मुंबई शहर म्हटले की तिथली गर्दी, जगण्याचे रोजमर्राचे ताणतणाव, मनाची होणारी कोंडी अशा गोष्टी नजरे समोर उभ्या राहतात. वर्जेश सारखा कवी देखील या गोंधळात अडकलेला दिसतो उदाहरणार्थ ‘आपण असू शकतो’ या कवितेतल्या काही ओळी पहा

आपण असू शकतो
कडी तुटलेला कप
उधई लागलेली भिंत, हातभट्टीची दुर्गंधी
मांजरीनं तोंड घातलेलं दूध टमरेल

एकशेवीस पक्की सुपारी घातलेलं तंबाखूचं पान
नेमकं पोटावर फाटलेलं बनियान. जीव गुदमरवणारा[२]

कवी स्वतःला तुटलेला कप किंवा तोंड घातलेलं दूध... अशा अनेक गोष्टींच्या माध्यमातून समजून घेताना दिसतो. एखाद्याशी गप्पा माराव्यात तशा त्यांच्या कवितांची रचना आहे. साध्या सोप्या घरगुती भाषेचा वापर त्यांनी केला आहे. साध्या गोष्टींवरुन त्यांची कविता जन्म घेताना दिसते. 'मुग्या' ही कविता त्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणता येईल. संर्पूण कवितेत कवी मुंग्यांबद्दल सर्वसामान्य निरिक्षण नोंदवतात मात्र शेवटच्या पाच ओळीत स्वतःच्या मनातल्या भीतीच्या वारुळाबद्दल सांगतात.

अशा एकदम
मुंग्या चाल करुन येताना
फुटू पाहातंय
माझ्या मनातलं
भितीचं वारुळ[३]

मुंग्यांवर जशी वर्जेश यांनी कविता रचली आहे त्याच कवितेसारखीच त्यांची उंदीर ही कविता आहे. घरात उंदीर मेल्या कारणाने दुर्गंध पसरला आहे. घरातले सगळेच उंदीर शोधत आहे. उंदीर शोधतानाचे वास्तववादी वर्णन सूरवातीला कवी करतोच पण या कवितेचा शेवट उंदरावरुन मानवी अवस्थेवर भाष्य करुन होतो. कौटुंबिक पातळीवर होणारे शोषण या कवितेत दिसून येते.

मुंबई सारख्या शहरात 'सुलभ शौचालय' अनेक ठिकाणी पाहायला मिळतील, काही शौचालयांना आतून कडी लागत नसते हे माहानगरी वास्तव आहे. या अनुभवातून लिहिलेली वर्जेश यांची कविता म्हणजे 'आतून न लागणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या कडीची'.एकदंरीत माहानगरीय जीवन, त्यात जगणारा माणूस, त्याची होणारी दमछाक या कवितेतून आपल्या समोर उभी राहते. 'पाऊस' सारखी त्यांची कविता आपल्याला मॉडर्न जगात घेऊन जाते. पावसाची ती सृजनता कुठेतरी हरवली आहे. राहिला आहे तो फक्त मॉर्डन पाऊस. कवितेच्या सूरुवातीच्या ओळी पहा

पाऊस . खंडाळा. बुशीडॅम. बीअरचे कॅन्स.
पिकनिक मूड.
पाऊस चिकचिकाट. साथीचे रोग. वाहतूक व जनजीवन विस्कळीत पूरजन्य स्थिती.[४]

'नेमके कोण असतो आपण' या कवितेत तर कवी आपल्या अस्तित्त्वाचा शोध घेताना दिसतात. आपण इंडियन की एन्आरआय, की चौपाटीवर स्वतःला गाडून पैसे कमावणारा हिकमती, की यंदाचा शांततेसाठी नोबल मिळवलेला आंतरराष्ट्रीय नेता? असे अनेक प्रश्न या कवितेत कवी विचारतो. महानगरात जगत असलेला माणूस गर्दीतून वाट काढत असतो, पळण्याचा प्रयत्न करत असतो, स्वतःचा जीव वाचवत असतो. 'व्हॅक्युमक्लिनर' कवितेत कवी स्वतःला खूप कमी समजतो. आपण या भव्य दिव्य वातावरणात मिसमॅच की काय? असा प्रश्न त्याला पडतो आणि या विचाराने एसी चालू असलेल्या खोलीतसुध्दा घामाघुम होतो. मित्राची बायको कपाटातून जेव्हा व्हक्युम क्लिनर काढते त्या क्षणी कवी पळून जातो. कवीला वाटतं आपणही फरशीवरल्या धुळीसारखे आहोत . हा व्हक्युम क्लिनर आपल्यालाही आत ओढून घेईल.'वजैश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता' या काव्य संग्रहातल्या त्यांच्या कविता पाहिल्या तर महानगरातलं वास्तव मांडणाऱ्या या कविता आहेत. वर्जेशच्या कवितेविषयी वसंत पाटणकर

लिहितात, "वर्जेशच्या कवितेला समकालीन जगण्याचा, वास्तवाचा ठाशीव संदर्भ आहे. हे वास्तव आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण यांचे आहे आणि ते माहानगरीय आहे. या कवितेतील प्रतिमा- प्रतिके प्रामुख्याने समकालीन महानगरीय वास्तवाचा आविष्कार करणारी आहेत. मूल्यसंभ्रमाचे, काहीही स्थिरावू न शकणारे, माणसाची आत्मिकता नष्ट करणारे असे हे वास्तव आहे, हा कोणत्याही संवेदनाक्षम माणसाला पडणारा प्रश्न वर्जेशलाही पडला आहे. या अर्थाने या आत्मशोधाच्या कविता आहेत ".[५]

जागतिकीकरणाचे परिणाम समाजजीवनावर , व्यक्तिजीवनावर तसेच मानवाच्या मनावरही जाणवतात. मानवाचे बदलेले विचार नव्वदोत्तर कवितेत पाहायला मिळतात. कवी सचिन केतकर यांच्या 'जेम्स बॉण्ड निवृत्ती जाहीर करतो' या कवितेत माणूस कसा 'रिलेक्स' होऊ पाहत आहे याचं सुंदर चित्रण येतं. बदललेल्या परिस्थितीमुळे माणूस जगाकडे कसा बघत आहे, या परिस्थितीला कसा सामोरा जात आहे यावर केतकरांची नव्वदोत्तर कविता प्रकाश टाकते.

स्वतःच्या इच्छा इतरांवर लादण्यास आजकाल जो तो पटाईत झाला आहे. 'मी' महत्त्वाचा झाला आहे. बंदुक नसताना स्वतःच्या शब्दांनी दुसऱ्यांच्या मनावर घाव घालण्यास माणूस तरबेज झाला आहे. माणसाच्या भावना कुठेतरी प्रदुषित होत चालल्या आहेत. सतत आपली भीती दुसऱ्यांच्या मनात असावी असे माणसाला वाटू लागलं आहे. आपण म्हणेल तेच अंतिमसत्य ही भूमिका माणूस घेताना दिसतो. कोणीही आपल्याला त्रास दिलेला माणूस खपवून घेत नाही. स्वतःच्या लहान मुलांनी दिलेला त्रास देखील आजकालच्या पालकांना सहन होत नाही. परिणामी आपण दहशदवादी बनत चाललो आहोत हा प्रश्न समोर येतो. आपली ताकद, आपली भीती कोवळ्या मनाला कोमेजून टाकत असल्याची जाणीवही माणसाला होत नाही. कदाचीत ही जाणीव होत असावी पण जागतिकीकरणाच्या दुनियेत माणसाला या गोष्टी सामान्य वाटत असाव्या. 'कंबरेवर विस्फोटकं बांधतानाचे स्वगत' या कवितेत कवी केतकर म्हणतात

खरंतर आपण सगळेच दहशदवादी आहोत
आपल्या लहान मुलानं समजा आपल्याला त्रास दिला
तर आपण दाखवत नाही का आपली
ताकद आपली भीती?[६]

मॉडर्न जगात संगणक केवळ छंद राहिला नसून तो माणसाच्या जगण्याचा उद्देश झाला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीनंतर झालेले मानसिक बदल सचिन केतकरांच्या कवितेत दिसतात. एक काळ असा होता जेव्हा आपण दूरचित्रवाणीवर येणाऱ्या जाहिराती बघायचो. आता जाहिरातीसाठी दूरचित्रवाणीची गरज लागत नाही. इंटरनेटच्या दुनियेत आपली इच्छा नसतानाही काही जाहिराती आपल्या मोबाईलवर, संगणकावर आपोआप प्रकट होतात. मानवी मेंदूवर अटॅक करणारी ही जाहिरातबाजी , हा एक मॉडर्न आजार असल्याचे कवी केतकर सांगतात. जाहिरातींच्या दुनियेत जाहिरातबाजी जिंकते आणि माणूस हरतो. या संदर्भात त्यांच्या एका कवितेतला पुढील भाग पहा

मी पोस्टमॉडर्न परिक्षित
माझ्यासमोर हे आभासी फळ
प्राक्तनात स्पॅम केलेलं
त्यात अनोळखी वर्म आहे माहीत आहे मला

अळीचा तक्षक होणार हेही माहीत आहे मला
पोटातूनच ज्ञान मिळालंय मला
की ह्या व्हर्च्युअल वर्ल्ड वाईड चक्रव्यूहातून
बाहेर पडायला मार्ग नसतो
म्हणूनच मी ह्या फळाचं आयकॉन क्लिक करतो
अन वाट पाहतो
शेवटच्या दंशाची [७]

माणूस आत्मकेंद्री झाला आहे. आपलं दुःख आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याला एकमुखी चेहरा चालणार नाही हा विचार 'दश दिशा दश दशा' या कवितेत येतो. नवयुगात मानवाच्या मनात चालणारी खळबळ त्याच्या मनाची अवस्था महालंकेच्या रचनेसारखी आहे आणि त्यासाठी किमान दहा गणपतींना स्टेनोग्राफर म्हणून ठेवाव लागेल असे कवी म्हणतात. त्यांच्या कवितेत कॉम्प्युटरच्या प्रतिमा प्रकट होतात. 'डिल्डोपनिषद' ही त्यांची कविता माणूस कसा विकृतीकडे गेला आहे याची साक्ष पटवून देतो. वास्तवाचा वेध घेणारी आणि वास्तवाची उलटतपासणी करणारी कवी सचिन केतकरांची कविता आहे. विश्राम गुप्ते सचिनच्या कवितेविषयी लिहितात "महानगरी कवितेत आढळून येणारा अस्तित्वाचा संभ्रम आणि स्वतःची अस्मिता टिकवून ठेवण्याची महानगरीय, संगणकीय, मीडियाप्रभावित, वेडपट व्यामिश्र संवेदनशीलता सचिनने प्रभावीपणे कवितेत मांडली आहे".[८]

कवी मन्या जोशी यांची कविता नवीन जग आपल्या समोर आणते. 'ज्याम मज्या' हा त्यांचा किवतासंग्रह आहे. अल्पाक्षरी कविता हे त्यांच्या कवितेचे विशेष. 'नव जग नवी कविता' या ग्रंथात विश्राम गुप्ते म्हणतात "मन्याची प्रयोगशील कविता भाषेचा पौष्टिक आहार चावते, पण तो अंगी लागू नये म्हणून न गिळताच तोंडातून थुंकून देते आणि शिडशिडीत राहते. सडपातळ दिसणं हे मन्याच्या कवितेचं ध्येय आहे".[९] मन्या जोशींची कविता अल्पाक्षरी असली तरी अर्थ शोधण्याच्या वाटेवर निघताना वाचकाला डोकं खाजवायला भाग पाडते. मॉडर्न विचार त्यांच्या कवितेत अवतरले आहेत. ज्याम मज्या म्हणजे मस्ती किंवा धिंगाणा असा त्याचा अर्थ होतो. मस्ती आणि धिंगाणा या मागे वरवर आनंद जरी दिसला तरी मन्या जोशी यांच्या कवितेतली माडर्न माणसं एकटी हरवलेली आहेत. माणसं एकमेकांच्या समोर असली तरी हरवलेली वाटतात. ज्याम मज्या कवितासंग्रहातील पहिल्याच कवितेचं शेवटचं कडवं पाहा.

मिस्टर अन्ड मिसेस लिमये
पॉप्युलर तत्त्वज्ञानाच्या आडोशात करतात
एकमेकांचा इन्तजार
समोरासमोर[१०]

मिस्टर अन्ड मिसेस लिमये समोरासमोर उभे आहेत. एकमेकांचा इंतजार ते करत आहेत. हे उदास वास्तव कवी वाचकांसमोर ठेवतो. त्यांच्या कवितेत मीडियाचे संदर्भ वारंवार भेटतात. याचा अर्थ त्यांना मिडियाची खोल ओळख आहे. या संदर्भात त्यांच्या याच किवतासंग्रहातली तिसरी कविता 'इना मिना सुपर सिना' पाहता येईल. 'प्रोग्लोबलाईज्ड कुसुम' या कवितेत कुसुम टीव्ही सिरियल बघत आहे. टीव्ही म्हणजे काही स्त्रीयांचा मेंदूच झाला

आहे. ही कुसुम फक्त ग्लोबलाईज्ड नाही तर ती 'प्रो' झाली आहे. जागतिकीकरणात आपण फक्त गुरफटतच नाही चाललो तर त्यात आपण 'प्रो' होत चालल्याची जाणीव इथे कवीला आहे हे कवितेच्या शीर्षकावरुन समजते.

इलेक्ट्रॉनिक मीडियाचा गाजाबाजा विश्वभर चालू आहे. पोस्टमॉडर्न माणसाच्या आजूबाजूला व्हर्चुअल रियालिटीचा नाचते आहे. मीडियाने तर माणसाच्या मेंदूवर जादू केली आहे. हे संदर्भ मन्या जोशींच्या कवितेत मिळतात. माणसाला देखावा प्रिय झाला आहे. त्याचं राहणिमान बदललं आहे.

मी चाललो
ऑटोमेटेड ट्रेडमिल्स
कॅलरिजचा ग्रेटेड
सहेतुक निसर्ग
हिर्व्या रानदरीत
घुसमटली प्रायव्हसी
गाडीत एसी बंद
स्लो रॉकचं डिओ
मिनरल वॉटरबंद
हेतुपूर्ण निसर्ग[११]

कविता लहान पण मोठा अर्थ सांगून जाते. नको त्या गोष्टी खाऊन पिऊन वेगळ्याच दुनियेत माणूस जगत आहे. खाल्लेलं अंगी लागू नये म्हणून ट्रेडमिल सारख्या यंत्राचा वापर केला जात आहे. क्षणिक सुखापोठी नपचणाऱ्या गोष्टी ग्रहण केल्या जातात पण कॅलरींची मात्रा त्याला वाढवायची नसते. निसर्गाच्या सान्निध्यात भटकायला सुध्दा पायी चालत जायचा विचार त्याच्या मनात येत नाही तर इथे सुध्दा त्याला मोटार गाडी लागते. ४.

नव्वदोत्तर पिढीतला महत्त्वाचा कवी म्हणजे श्रीधर तिळवे. त्यांचे नऊ कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. आपल्या कवितेतून त्यांनी नव्या काळाचं, मीडियाकेंद्रित जगाचं वर्णन केल्याचे दिसते. 'चॅनलः डीस्ट्रॉयरी अर्थात जागतिकिकरणात नष्ट होत चाललेल्या गोष्टी' या शीर्षकावरुन नष्ट होत चाललेल्या गोष्टींकडे वाचकांच लक्ष वेधण्याचा प्रयत्न कवी करतात. या कवितासंग्रहाच्या पहिल्याच कवितेच्या पहिल्याच कडव्यात कवी म्हणतात

जग संपत चाललय
ही आत्महत्या आहे की खून
तेही कळत नाहीये
इतकंच कळतय की
ते संपत चाललय[१२]

'तिळवे भंडार' ही त्यांची प्रदीर्घ कविता आहे. सुपरमार्केटसबद्दल या कवितेत कवी राग व्यक्त करातना दिसतात.जागतिकीकरणामुळे लहान, लहान किराण मलाची दुकानं नामशेष होत चालली आहे. जो तो 'मॉल'च्या जाळयात अडकत चालला आहे. कवी म्हणतात

कलियुगात
एके दिवशी तू उठलास
तर गिहाईक आलेच नाही
रातोरात सुपरमाकैट प्रसिध्द झाले होते[१३]

एकाच ठिकाणी हव्या त्या गोष्टी मिळत असल्याने गिहाईक लहान दुकानांकडे बघतही नाही. लहान दुकानाला उद्देशून कवी म्हणतात

खरेदी ही तुझ्यात पार्टटाईम गोष्ट असेल
तर सुपरमार्केटात ती संपूर्ण अस्थित्त्व बनतिये
विंडोशॉपिंग म्हणजे वस्तूंवर लाइन मारणे
लोकांना विंडोशॉपिंग करायचंय
तर तुझ्या दुकानात विंडोच नाही[१४]

सुपरमार्केटमधली कोणतीही गोष्ट आणली की ती सुखदायकच होते. मग तिचा उपयोग होत नसला तरी चालेल. वस्तू सुपरमार्केटमधली असल्याने एक आत्मिक आनंदाची प्राप्ती माणूस अनुभवतो. या संदर्भात कवी म्हणतात काही न करण्यापेक्षा गुन्हा केला आणि पस्तावलो, हे कधीही चांगले. श्रीधर सारख्या कवीला सुपरमार्केट म्हणजे एक शत्रुच वाटतो पण ह्या मार्केटपासून सुटका नाही हेही तेवढच सत्य आहे. माहानगरी कवितेची वैशिष्ट्ये म्हणजे वेगवेगळया संवेदनशीलता, पाश्चात्य संकल्पनांना आपलं करण ही वैशिष्ट्ये श्रीधर तिळवे यांच्या किवितेत दिसतात.

निष्कर्ष :

या महानगरीय कवितेचा विचार करिता ही कविता भय, भीती, मृत्यू , माणसांचे होणारे वस्तूकरण, जागतिकीकरणामध्ये मातीमोल होणारा माणूस, मनोदैहिक जाणिवा या मुख्य आशयसूत्रांभोवती ही कविता विस्तारलेली दिसते. त्या अनुषंगाने या कवितेच्या संदर्भातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) महानगरी कवितेत अस्तित्वाचा संभ्रम दिसतो. महानगरी कविता, कवितेच्या वाचकाला अस्वस्थता देते.
२) आत्मचरित्रात्मक आवाज नव्वदोत्तरी कवींची खासियत आहे. नव्वदोत्तर कवितेत सामान्य माणसाच्या जगण्यातले ताणतणाव, विकृती सहज चित्रित झालेल्या दिसतात.
३) जागतिकिकरणातून परिसर बदलला आहे. कवितेचा आशय, तिचे संदर्भ बदललेले दिसतात. १९९० नंतरच्या कवींनी आपली कविता ही प्रेम, निसर्ग, चारोळ्या यापूर्तिच मर्यादित न ठेवता आपल्या लेखणीला प्रयोगशीलतेची जोड दिली आहे.
४) ही कविता वाचत असताना रोजच्या जगण्यातील प्रतिबिंब पाहायला मिळते. ही कविता निसर्ग, प्रेम, भावना यांच्याविरुध्द उभी आहे.
५) तंत्रज्ञानातून आलेल्या सुख- दुखांना माडर्न वळण दिल्याचे पाहायला मिळते. माणूस हा या कवितेच्या केंद्रस्थानी असून तो भंगारात जाऊ नये याची दखल ही कविता घेताना दिसते.
६) माणूस माणसांपासून तुटत आहे, ही जाणीव या कवितेत आहे. ही कविता कोणत्याही भ्रमात राहत नाही ती वास्तवाबद्दल सडतोड बोलते.तांत्रिकता असलेली, अल्पाक्षरी असलेली ही कविता सर्वसामान्यांना न कळणारी आहे.
७) ही कविता प्रयोगशील आहे. या कवितेची भाषा महानगरातील असून संमिश्र स्वरूपाची आढळते. भाषिक पातळीवर हे कवी वेगवेगळे प्रयोग करताना दिसतात. कवितेच्या पारंपरिक संकल्पना नाकारून कवितेची नवी मांडणी, नवा रचनाबंध विकसित करतात.
८) जाहिरात, वृत्तपत्रातील बातम्या, यांचा रचनाबंध या कवींच्या कवितेत आढळतो. जागतिकीकरणाने निर्माण केलेले तंत्रज्ञान आणि त्याने विकसित केलेली तांत्रिक भाषा या कवितेमध्ये दिसून येते.

९) ही कविता सामान्य माणसाची कविता वाटत नाही. तांत्रिक भाषेमुळे ती सामान्य माणसापासून तुटलेली आहे. ज्यामध्ये तिच्यामध्ये दुर्बोधता जाणवते.

संदर्भसूची


१) ठाकूर डॉ. रवींद्रः प्रवाह आणि प्रतिक्रिया, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. १६०

२) सोलंकी वर्जेशः वर्जेश ईश्वरलाल सोलंकीच्या कविता, अभिधानंतर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती जुलै २००६- पृ. क्र. ६.

३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक- ७

४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक- १०

५) पाटणकर, वसंतः शब्दवेध, नोव्हेंबर २००३ पृ. २७.

६) केतकर सचिनः जरासंधाच्या ब्लॉगवरचे काही यंश, प्रकाशक हेमंत दिवटे, अभिधानंतर आणि पोएट्रीवाला मुंबई- पृ. क्र. ३८

७) तत्रैव

८) गुप्ते विश्रामः नवं जग नवी कविता,प्रकाशक सुनिताराजे पवार, प्रथम आवृत्ती- पृ. क्र. २४४

९) तत्रैवः पृ. क्र. ३१३

१०)जोशी मन्याः ज्याम मज्या, अभिधानंतर प्रकाशन मुंबई, पृष्ठ क्रमांक- १

११)तत्रैव, पृष्ठ क्रमांक- ४४

१२)तीळवे श्रीधरः चॅनेलः डीस्ट्रॉयरी, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पृष्ठ क्रमांक ८

१३)तत्रैव

# समकालीन मराठी साहित्य : दलित रंगभूमी

प्रा. शिवराम लक्ष्मण गायकवाड
मराठी विभाग, प्रज्ञा कला वरिष्ठ महाविद्यालय मोलगी ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार

समकालीन मराठी साहित्यातील नाटक वाङ्:मयाचा विचार करीत असताना दलित रंगभूमीवरील नाटक या घटकाला वगळून चालणारच नाही. कारण दलित रंगभूमीवरील नाटके ही समग्र नाट्य वाङ्:मयातील मैलाचा दगड ठरली आहेत. १९६० नंतर दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्याने आपला ठसा साहित्यविश्वात उमटवला आहे. १५ ऑगष्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला भारतीय सविधान लागू झाले. संविधानातील स्वातंत्र समता, बंधुभाव, न्याय, हक्क या मूलभूत अधिकाराची जाणीव भारतीय जनतेला होऊ लागली. दलित म्हणजे हजारो वर्षापासून प्रस्थापित व्यवस्थेत भरडलेला, पिळलेला असा वर्ग होय.त्यांना व्यवस्थेने शिक्षणावर बंदी घातली होती.

विषमतावादी व्यवस्थेत कोंडलेली मने स्वछेंद विहार करू इच्छित होती. ती संधी १९५० नंतर दलित वर्गाला उपलब्ध झाली. आपले दु:ख, दारिद्रय, विषमता, अंधश्रध्दा, दैववाद नाकारून नवयान निर्मितीसाठी लेखकांची मोठी फलटण उदयास आली. त्यांनी पाहिलेले, अनुभवलेले दु:ख रंगभूमीच्या आधाराने वेशीवर टांगले. त्यामुळेच दलित रंगभूमी हे वास्तव, प्रखर साहित्य म्हणून ओळखले जाते.

औरंगाबाद शहर, मिलिंद कॉलेज, नागसेनवन परिसर, हे दलित,आबेडकरी चळवळीचे प्रमुख सांस्कृतिक केंद्र बनले होते. स्वत: डॉ. आंबेडकरांनीच दलित जीवनावर नाटके लिहिण्याचा सल्ला दिला होता.तसेच बाबासाहेब नेहमी सांगत “गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या; मग तो बंड करून उठेल”. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊनच डॉ. म.भि. चिटणीस यांनी ‘दलितांची युगयात्रा’ (१९५६) , प्रभाकर वैराळे यांनी ‘सिध्दार्थ गौतम’(१९६५), वि.रू गोडबोले ‘रक्त उसळतय माझ’ ( १९८३ ) एकांकिका इत्यादी नाटके व एकांकिकेला सुरूवात झाली. पुढे प्रचंड प्रमाणात नाट्यलेखन झाल्याचे आढळते.

**दलित रंगभूमीच्या व्याख्या**

1. **तारा भवाळकर –** आंबेडकरी विचाराच्या जाणीवा ज्या ज्या रंगमंचावरून व्यक्त होतात त्या रंगमंचास दलित रंगभूमी असे म्हणतात.
2. **विजयकुमार गवई –** सामाजिक, धार्मिक, आर्थिक पिळवणूकीत बळी ठरलेले असतील अशांना स्वाभिमानाने जगा असा संदेश देणारी समर्थशक्ती म्हणजे दलित रंगभूमी होय.
3. **भि.शि.शिंदे –** ज्यांना आतापर्यंत कोणतेही हक्क मिळालेले नाहीत. ज्यांचे शोषण झालेले आहे मग ते सामाजिक, धार्मिक, अर्थिक पातळीवरील असेल अशा अपेक्षित, वंचित लोकांचा आपल्या हक्कासाठी काढलेला आवाज म्हणजे दलित रंगभूमी होय.
4. **दत्ता भगत –** आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणारे जींवनविषयक दृष्टिकोनाच्या आधारे स्वत:ला आणि वास्तस्वाला जाणून घेण्याचा उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित नाटक होय.

5. **अविनाश डोळस** – दलित नाटक प्रामुख्याने आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेल्या आकलनाचा अविष्कार आहे.

**दलित रंगभूमीचे स्वरूप वैशिष्टे :**

दलित रंगभूमीचा जेव्हा आपण उल्लेख करतो. तेव्हा दलित या शब्दाचा अर्थ शोषित, पिडित, अडलेले, नडलेले. वंचित या अर्थाने विचारात घेतला जातो. समाज व्यवस्थेत न्याय न मिळालेले, भरडले गेलेले, वंचित असलेले घटक म्हणजे दलित असे संबोधले गेले. जो जो वंचित पिडीत, शोषित वर्ग आहे, त्यांचा दबलेला आवाज बुलंद करण्याचे श्रेय दलित रंगभूमीला जाते.

1. दलित रंगभूमीवरील नाटक म्हणजे देशातील विषतावादी समाजव्यवस्येला जबरदस्त हादरा देणारे धारदार हत्यार म्हणून वेगळे अस्तित्व आहे.
2. दलित रंगभूमीवरील नाटके हे इतिहासाचे गोडवे गात नाहीत, तर इतिहासाचा अर्थ वर्तमान व भविष्याशी प्रस्थापित करतात ( उदा. काळोखाच्या गर्भात ).
3. दलित नाटकाचा जन्मच मूळात अनुभवातून, सामाजिक दु:खातून झालेला आहे म्हणून नाट्यपरंपरेतील बेगडीपणा दलित नाटकाला नकोसा वाटतो.
4. दलित रंगभूमीवरील नाटकांची भाषा रोखठोक, वैचारिक बांधिलकी जोपासणारी, प्रस्थापिताविरूध्द उघडपणे संघर्ष करणारी आहे.
5. विद्रोही जाणीवाचा अनुभव, ह्या वर्गाच्या वाटयाला आलेले दु:ख, दैन्य, अप्रतिष्ठा, विषण्ण करणारे दर्शन दलित नाटकातून ज्वलंतपणे साकारले. (तन माजोरी नाटकातील वेठबिगारी, खेळीया तील नारायणचा खून)
6. दलित रंगभूमीवरील नाटके विषम समाजव्यवस्थेला,अर्थव्यवस्थेला नाकारून मानव कल्याण, आदर्श मानवी जीवनाचा स्वीकार केला आहे.
7. दलित रंगभूमीवरील नाटकात अंधश्रध्दा, दैववाद, जातिवाद यावर कडाडून टीका केली आणि तर्कवाद, बुध्दिप्रामाण्यवाद,नीतीवाद यांचा अंगिकार केला आहे.
8. दलित रंगभूमीवरील नाटकातून 'स्व'त्वाचा शोध ,परंपरेला नकार परिवर्तनाचा ध्यास,न्याय,स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वाची बांधिलकी प्रकर्षाने जाणवते.
9. आरक्षण, आंतरजातीय विवाह, राजकारण,विद्यापीठ नामांतर प्रकरण, दलित चळवळी, दलितांचे दु:ख, व्यथा व वेदना यांना दलित रंगभूमीने नाटकातून ज्वलंतपणे साकारले आहे.

**दलित रंगभूमीवरील नाट्यसंस्था**

दलित रंगभूमीने नाटकाचे प्रयोग करण्यासाठी अनेक नाट्यसंस्थाची उभारणी केली . त्यांची माहिती असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| पूणे | - | दलित रंगभूमी , दलित थिएटर ,प्रबुध्द रंगभूमी. |
| नागपूर | - | नवचैतन्य रंगमंच, पॅंथर्स थिएटर्स, भारतीय दलित रंगभूमी. |
| मुंबई व ठाणे | - | अभिरूची , नालंदा. |
| औरंगाबाद | - | दलित थिएटर्स , प्रतिभा थिएटर्स , दलित नाट्य अकादमी. |

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | - | समता रंगममंच, प्रज्ञा रंगमंच. |
| अमरावती | - | दलित थिएटर्स. |
| दिल्ली | - | आव्हान. |
| अंबेजोगाई | - | दलित युवा आघाडी. |
| संगमनेर | - | नवनिर्माण रंगमंच. |
| जामखेड | - | जामखेड ग्रुप |
| मध्यप्रदेश | - | जग नाट्यमंच |
| बिहार पाटणा | - | लोकसमिती , जनपथ |

**अखिल भारतीय दलित नाट्य संमेलने**

| संमेलने - अध्यक्ष | - | ठिकाण | - | वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1. पहिले - श्री.भि.शि. शिंदे | - | पूणे | - | फेब्रुवारी १९८४ |
| 2. दुसरे – प्रा. मधुसूदन गायकवाड | - | अहमदनगर | - | मे १९८५ |
| 3. तिसरे – प्रा. दत्ता भगत | - | आंबेजोगाई | - | मे १९८६ |
| 4. चौथे – श्री . प्रेमानंद गज्वी | - | नागपूर | - | जानेवारी १९८८ |
| 5. पाचवे – प्रा. अविनाश डोळस | - | नांदेड | - | जानेवारी १९९० |
| 6. सहावे - श्री. रामनाथ चव्हाण | - | नाशिक | - | मे १९९२ |
| 7. सातवे – श्री. विजयकुमार गवई | - | धुळे | - | मे ११९९३ |
| 8. आठवे – श्री. प्रभाकर दुपारे | - | चंद्रपुर | - | जानेवारी १९९५ |
| 9. नववे – श्रीमती. विठाबाई नारायणगांवकर | - | प्रवरानगर | - | नोहेंबर १९९६ |

**दलित रंगभूमीची पुर्वपरंपरा**

दलित रंगभूमी १९६० नंतर जरी नावारूपाला आली तरी दलित रंगभूमीची बीजे महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' ( १८५५) नाटकात दिसतात. दलित परंपरेतील हे पहिले नाटक म्हणून विचार करावा लागेल. महात्मा फुले यांनी त्यांच्या नाटकात ब्राम्हणशाही आणि ईश्वरशाही यांच्या शोषणाचे भीषण चित्रण केले. महात्मा फुले यांनी पुरोहितशाहिवर हल्ला करून जोशी बुवा कसे शेतकरी आणि त्यांच्या पत्नीची फसवणूक करून, भुलथापा देऊन त्यांचे धन कसे लुबाडतात याचे सडेतोड चित्रण केले आहे. महात्मा फुले यांचे हे नाटक आधुनिक मराठी दलित परंपरेतील पहिले नाटक म्हणून नोंद होणे क्रम प्राप्त ठरते.

किसन फागोजी बनसोडे हे एक शिक्षक होते. त्यांनी १९४२ साली श्री संत चोखामेळा चरित्र प्रकाशित केले. 'चोखामेळा देवदर्शन' व 'सत्यशोधक जलसा' हे दोन नाटके त्यांनी लिहिली. यांनी दलितांच्या न्याय हक्कासाठी १९०१ मध्ये 'सन्मार्ग बोधक अस्पृर्श्य समाज' ही संस्था स्थापन करून सतत वीस वर्ष प्रबोधनाचे कार्य केले. उमा बाबा मांग सावळजकर यांनी 'मोहन बटाव' हा वग १८६० मध्ये लिहिला. या वगामध्ये अश्लिलता, सौंदर्याची ओढ, शारीरिक आसक्ती, शृंगारवर्णन भडकपणे आले. पण त्या वगात दलितांच्या उध्दाराचा, माणुसकीचा सुतराम संबंध नव्हता. तमाशाचा जन्म हा महाराष्ट्रातील परंपरागत प्रचलित सादरीकरणातून झाला. ललित, गोंधळ, दशावतारी

खेळ इत्यादी लोक मनोरंजनाचे प्रकार होते. महारी लावणी महाराष्ट्रात खूप जुनी परंपरा आहे. विदर्भ, मराठवाडा या भागात संगीत, जलसा नृत्य, गीत, संगीत, वाद्य उत्तर पेशवाईत दृढ झाल्या होत्या.

आधुनिक दलित नाटककारांनी शाहिरी, लावणी, वगनाट्य व नाटक इत्यादी प्रकारांनी समृध्द केले आहे. गोपाळबाबा वलंगकर, किसन फागूजी बनसोडे, भाऊ बापू मांग नारायणगावकर, बापू कुसवाडकर, शिवा संभा कौलापूरकर, दादू ईंदूरीकर, शाहिर अण्णाभाऊ साठे इत्यादी नाटककारांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. नाटक वाङ्:मयाबरोबरच सत्यशोधकी जलसे आणि आंबेडकरी जलसे यांचा उदय झाला. रामचंद्र बाबा घाडगे यांनी १९१५ मध्ये सत्यशोधकी जलशांची स्थापना केली. तर आंबेडकरी जलशांचे संस्थापक भिमराव कर्डक होते. त्यांनी नाशिक जिल्हयात युवकांना एकत्र करून जलसा मंडळ स्थापन करून १९५३ पर्यंत जलशांचे कार्यक्रम सादर केले. त्यावेळी समाज निद्रित अवस्थेत होता.अशा काळात भिमराव कर्डकांनी समाजाला जलशांच्या माध्यमातून जागृत कले. पुढे वामनदादा कर्डक, गोपाळबाबा वलंगकर,केरूबुवा गायकवाड इत्यादी जलसाकारांनी प्रबोधनातून नवचैतन्य आणले.

दलित रंगभूमीत समाज परिवर्तनाचे खूप मोठे सामर्थ्य आहे. साचलेपणाला छेद देऊन मनोरंजन आणि करमणूक या मूल्यापेक्षा सामाजिक बांधिलकीचे भान स्वीकारून, दलित रंगभूमी परिवर्तनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. सामाजिक व सांस्कृतिक लढा,चळवळ उभी करताना माणसांच्या हक्कासाठी ,समानतेसाठी ,समग्र मुक्तीसाठी , प्रज्ञा, शील,करूणा यांचा प्रत्यय देणे, गौतम बुध्द आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना पुढे घेऊन जाणे हेच दलित रंगभूमीचे प्रमुख लक्ष आहे. दलित रंगभूमीमध्ये स्त्रीयांचे शोषण, दारिद्रय, उपेक्षा, अवहेलना यांचे पडसाद पडलेले दिसतात.

**दलित रंगभूमीवरील निवडक नाटके**

दलित रंगभूमीवर काही नाटकाने विषम समाजव्यवस्थेला हादरे दिले. जास्त चर्चेत राहिले अशा नाटकांचा परामर्ष घेऊ.

**1. काळोखाच्या गर्भात :-**

काळोखाच्या गर्भात या नाटकाचे लेखक भि.शि. शिंदे हे आहेत. ते पूणे येथे फेब्रुवारी १९८४ मध्ये झालेल्या पहिल्या अखिल भारतीय दलित नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते. प्रस्तुत नाटकात नामांतर चळवळीचा, त्यातील जातीय दंगलीचा, लेखकाच्या संवेदनक्षम मनावर विलक्षण प्रभाव पडला आहे.त्यांना आलेल्या अनुभवाचे, दु:खाचे, अन्यायाचे चित्रण रेखाटले आहे. हजारो वर्ष गुलामीत, अत्याचारात भरडले गेलेले, स्वातंत्र्य मिळूनही माणसाला माणूस म्हणून हक्क मिळत नाहीत.यांचे त्यांना दु:ख वाटते. लेखकांनी त्या भरडलेल्या माणसाला काळोखाच्या गर्भातून बाहेर पडा आणि क्रांतिसूर्य प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करा असा संदेश नाटकातून दिला आहे.

नाटकाच्या सुरूवातीपासूनच प्रस्थापितांच्या वाईट प्रवृतीचे सूत्रधारांने तिव्र शब्दात निषेध केलेला आहे. प्रस्थापितांना स्वार्था,कपटी,मतलबी संबोधले आहे.हजारो वर्षापासून खितपत पडलेल्यांना महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी जागे केले आहे. आता दलित अन्यायाविरूध्द बंड करतील.ते शांत बसणार नाहीत,मुक्तिसंग्रामाचा लढा चालूच ठेवणार आहेत.दलितांच्या पोटातील ज्वालामुखी एक दिवस क्रांतीचा वणवा पेटवेल असे नाटककार म्हणतो. दलितांची अस्मिता जागृत करणारा संवाद "ईश्वर आणि धर्माच्या नावाखाली आम्ही कुठल्याही मानवाला पायदळी तुडविले जाऊ देणार नाही. तसे झाले तर आम्ही त्याविरूध्द बंड करू, क्रांतीची कास धरु. आम्हाला मानवाचे हक्क मिळालेच पाहिजेत.( काळोखाच्या गर्भात – अंक १, पृष्ठ ७) सदा गायकवाड हे पात्र येथील प्रतिकूल

परिस्थिती पाहून दलितांनी चौफेर लढा दिला पाहिजे असे म्हणतो "ही दंडुक्याची लोकशाही असून आम्हाला दंडुकाच हातात घ्यायला पाहीजे. (तत्रैव अंक २, पृष्ठ ४२)

तिसरा अंक विचारात घेताना दलित- सवर्ण संघर्ष या घटनेत अकरा जवान मृत्यूमुखी पडले. सवर्णाची हिंसात्मक भूमिका पाहून तात्या सोनवणे म्हणतो. "आमी भीक मागायचं सोडलं तरी आमच्या टकु-यात काठी, काबाडकष्ट करू,जगू म्हणालं तरी आमच्या छातीवर बंदुका ! मग आमी करावं तरी काय ? कुठं जावं ? हा देश सोडू जावं का ? सांगा ! कुठं जावं आमी ? काय करावं. ? (तत्रैव, अंक ३ पृष्ठ ५७) सरकार जरी बदलले तरी त्यांच्याबद्दल दलितांच्या मनात भीतीचेच वातावरण आहे. सर्व सरकारे सारखीच आहेत असे त्यांचे मत आहे.

शेवटी सवर्ण लोकांनी दाजी सकटचा खून केला. कुटुंबियांना काही न्याय मिळाला नाही. भरपाई पण मिळाली नाही. म्हणून त्यांचा मुलगा सिद्राम पेटून उठतो. "मी आता गप्प बसणार नाही. म्या कायदा हातात घेणार आहे. माझ्या बाचा सूड घेणार. मला आसलं नामर्दाचं जिणं जगायचं न्हायू !" (तत्रैव, पृष्ठ ७१) सिद्राम आपल्या मनातील राग अनावर होऊन चिडचीड करतो. संतापाने विद्रोही होतो. अशाप्रकारे काळोखाच्या गर्भात या नाटकातून भि.शि.शिंदे यांनी अन्याय, आत्याचार, जुलूम यांना झूंगारून विद्रोहाचा पवित्रा घेणारी पात्रे घटनाप्रसंग रेखाटले आहेत.

**थांबा ! रामराज येतंय :-**

प्रकाश त्रिभुवन म्हणतात मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोनामुळे दलिताच्या जीविताची , मालमत्तेची खूप हानी झाली आहे. सवर्णानी अस्मितेच्या नावाखाली अमानुष अत्याचार केल्याचे नाटककारांनी मांडले. नाटकातील दलित सामाजिक कार्यकर्ता समाजसेवा वृत्तीने वस्तीत शाळा चालवतो. सवर्णानी द्वेष भावनेतून ती शाळा जाळून टाकली. पोलिसानी तपासणी करण्याचा दिखावा केला. दलितांना एकजूट होण्याचा सल्ला आनंद देतो.

"तुम्ही माणसं आहात. माणसाचं जीवन जगा !अन्यायाविरूध्द झगडायला शिका. प्रस्थापित सवर्णानी कोणत्याही माध्यमातून दलितावर केलेले अत्याचार आता सहन केले जाणार नाहीत. ( थांबा ! रामराज्य येतंय – अंक १ पृष्ठ २, ३) नोकरीमध्ये राखीव जागाची तरतूद संविधानात आहे. पोलिस पाटलाची जागा दलितांना मिळाली पाहिजे असा आग्रह आनंदाचा असतो. जर असे झाले नाही तर दलितांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होईल. आनंदाचा सरकारकडे, प्रस्थापितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो.राखीव जागा आणि सवलती ह्या काही उपकारातून देत नाहीत तर, तो आमचा हक्क आहे.देणेकरी आहात तुम्ही आमचे असे तो स्पष्ट बोलतो. ९ व्या प्रवेशातील आलेला प्रसंग असा की, आनंदा आणि पाटील यांच्यातील संवाद पाटलांनी आनंदच्या जातीसंबंधी,शिक्षणासंबंधी, राखीव जागा संबंधी उपहास, तिरस्कार व्यक्त करतो. पुढे पाटील म्हणतो गावातील पोलिस पाटलाची नोकरी करण्यापेक्षा शहरात मोठ्या हुदयाची नोकरी केलेली बरी. आनंद गावात राहून समाजाची सेवा करण्याचे स्वप्न पाहतो. पाटील दबाब आणतो. संघर्ष पेटतो. चिघळतो आनंद संपतो,आनंद प्रतिनिधिक पात्र म्हणून नाटककारांनी साकारले आहे.

**वाटा-पळवाटा**

वाटा-पळवाटा हे दलित रंगभूमीवरील अतिशय महत्वाचे नाटक आहे.डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी प्रभावित झालेल्या, तीन पिढयातील दलित राजकारण,समाजकारण यांचा अंतर्भाव झालेला आढळतो.

प्रा. दत्ता भगत या बाबत ते म्हणतात की, ह्या तीन पिढयातील अंतर फार गुंतागंतीचे असून पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील आहे.ही पिढी अशिक्षित,जास्त मोठा बौध्दिक अवाका नसणारी,निष्ठावान व प्रामाणिक अशी आहे.दुसरी पिढी सुशिक्षित ,अर्थिक बाजू चांगली असलेली, समाजाच्या व स्वत:च्या प्रश्नाबाबत गंभीरपणे विचार करणारी अशी आहे.तिसरी पिढी संतापलेली लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली अशी आहे. या तीन पिढयाचे चित्रण या नाटकातून आले आहे.

पहिल्या पिढीचे नेतृत्व 'काका' ने केले आहे. डॉ. आंबेडरानी त्यांना बौध्द धम्माची दीक्षा दिली आहे. दलित चळवळ, बौध्दमहासभा, बौध्दविहारे, दलित पुरग्रस्तांना घराचा ताबा मिळवून देणे, या सर्व कामात काका अग्रेसर आहेत. स्वातंत्र्य सेनानी दासराव गुरुजी यांची मुलगी सोनल आणि अर्जुन यांचे एकमेकांवर प्रेम आहे. ते त्यांना पसंत नव्हते. पुरग्रस्तांना घरे मिळावे म्हणून काका, अर्जुन पालकमंत्र्याच्या घराला घेराव घालतात.याला प्रा.सतीश गोडघाटेनी ही झुंडशाही आहे असे म्हणतात. चळवळीच्या संदर्भात प्रा.सतीश गोडघाटे, अर्जुन आणि काका यांच्यात मतभेद होतात. दलित चळवळीला येणारी संभाव्य धोके प्राध्यापक बोलून दाखवतात. अर्जुनच्या भविष्याबद्दल प्रा. सतीश यांना अधिक चिंता वाटते. ( वाटा- पळवाटा पृष्ठ ३८ )

नाटकात पोलिसांनी केलेला गोळीबार यामुळे दलित सुरक्षित नाहीत, अशी भावना निर्माण होते. अर्जुनने शेवंता या दलित विधवा स्त्रीला घरपट्टी भरली नाही, म्हणून घराबाहेर काढले. या घटनेमुळे काका आणि प्राध्यापकाच्या मनात अर्जुनबाबत आस्था उरली नव्हती. पुढे पोलिस गोळीबारात निष्पाप शेवंता निधन पावते. त्याला कारणीभूत अर्जुनच आहे, म्हणून त्याला महाविद्यालयातून काढून टाकावे अशी विद्यार्थी मागणी करतात. प्रा.सतीशवर दबाव येतो. दुसरीकडे सोनल अर्जुन ऐवजी अरविंद देशमुख यांच्याशी विवाह करण्याचा विचार करते. दलित चळवळीच्या वाटा-पळवाटा या ठिकाणीही दिसतात.

शेवटी अर्जुन म्हणतो चळवळीत उतरायचे तर,किंमत मोजावीच लागते.सोयीनुसार वांझ चर्चा करून संधीसाधूपणाचे जीवन जगणे योग्य होणार नाही. शेवटी प्रा. सतीशलाही अर्जुनचे विचार पटतात. त्यांच्या सारखे आपणाला काही करता आले नाही अशी खंतही वाटते. काकाचा ध्येयवाद आणि डॉ. आंबेडकरांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी अर्जुन व काका, विचार प्रधान प्रा. सतीश आणि सौ.हेमा याचीच खरी गरज समाजाला आहे. हे या नाटकाच्या माध्यमातून प्रा. दत्ता भगत यांनी सांगितले आहे.

**सारांश**

समकालीन दलित रंगभूमी उदयास येण्यासाठी एक बाब महत्वपूर्ण आहे, ती म्हणजे भारतीय संविधान होय. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, शिक्षण, विचारस्वातंत्र्य हे हक्क संविधानाने बहाल झाले. शिका,संघटीत व्हा, संघर्ष करा हा डॉ.आंबेडकरांचा विचार स्वीकारून दलित रंगभूमीचा उदय झाला. समाजातील ज्वलंत प्रश्नाना नाटकातून पुढे आणले. जातीभेद, आंतरजातीय विवाह, मनातील दबलेला आवाज बुलंद करण्याचे श्रेय दलित रंगभूमीला द्यावे लागेल. भि.शि.शिंदे, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, प्रकाश त्रिभुवन, नामदेव व्हटकर, रामनाथ चव्हाण, प्रेमानंद गज्वी इत्यादी नाटककारांनी दलित रंगभूमी आणि दलित नाट्य चळवळीला सवोच्च शिखरावर पोचविण्याचे काम केले आहे.

**निष्कर्ष :-**

1. दलित रंगभूमीवर आणलेले विषय वास्तववादी, ज्वलंत स्वरूपाचे आहेत.
2. दलित रंगभूमीमुळे दलित वर्गात जागृती, नवचैतन्य आले आहे.

3. दलित रंगभूमी विषमता, अंधश्रध्दा, दैववाद नाकारून समताधिष्ठीत समाजनिर्मितीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

4. दलित रंगभूमीने प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देऊन, आदर्श मानवी जीवनाचा स्वीकार करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

5. दलित रंगभूमीची भाषा अतिशय रोखठोकआणि बुध्द, चार्वाक, फुले, शाहू, आंबेडकर विचारांची बांधिलकी जोपासणारी आहे.

**संदर्भसूची :-**


1. दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ –डॉ. मधुकर मोकाशी स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे
2. दलित रंगभूमी - संपादक –भालचंद्र फडके
3. काळोखाच्या गर्भात –भि. शि. शिंदे स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे
4. थांबा ! रामराज्य येतंय -प्रकाश त्रिभुवन, दलित थिएटर प्रकाशन,औरंगाबाद
5. वाटा-पळवाटा -प्रा. दत्ता भगत कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे

# चळवळीतील स्वानुभवाची अभिव्यक्ती म्हणजे 'आम्ही लढलो - आम्ही घडलो'

**डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने**

**मराठी विभाग प्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि जालना.**

**प्रास्ताविक:**

कोणत्याही व्यवस्थात्मक दोषाच्या निवारणार्थ सामुहिक प्रयत्नांची आवश्यकता असते. कारण एकेकट्याने लढा देऊन प्रश्न मिटणारा नसतो. व्यवस्थेतील एखाद्या घटकाच्या तीव्रतेचे पडसाद भिन्न असले तरी होणारा प्रभाव जाचकच असतो. त्यामुळे अशा वेळेस समविचारी लोक एकत्र येतात आणि त्या विरोधात एल्गार पुकारतात. कधी हा त्यांचा लढा यशस्वी होतो, तर कधीहतबलता, निराशा पदरी पडते. प्रत्यक्ष अयशस्वी झाले तरी चळवळीतील कार्यकर्ते कालपेक्षा या अनुभवामुळे आज अधिक अनुभवसंपन्न, मानसिकदृष्ट्या व्यापक आणि एकमेकांच्या जवळ येतात हे मात्र खरे. भावी आयुष्यात जीवन व्यतीत करताना ही अनुभवाची शिदोरी घेऊन वेगवेगळया क्षेत्रात हे कार्यकर्ते जेव्हा जातात, तेव्हा छोट्या-मोठ्या प्रसंगाने, आघाताने डगमगून न जाता भक्कमपणे उभे राहतात. खऱ्या अर्थाने चळवळीत कार्य केलेला कार्यकर्ता निराश होत नाही, दुसऱ्याचे अहित साधत नाही, सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न करतो. असे ज्याच्याकडून होत नाही त्यास चळवळीचे संस्कार समजले नाहीत, समजले तरी पचले नाही आणि पचले तरी उपयोजन साधता आले नाही, असा त्याचा अर्थ निघतो; परंतु 'आम्ही लढलो आम्ही घडलो'[१] या पुस्तकातील आत्मकथन करणाऱ्या कार्यकर्त्यांना चळवळीचा संस्कार समजला, पचला आणि उपयोगातही आणता आला, असे सदरहू पुस्तक वाचल्यानंतर प्रत्ययास येते. चळवळीतील कार्यकर्त्यांच्या अनुभवकथनाचे संपादन डॉ. मारुती तेगमपुरे आणि डॉ. अतुलकुमार चौरपगार या संपादकद्वयांनी केले आहे.

**अनुभवकथनाचे स्वरूप :**

क्रमिक शिक्षण घेत असतानाच समाज शिक्षणाचेही धडे याकार्यकर्त्यांनीघेतल्याचे पुस्तकातील लेखांवरून दिसून येते. एकूण सव्वीसलेखांच्या माध्यमातून तेवढ्याच प्रकारचे जीवनानुभव वाचकांच्या भेटीला येतात. तसे पाहता हे लेख वेगवेगळया व्यक्तींनी लिहिले असले तरी, त्या सर्वांचा एक लसावी हमखास काढता येतो. यातील सामायिक गोष्ट म्हणजे अन्यायाबद्दल चीड आणि नाहीरे वर्गाबद्दलची मनस्वी करुणा बुद्धी. व्यक्ती जेव्हा शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे आकलन करू लागतो, तेव्हा त्यास क्रमिक पुस्तकातील सिद्धांत आणि आजूबाजूचे वातावरण, चाललेला व्यवहार यात मोठी तफावत जाणवते, विसंगती आढळते, त्यामुळे तो चलबिचल होतो. संवेदना बोथट न झालेला कोणीही इसम कोणत्याही प्रकारच्या भेदभावाने उद्विग्न होतो आणि त्या विरोधात उभा राहतो. आम्ही लढलो आम्ही घडलो या पुस्तकाचे पूर्ण नाव केवळ तेवढेच नाही, तर त्या मुख्य मथळयापुढे 'न्यायासाठी, हक्कांसाठी, नव्या समाजाच्या निर्मितीसाठी' असे ते पूर्ण नाव आहे. आम्ही लढलो असे म्हणत असताना संपादकद्वयांनी कशासाठी लढलो? याची कारणे सुद्धा दिली आहेत आधुनिक भांडवलशाही व्यवस्था असो अथवा प्राचीन सामंती परंपरा,

न्यायाची बाजू शोषितांच्या दृष्टीने कमजोर आज राहिली आहे. कारण कोणत्याही काळातील धनिक आणि वरच्या वर्गातील लोकांचे हक्क शाबूत राहण्यासाठी कधी लिखित तर बहुतांश वेळा अलिखित सामाजिक करार झालेला असतो. प्रसिद्ध विचारवंत रुसो यांनी तर सत्ता आणि संपत्तीच्या रक्षणासाठी सामाजिक करारान्वये दीन - दुर्बलांच्या पायात विविध नियमांच्या रुपाने बेड्या अडकवल्याचे म्हटले आहे. "कायदा दुर्बलांच्या विरोधात श्रीमंतांना मदत करतो. न्याय हा बहुतेक वेळा हिंसेचे आणि वर्चस्व गाजविण्याचे हत्यार असते. तसेच संस्कृती, विज्ञान, कला तसेच धर्म हे समाजाची प्रस्थापित व्यवस्था जैसे थे ठेवण्याचे कार्य करतात. रुसोच्या म्हणण्यानुसार संपत्ती हीच मानवी असंतोषाचे व अस्वस्थतेचे मूळ कारण आहे."[२]या पार्श्वभूमीवर या पुस्तकातील लेखांचे वाचन केल्यानंतर आपणास प्रकर्षाने जाणवते की, यातील लेखांतून या विरोधात सूर निघतो आहे. कारण यातील अनुभव हे केवळ आपण लहानाचे मोठे कसे झालो आणि कोणत्या टप्प्यावर कशा समस्या आल्या याचे कथन नाही, तर तो संघर्ष आमच्या वाट्याला का आला? याच्या शोधासाठीचेहे आत्मकथन ठरते. विद्यापीठीय शिक्षण व्यक्तीच्या भावी आयुष्यावर प्रभाव पाडणारे - मग ते सकारात्मक-नकारात्मक कोणत्याही प्रकारचे- असते. परंतु आपण ज्या मित्रांच्या घोळक्यात वावरतो, हे वावरणे अधिक मूलगामी, फलदायी ठरावे असे वाटत असेल, तर काही एक विचार, भूमिका, जीवनाबद्दलचे निश्चित तत्त्वज्ञान असणाऱ्या मित्रांसोबत वावरल्यास आपल्याही विचाराला, आयुष्याला निश्चितच कलाटणी मिळते. अशा आयुष्याप्रती, समाजाप्रती गंभीर असणाऱ्या व्यक्तींच्या छोट्या छोट्या आत्मकथनात्मक लेखांचा संग्रह म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक होय. त्याचे स्वरूप विशद करताना संपादकद्वयांनी आपल्या संपादकीयात म्हटले आहे की, " स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद हे ब्रीद आत्मसात करून स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) देशातील एक लढाऊ विद्यार्थी संघटना म्हणून नावलौकिकास पात्र ठरली आहे. या संघटनेत आमची जडणघडण झाली, याचा आम्हाला अभिमान आहे. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेत काम करीत असताना व नंतरच्या आयुष्यातही काही मंडळी आपली ध्येयनिष्ठा घेऊन कार्य करीत आहेत. अशा ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांचे, नेत्यांचे संघर्षमय जीवन शब्दबद्ध व्हावे म्हणून केलेला हा प्रपंच असून मराठवाड्यातील आजी-माजी कार्यकर्त्यांनी चळवळीच्या जीवनातील आपले अनुभव लिहावे व ते एकत्र ग्रंथरूपाने प्रकाशित केले तर नवीन कार्यकर्त्यांना अधिक लाभदायक ठरू शकेल. या व्यापक हेतूने हा उपक्रम हाती घेतला आहे."[३] म्हणजेच यातील सर्व लेख एका विशिष्ट विचारसरणीच्या विद्यार्थी संघटनेत काम करणाऱ्या तरुणांचे काही घटना प्रसंगांना अनुसरून केलेली ही अभिव्यक्ती आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची विद्यार्थ्यांना एकत्र आणणारी एक शाखा म्हणून याकडे पाहिले जाते. अन्याय, विसंगती, शोषण, लिंगभेद, प्रदेशभेद या सर्वांच्या विरोधात सुसंगतरित्या प्रतिकार करण्याचे तत्त्वज्ञान आपलेसे करून मार्क्सवादी विचार प्रमाण मानणारी एक संघटना म्हणून एसएफआयची ओळख आहे. महाराष्ट्र पातळीवर ही संघटना पूर्वीपासून कार्य करत असली तरी मराठवाड्यात एसएफआयची स्थापना तशी उशीराच झाली. मराठवाड्यात विद्यार्थ्यांसाठी ही संघटना आणण्यामध्ये डॉ. विठ्ठल मोरे यांचा सिंहाचा वाटा आहे.

प्रस्तुत पुस्तक त्यांनाच अर्पण केले आहे. विद्यार्थी संघटना ज्या त्रयींनी म्हणजेच डॉ. विठ्ठल मोरे, □ड. उद्धव भवलकर आणि डॉ. अरुण शेळके यांच्या हयातीत हा ग्रंथ प्रकाशित होऊ शकला नाही. याची खंत संपादकद्वयांनी व्यक्त केली आहे. एसएफआयचे संस्थापक अध्यक्ष म्हणून डॉ. विठ्ठल मोरे सर्व मराठवाडावासीयांना सुपरिचित होते. विशेषतः विद्यार्थी, शिक्षक - प्राध्यापक यांच्यामध्ये त्यांना मानाचे स्थान होते. प्रस्तुत पुस्तकात आरंभीच त्यांची एक दीर्घ मुलाखत वाचायला मिळते. यात १९७४ मध्ये वसमत येथे कॅनॉल इन्स्पेक्टरच्या जागेसाठी मुलाखतीला आलेल्या बेरोजगार तरुणांवर गोळीबार होऊन त्यात दोन तरूण कसे ठार झाले आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून मराठवाडा विकास आंदोलन कसे उग्र झाले, याची माहिती मिळते. आजही मराठवाडा प्रादेशिक असमतोलाच्या झळा सोसतो आहे. "आमदार काशिनाथराव वैद्य यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या ऐवजी स्वतंत्र मराठवाड्याची मागणी का केली होती? किंबहुना अशी काही मागणी झाली होती व त्यावेळेस कोणीच प्रतिसाद दिला नाही, हे आपल्या गावी सुद्धा नसते. महाराष्ट्रात सामील झाल्यानंतर अवघ्या पंधरा वर्षात मराठवाडा विकास आंदोलन का सुरू झाले? आणि त्या वेळेस दिलेल्या आश्वासनांचे आणि राजकीय वचनांचे काय झाले? याविषयी आम्ही कधी बोलणार आहोत की नाही."[४]हीच भूमिका घेऊन एसएफआयने तेव्हा रान उठवले होते. या संघटनेला लढा कसा उभारायचा हे माहित आहे. त्या इतिहासाच्या मुशीतूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या युवकांनी चळवळीशी संबंधित अनुभव कथन केले आहेत

या अनुभव कथनात ड. उद्धव भवलकर यांपासून डॉ. डी. एल. कराड, कॉ. अण्णा सावंत, आदिनाथ इंगोले, डॉ. उमाकांत राठोड, डॉ. दत्तारणखांब, डॉ. भाऊसाहेबझिरपे इत्यादी नेते आणि कार्यकर्त्यांच्या अनुभवास शब्दबद्ध करण्यात आले आहे. आजच्यासारखी तंत्रज्ञानात्मक साधने उपलब्ध नसताना, विद्यार्थ्यांसाठी संस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, झालेल्या कार्यक्रमाची प्रेसनोट तयार करणे आणि औरंगाबाद शहरात सर्व वृत्तपत्रांच्या कार्यालयात ती पायी-पायी जाऊन देणे या सर्व गोष्टी या विद्यार्थ्यांनी केल्या. विद्यापीठीय शिक्षण व्यवस्थेत मग तो फीसच्या बाबतीत असो अथवा ग्रंथालयाच्या पुस्तकांच्या संदर्भात असो किंवा वसतिगृहाशी निगडित असो, ज्या ठिकाणी विद्यार्थी आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यात संघर्ष निर्माण झाला तेथे एसएफआयने ठाम भूमिका घेऊन विद्यार्थी हिताचे निर्णय घेण्यास प्रशासनास भाग पाडल्याचे यातून दिसून येते. आज विद्यापीठीय शिक्षणाकडे विद्यार्थ्यांची ओढ कमी होण्याच्या काळात चळवळ, संघर्ष, अभ्यास, चर्चा, राजकारण आयुष्याला सकारात्मक दिशा देणे, दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करून, उपस्थित राहून, रात्रभर अभ्यास करणे, ताठ मानेने जगण्याचा बेधडकपणा त्याचे महत्त्व आज विद्यार्थ्यांना कळणार नाही; परंतु कितीतरी विद्यार्थी एसएफआयच्या माध्यमातून घडले आणि विविध क्षेत्रात जाऊन समाजाची इमाने-इतबारे सेवा करत आहेत. आपल्या हक्कांसाठी झगडताना नवसमाज निर्मितीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, अहर्निश झगडत आहेत. कारण या कार्यकर्त्यांना संघर्षाचे मोल उमजलेले आहे. शोषणाधिष्टित समाजव्यवस्था दूर करून सर्वांना समान न्याय प्रदान करणारी,

समाजातील अंतिम घटकाचा प्रथम विचार करणारी समाजव्यवस्था निर्माण करणे, हे या विद्यार्थी चळवळीचे ध्येय आहे. कारण " भांडवलशाहीमध्ये शोषण चालते हे अनेकांना पटते. शोषणस्वाभाविकतः अन्यायकारक असल्यामुळे आपण त्याचा प्रतिकार केला पाहिजे, त्याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, असेही त्यांना वाटते; पण शोषणाच्या या प्रश्नाकडे ही मंडळी फक्त नैतिकतेच्या दृष्टिकोनातून बघतात आणि कामगारांचे वेतन वाढवून घेतले पाहिजे, त्यासाठी लढे उभे केले पाहिजेत एवढीच मर्यादित भूमिका घेतात. भांडवलशाही अर्थव्यवस्था संपविली पाहिजे, अमुलाग्र समाज परिवर्तन झाले पाहिजे असे म्हणण्याऐवजी भांडवलशाहीमध्ये योग्य प्रकारे वितरण झाले पाहिजे असा युक्तिवाद ही मंडळी करतात. भांडवलशाही नष्ट करून पुढच्या टप्प्याकडे समाजवादाकडे जाण्याचा क्रांतिकारक कार्यक्रम नजरेआड करुन, प्रचलित व्यवस्थेमध्ये काही उलटसुलट बदल करून, कामगारांचे शोषण कमी करण्याचा सुधारणावादी कार्यक्रम ते हाती घेतात."[५]असा कोणताही सुधारणावाद शोषणाचे समूळ उच्चाटन करू शकत नाही. त्यामुळे माकपप्रणित एसएफआय ही विद्यार्थी संघटना अमुलाग्र परिवर्तनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचे काम करते.

शहीद भगतसिंग यांच्या विचाराला प्रमाण मानणारी एसएफआय केवळ विद्यार्थ्यांमधील आक्रमकतेला वाट मोकळी करून देण्यासाठी निर्माण झालेली संघटना नाही, तर भगतसिंगांसारखा अभ्यास, जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा, डोळस विश्वास आणि सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, राष्ट्रकार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी निर्माण झाली आहे. हे संस्कार घेऊन बाहेर पडलेली शिक्षित तरुण मंडळी आपापल्या क्षेत्रात काहीतरी भरीव कामगिरी केली पाहिजे, यासाठी सतत प्रयत्नरत आहेत प्रत्येक विद्यार्थ्याने, विचारी वाचकांनी वाचावे असे हे आम्ही लढलो - आम्ही घडलो आत्मकथनात्मक पुस्तक येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांसाठी दिशा दर्शनाचे कार्य करेल हे निश्चित आहे.

**संदर्भ :**


१) डॉ मारुती तेगमपुरे आणि डॉ. अतुलकुमार चौरपगार, आम्ही लढलो - आम्ही घडलो, शब्दवेधबुक हाऊस, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २०२०.

२) उद्धव कांबळे, डॉ. आंबेडकर, दलित आणि मार्क्सवाद : नवे अकलन - नव्या दिशा, लोकवांङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, सप्टेंबर २०१८, पृ. ८९,९०.

३) उनि., आम्ही लढलो - आम्ही घडलो पृ. ०७.

४) डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, आधुनिक केसरी, औरंगाबाद, वृत्तपत्रातील लेख - लेखणी दावणीला बांधू नका, २६ सप्टेंबर २०२१.

५) डॉ. किशोर ठेकेदत्त, मार्क्सचे राजकीय अर्थशास्त्र : एक ओळख, पक्ष शिक्षण माला, पुस्तिका क्र. ०१, प्रकाशक, डॉ. अशोक ढवळे, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २०१२ पृ. २६.

# समकालीन मराठी साहित्य : दलित साहित्य

शीतल आण्णासाहेब सुसरे

मु.पो. पढेगांव, ता. श्रीरामपूर

जि. अहमदनगर – ४१३७२५

मो.नं.९२८४०९०९३३

प्रस्तावना –

समकालीन ही संकल्पना म्हणजे काळासोबत निर्माण होणारे साहित्य होय एखाद्या विशिष्ट कालखंडातील लोकांची मानसिकता मते, जाणिवा, अनुभव, जीवनदृष्टी, भाषा वैशिष्टये मूल्य यांचा पुरस्कार करून लेखक साहित्यक निर्मिती करतात. त्यातूनच साहित्याचे वेगवेगळे प्रवाह निर्माण होतात.१९४५ नंतरच्या मराठी नवसाहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक या साहित्यप्रकारांमध्ये प्रयोगशीलता निर्माण झाली. १९६० नंतर खऱ्या अर्थाने समकालीन साहित्य उदयास आले साठोत्तरी कालखंडामध्ये अनेक साहित्य प्रवाहांची निर्मिती झाली यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, वंचितांचे साहित्य, वैचारिक साहित्य यांचा समावेश आहे. त्याचबरोबर नवलेखक उदयास आले व सर्जनशील साहित्यनिर्मीतीस बहर आला.

उद्दिष्टये –

१) दलित साहित्याचा उगम शोधणे

२) दलित साहित्याचे स्वरूप समजावून घेणे

३) दलित साहित्याची वाटचाल अभ्यासणे

४) दलित साहित्याचे वैशिष्टये शोधणे

दलित साहित्याचा उगम –

साठोत्तरी कालखंडामध्ये मराठी साहित्यप्रवाहामधील एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह म्हणजे दलित साहित्य हा आहे. वाङ्मयीन व सामाजिक या दोन्ही दृष्टीने दलित साहित्य महत्त्वाचे मानले जाते. वर्षानुवर्षे विषमवादी समाजव्यवस्थेमध्ये भरडलेल्या दलितांनी साहित्य केलेला लढण्याचे एक हत्यार बनविले. दलित साहित्याच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व तत्वज्ञान असल्याचे दिसून येते. दलित

कोणत्या साहित्यास म्हणावे यादंसर्भात दोन मते आहेत. एक म्हणजे 'दलित साहित्य म्हणजे जन्मत: दलित असलेल्या लेखकाने लिहिलेले साहित्य होय. तर दुसरे म्हणजे दलितांचे जीवन, त्यांची दु:खे याविषयी कोणत्याही लेककाने लिहिलेले साहित्य होय.' परंतु एकंदरीत दलित साहित्याचा अभ्यास करतांना लक्षात येते की, दलित जाणिवेतून लिहिले गेलेले साहित्या म्हणजे दलित साहित्य होय.

प्रत्येक वाङ्मय निर्मितीसाठी वेगवेगळे घटक कारणीभूत असतात, यासंदर्भात डॉ. अविनाश सांगोलेकर म्हणतात की, ''कोणत्याही वाङ्मयीन प्रवाहामध्ये कालतत्व, समाज, परिस्तिथी, प्रवृत्ती इ. घटक असतात. तेही संबंधित वाङ्मयीन प्रवाहाच्या निर्मितीस तसेच त्याच्या विशिष्ट रूपासही कारणीभूत ठरतात''(१) नवसाहित्याच्या वाङ्मयीन प्रवाहाच्या निर्मितीमागेही हे घटक आहेत. त्यामुळे पारंपारिक निकष नाकारून प्रचलित व्यवस्थेमध्ये बदल व परिवर्तन करण्यासाठी दलित साहित्य उदयास आल्याचे दिसून येते.

दलित साहित्याचे स्वरूप

दलित साहित्य परिवर्तनवादी स्वरूपाचे असून त्यामध्ये आत्मभान, सामाजिक जाणिवा, आत्मशोध नकार आत्रण विद्रोह, दु:ख यातना, समानतावादी मूल्ये बांधिलकी यांना स्थान आहे वेदना व विद्रोह हे दोन मुलतत्वे दलित साहित्याची आहेत.समाज व्यवस्थेतील उपेक्षीत, दर्लक्षित, वर्षानुवर्षे अन्याय सहन करणाऱ्या गाव कुसाबाहेरील समाजाला न्याय, हक्क, आत्मभान, जागरूकता आणून देण्याचे काम दलित साहित्य करते. मानवत्वाची शिकवण देणाऱ्या ''दलित साहित्यासंदर्भात भालचंद्र फडके म्हणतात, दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य नव्हे तर ते 'माणुसकी' साठी लढणाऱ्यांचे साहित्य आहे. आपण यापुढे माणूस म्हणून जगण्याचा हक्क हक्क प्रस्थापित करू पाहणाऱ्यांचे ते साहित्य आहे. हे या देशाच्या मातीतून उदयास आहे.'' (२) यातूनच पुढे दलित साहित्य प्रवाहाची वाटचाल सुरू झाली. लोकजागृतीचे वारे वेगाने वाहू लागले किसन फागू बनसोडे, नामदेव व्हटकर, शंकरराव सुराडकर, दा.ता. रूपवते, ना.रा. शेंडे या लेखकांनी ठामपणे विचार मांडले त्यावेळीचे शाहीरी जलसे , दलित साहित्याचा प्रवाहातील महत्त्वाचा भाग ठरतात, समाजाच्या अनेकपदरी जीवनाभूतीचे चित्रण साहित्यातून घडू लागले. वैज्ञानिक व वैचारिक दृष्टीकोनातून समाजाकडे पाहण्याची प्रेरणा दलित साहित्यातून मिळू लागली.

दलित साहित्याची वाटचाल

म. फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेने प्रभावित होऊन दलित साहित्य वाटचाल करतांना दिसते. १९६० नंतर खऱ्या अर्थाने दलित साहित्याचे विस्तृतपणा व व्यापकत्व वाढले. कथा, कविता, नाटक, कादंबरी आणि आत्मकथन या संगळ्याच वाङ्मयप्रकारांना दलित साहित्याने समृध्द केले. शंकरराव खरात, हरिभाऊ पगारे अर्जुन डांगळे नामदेव ढसाळ, दत्ता भगत, ज.वि.पवार, वामन होवाळ, योगिराज वाघमारे , केशव मेश्राम, बाबुराव बागुल वामन निंबाळकर, वामनदादा कडक, बेबी कांबळे, शरणकुमार लिंबाळे, उत्तम तुपे, लक्ष्मण माने, कुमुद पावडे शांताबाई कांबळे. प्रज्ञा पवार अशा कितीतरी दलित साहित्यिकांनी शोषित, वंचित, पीडित उपेक्षित समुहाचा दडपलेल्या आवाजाला साहित्यातून वाचा फोडण्याचे कार्य केले.

कविता हा प्रकटीकरणाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे त्यामुळे अनेक विद्रोही व बंडखोर कवितांचा जन्म झाला. प्रथम कवितांमधूनच जनसामान्यांच्या वेदना, हुंकार, भावना व्यक्त केल्या गेल्या. यासंर्भात महेंद्र भवरें म्हणतात की, ''दलित कविता ही एक सामाजिक वस्तुस्थिती आहे. म्हणून प्रखर सामाजिक जाणिवा या कवितेतून प्रकटल्या आहेत. सामाजिक दु:ख, त्वेष आणि विद्रोहाला वाचा फोडण्याची कामगिरी या कवितेने केली आहे. ही कविता चळवळीची कविता असल्यामुळे परिवर्तनवादी जाणिवा साकार झाल्या आहेत.''(३) कवितांप्रमाणेच दलित कथालेखनही मोठ्या प्रमारात झाले. आत्मकथनाचे स्वरूप विस्तारित आहे. काण दलित साहित्य वास्तवनिष्ठ असल्यामुळे या लेखकांनी स्वत:च्या जीवनातील अनुभव शब्दरूपात प्रकट केलेले आहे. दलित नाटक व कादंबरी त्या तुलनेत विस्तारित , विकसित झाली नसली तरी काही चांगल्या व प्रभावी साहित्यकृती आढळतात. 'फकिरा' ल 'सूड', 'हकिकत' व 'जटायू', 'हाडकी हाडवळा 'इस्कोट', 'भस्म' या आंबेडकरी तत्वज्ञान सांगणप्रया कादंबऱ्या उदाहरणादाखल घेता येतील. अलिकडील कालात दलित साहित्याला स्थैर्य प्राप्त झाले. अने दलित चळवळीचा उदय झाला. दलित साहित्य संमेलने आयोजित होऊ लागली आहेत. दलित चळवळी निर्माण झाल्याआहेत. दलित साहित्य व चळवळी संदर्भात मधुकर मोकाशी यांनी केलेले वि. मांडलेले मत असे की, ''दलित साहित्यातून आणि चळवळीतून व्यक्त होणारी जाणीव हाच समाजाचा खरा आधार आहे. या साहित्याची व चळवळीची मूल्यनिष्ठ फार मोलाची आहे. उदयाचा प्रवास अथवा इतिहास कोणत्या दिशेने

करावा याची दिशा ठरविण्याची हिम्मत या साहित्यात व चळवळीत आहे'' (४) अशा आशावादी दलित साहित्याने नव्या समाजव्यवस्थेची मांडणी करण्याचाही प्रयत्न' केला आहे. त्यासाठी या साहित्याने स्वातंत्र्य समता, बंधुता, मानवतावाद बुध्दिप्रामाण्यवाद इत्यादी मूल्यांचा पुरस्कार केलेला दिसतो. धर्म, परंपरा, अन्याय संस्कृती, विषमता, चातुवर्ण्य व्यवस्था या गोष्टींना नकार देवून समाजव्यवस्था बदलू पाहणारे लेखक मात्र आपल्या अनुभवनांशी प्रमाणिक राहतांना दिसतात. दलित साहित्याची वाटचाल अभ्यासतांना आत्मशोध, आत्मजाणीव हे पदोपदी जाणवते

दलित साहित्याची वैशिष्टये –

आत्मभान, नकार आणि विद्रोह, बांधिलकी, आत्मशोध,आत्मजाणिव या या तत्वानुसार, वाटचाल दलित साहित्य करते समानतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारे व मानवी मूल्यांची बांधिलकी सांगणारे व जपणारे ते साहित्य आहे. दलित साहित्यावर अनेक समीक्षकांनी समीक्षालेखन केलेल आहे. डॉ. गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, प्रा. वा.कुलकर्णी, डॉ. म. ना. वानखेड, रा.ग. जाधव, मे.पुं. रेगे यांनी आपापली मते, टिका, विचार मांडलेले आहेत. डॉ. प्रभाकर मांडे यांनी देखील दलित साहित्यसंदर्भात मांडलेले मत आहे की, '' या साहित्यात एक बेडर वृत्ती दिसते. त्यात त्यांच्या खोल व वाहत्या जखमांचे दर्शन दिसते जळता संताप आणि विद्रोह , समाजाला झिडकारण्याची वृत्ती हे सर्व विशेष दिसतात. या वाङ्मयामुळे मराठी ललित साहित्याच्या सीमा विस्तारल्या आहेत''(५) हे दलित साहित्याचे विशेष महत्त्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे ते व्यक्तीनिष्ठ न राहता समूहनिष्ठ स्वरूपाचे आहे. समाजातील एखादी प्रथा, परंपरा ही त्या त्या स्तरांशी निगडीत असते. त्यामुळे तिला सार्वजनिकता प्राप्त होते. हे साहित्य एकपदरी नसून अनेक पदरी आहे म्हणूनच ते मानवतावादी साहित्य ठरते. काळानुरूप बदलत्या स्थित्यांतरांचे दर्शन त्यातून घडते. बोलीभाषेमधून वाङ्मय निर्मिती झाल्यामुळे जुन्या प्रचलित म्हणी, वाक्प्रचार शब्द यांमुळे मराठी साहित्य समृध्द होत गेले. त्या त्या प्रदेशातील लेखकांनी त्यांच्या जीवनानुभवांना आपापल्या भाषेतून प्रकट केले त्यामुळे मराठी साहित्यात दलित साहित्याचे एक वेगळेपण जाणवते.

समारोप –

समकालीन मराठी साहित्यातील ग्रामीण व दलित हे दोन बलवान प्रवाह आहेत. त्यातील दलित साहित्याने कथा , कविता, कादंबरी नाटक व आत्मकथन यांना प्रभावीपणे प्रकट केले आहे. तत्कालीन

समाजातील दु:खे यातना समाजासमोर आणून आत्मभान जागृती केली आहे. या साहित्यातून सामाजिक अभिसरण घडून परिवर्तनास गती मिळाली. दलित साहित्यावर अनेक आक्षेप टीका, मतभेद झाले परंतु जातीनिहाय समाज विषमता कमी करून समानता मूल्यांचा अंगीकार या साहित्याने केलेला आहे. हे साहित्य मानवकेंद्री असून माणसांच्या सुख दु:खांशी समरस होते. साहित्य हा समाजाचा आरसा असून त्यामुळे सामाजाचे हित साधले जाते. दलित साहित्याच्या बाबतीतही ही बाब प्रकर्षाने जाणवते एकूणच दलित साहित्य प्रवाह समकालीन मराठी साहित्यातील प्रभावी प्रवाह असून मराठी व भारतीय साहित्यात मोलाचे कार्य करणारा ठरतो.

संदर्भ –


१) सांगोलेकर अविनाश ‘दलित साहित्य : उगम व विकास’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१० (पृ. १३)

२) फडके भालचंद्र, ‘दलित साहित्य वेदना व विद्रोह’ श्री विद्या प्रकाशन, २०५ शनिवार, पुणे ३०, १९७७, (पृ.११)

३) भवरे महेंद्र, ‘दलित कविता आणि प्रतिमा’, लोकवाङ्मय गृह मुंबई (पृ. ४,५)

४) मोकाशी मधुकर, ‘ग्रामीण–दलित साहित्यः चळवळ आणि समीणा’, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे (पृ. ११)

५) मांडे प्रभाकर, ‘दलित साहित्याचे निराळेपण’, गोदावरी प्रकाशन अहमदनगर (पृ. ८)

# परिवर्तनाची मूल्य पेरणारा काव्यसंग्रह : सखी जागी हो !

**प्रा. डॉ. पंजाब लक्ष्मण शेरे**

मराठी विभागप्रमुख, बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट जि. नांदेड.

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथंक परिश्रमाने कोट्यावधी बहुजनांच्या जीवनाचे सोनं झाले. मानवाच्या कल्याणासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही मूल्य दिले. डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आंबेडकरी साहित्यिक लिहू लागला आहे. समकालीन वास्तव मांडू लागला आहे. दैववाद नाकारून समतावादी विचार साहित्यातून पुढे येतांना दिसत आहे.

परिवर्तनवादी मूल्यांचे जागर करण्यासाठी सखीना जागी होण्याची तळमळ, 'सखी जागी हो'! या काव्यसंग्रहातून कवयित्री वंदना तामगाडगे यांनी व्यक्त केली आहे.

आंबेडकरवादी कवयित्री म्हणून प्रज्ञा पवार, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रतिमा अहिरे, आशालता कांबळे, उर्मिला पवार, बेंबी कांबळे, करुणा जमदाडे, संध्या रंगारी, सुनिता बोर्डे, प्रेरणा व्यवहारे, यासह अनेक कवयित्रीने सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासह सर्वच महापुरुष यांच्या क्रांतिकारी विचारांने प्रेरित होऊन काव्यलेखन करीत आहेत. समाजातील वाईट चालीरीतीवर भाष्य करीत आहेत. आंबेडकरी चळवळीचे विचार कवितेतून स्त्रीमनावर रुजविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. महापुरुषांच्या चळवळीतून नवी प्रेरणा घेऊन विद्रोह, नकार, संवेदना, स्वाभिमान कवितेतून व्यक्त होत आहे. बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून आम्ही प्रगती साधली असली तरीही मनात अंधश्रध्दा घेऊन जीवन व्यतीत करणा-या स्त्री मनाला जागे करण्याचे काम 'सखी जागी हो!' या काव्यसंग्रहातील कवितेतून कवयित्री वंदना तामगाडगे यांनी केली आहे. 'स्त्री ही माणूस आहे. ही स्त्रीवादाची पहिली भूमिका आहे. त्यामुळे माणंसासारखं जगणे ही स्त्रीची भूक आहे'१

कवयित्री वंदना तामगाडगे ह्या महात्मा फुले विद्यालय, घोटी ता. किनवट येथे माध्यमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. कवयित्री वंदना तामगाडगे यांनी 'भीमदास' हे नाटक प्रारंभी प्रकाशित केले. त्या विविध साहित्य संमेलनात कविता सादर करीत आल्या आहेत. सामाजिक चिंतन, मनन, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते याची जाणीव त्या मांडत आल्या आहेत. त्यांची कविता परिवर्तनाची मूल्य पेरणारी आहे. समाजातील वास्तव स्पष्टपणे त्या कवितेतून व्यक्त करीत आल्या आहेत. समाजातील वाढती दुफळी, दैववाद, याविषयी स्त्रिया बरोबरच पुरुषांनासुध्दा जागे करण्याचे काम करतात.

'ही सारी कविता बांधिलकीची कविता आहे. कवी आपल्या समाजाशी बांधील आहेत. समाजाचा अन्यायाविरुद्ध, अमानुषतेविरुध्द, शोषणाविरुध्द आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी जो लढा चाललेला आहे त्यामधील एक हत्यार म्हणून या कवितेचा वापर केला जात आहे'२

मराठी साहित्यात कविता हा वाडमय प्रवाह अधिक समृद्ध झाला आहे. मानवी भाव भावनेचे चित्रण मराठी साहित्यातून होत आहे. मानवी संवेदनशील मनाला मोकळे करण्याकरिता समकालीन मराठी साहित्य कविता हा

प्रवाह महत्त्वाचे ठरला आहे. आंबेडकरी, ग्रामीण, स्त्रीवादी कवितेतून समकालीन वास्तवतेची जाणिव व्यक्त होते. अन्यायाची चिड, संवेदना, शोषण, कवितेतून प्रखटपणे व्यक्त होतांना दिसते.

आज शिक्षणामुळे स्वाभिमान जागा झाला आहे. क्रांतीची भाषा बोलू लागले आहेत.स्त्रीवादी साहित्यात कवयित्री ह्या शोषणाविरुध्द लिहू लागली आहे. श्रध्दा, अंधश्रध्दा या विषयी वास्तव समजावून घेत आहेत. इ. स. १९७५ पासून मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य आपली वास्तवतेची भूमिका स्पष्टपणे मांडत आली आहे. मराठी साहित्यातील मोठे दालन स्त्रीवादी साहित्याने समृद्ध केले आहे. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भाने प्रा. रा. ग. जाधव यांनी असे म्हटले की,

'जीवनमूल्याची, स्त्रीची, स्त्रीत्वाची, प्रासंगिक भूमिकेची, व्यक्तिगत मूल्यमापनाची जुनी संदर्भ, चौकट मोडून टाकली आहे'३

कवयित्री वंदना तामगाडगे या परंपरेला छेद देत नव क्रातीचे विचार पेरतांना दिसतात. सखी जागी हो! या काव्यसंग्रहातील मशाल कवितेतून त्यांनी राष्ट्रपिता महात्मा फुले यांच्या शैक्षणिक क्रांतीची जाणिव करुन दिली आहे.

**'ज्योतिबाने पेटविली**
**क्रांतीची मशाल**
**सावित्रीनी वाढविली**
**महिलांची शान'**

राष्ट्रपिता महात्मा फुले यांनी शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली. सामाजिक स्वाभिमान जागा करुन समतेचे मूल्य पेरले आहे. मुलीची पहिली शाळा काढून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिकविण्याचे महान कार्य करुन महिलाचा स्वाभिमान जागी केला आहे. आज सर्वक्षेत्रात महिलांना आपले हक्क, अधिकार हे शिक्षणामुळे कळत आहेत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानातून सर्व स्त्रियाना, मानवाला हक्क, अधिकार, कर्तव्य यांची जाणिव करुन दिली आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही भारतीय संविधानाने निर्माण केली आहे. सखी डोळे उघड, समजून घे! 'सखी जागी हो! 'या काव्यसंग्रहातून कवयित्री वंदना तामगाडगे हिने आवाज दिली आहे.

**'लोकशाहीच्या राष्ट्रात ही**
**नावाला का समानता**
**विषमतेचे बळी आम्ही**
**किती दिवस पडायचे'**

भारतीय संविधानाने येथे समता, स्वांतत्र्य, बंधुता, न्याय ही मूल्य दिली आहेत. एकता, समानता, लोकशाही, बरोबरच स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी बळ दिले आहे. असे असले तरीही अजूनही विषमतावादी विचारातून आपण बाहेर पडत नाही. सखी आता तरी जागी हो! लोकशाही समजून घे.विषमतेला बळी पडू नये ही जाणिव व्यक्त होते.

**'अन्यायाने जुलूम सहणा-यांना**

**बळ मिळाले लढण्याचे अन सावरण्याचे**
**अन्यायाविरुद्ध फुटती वाचा**
**कित्येक दिवसांनी भीमा तुझ्या शब्दानी'**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथग परिश्रमाने येथे सामान्यांना न्याय मिळाला आहे. जगण्याचे बळ मिळाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी कार्यातून प्रेरणा घेऊन विषमतेवर प्रहार कर! माणुस म्हणून जगू न देणा-या विषमतेवर प्रहार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्येक शब्द नवी दिशा देणारा आहे.

**'अन जागे कर**
**गाढ निद्रेत झोपलेल्यांना**
**नाही तर**
**या काळोखात**
**तशी झोपून जाईल**
**तुझी सर्व पीढी'**

महामानवाचे ऋण आपण फेडू शकत नाहीत. अनंत उपकार आहेत युंगधराचे! काळ मोठा कठिण आहे.झोपेचे सोगं न घेता जागी राहा.समतेची मूल्य पेरत राहा. समाज परिवर्तनासाठी जागर करीत राह. पुढील पिढीला नवीन विचार देत जा. असे तळमळीने कवयित्री व्यक्त करते.

**'जीवनसाथी निवडा तुम्ही**
**समविचाराचा पोर**
**तोच करेल उध्दार**
**तुमचा जीवनभर'**

जात, पोटजात, धर्म पाहून लग्न करण्यापेक्षा समविचारी मुलगा लग्नासाठी निवडा तोच तुमचा खरा साथीदार ठरेल. ही वास्तवतेची भावना येथे व्यक्त होते.

**'सोड आता मनुस्मृती**
**त्याविना नाही मुक्ती**
**समानतेला जाग जरा**
**जगण्याला मिळेल स्फुर्ती'**

विषमतावादी विचार नाकारून समतावादी विचार स्विकार. भारतीय संविधानाने समानता दिली आहे. त्यातून प्रेरणा घेऊन जीवनात स्फुर्ती मिळेल.नव परिवर्तन विचार आत्मसाथ करुन क्रांतिकारी पाऊलवाट निर्माण करण्यासाठी सखी जागी हो ! या काव्यसंग्रहातील कविता परिवर्तनाची मूल्य पेरतांना दिसते.

'भीमा तुझ्या शब्दांनी 'या कवितेतून कवयित्री वंदना तामगागडे म्हणतात.

**तुझेच शब्द अन**
**तुझीच लेखणी**

**तुझेच गाणे अन**

**तुझीच वाणी**

**आज गुणगुणते आहे**

**कित्येक दिवसांनी'**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनंत उपकार मानवावर आहेत. ही कृतज्ञता अभिव्यक्त होते. महापुरुषांच्या क्रांतिकारी विचारांची पेरणी करुन, जीवन समृध्द बनविण्यासाठी विज्ञानाची कास धरावी अशा भाव त्या व्यक्त करतात.

**'भीम सैनिक हो..!**

**जरा पुढे पुढे चला**

**घेऊन झेंडा निळा'**

या कवितेतून समाज वास्तव त्या स्पष्टपणे मांडतात. आंबेडकरी चळवळीतील दुभंगत चाललेली परिस्थिती पाहून कवयित्री अस्वस्थ होते.

**'हुंडा हे काय आहे?**

**प्रतिष्ठानचे गाव आहे**

**किमत वाढीस वाव आहे**

**प्रत्येकाचाच वेगळा भाव आहे'**

हुंडा घेणे व देणे हे कायद्याने गुन्हा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून 'हूंडा ' ही पध्दत बंद केली आहे. तरी ही हुंडा घेतला व दिला जातो. या विसयी कवयित्री खंत व्यक्त करतात.आशा वाईट चालीरिती, कुप्रथेच्या विरूध्द स्त्रियांना जागे करुन स्वाभिमानी परिवर्तनवादी विचाराची पेरणी करणारा हा काव्य संग्रह आहे.

या काव्यसंग्रहाला प्रसिद्ध आंबेडकरवादी कवी, प्रा. रविचंद्र हडसनकर यांची अत्यंत अभ्यासपूर्ण प्रदीर्घ प्रस्तावना आहे. प्रसिद्ध नाट्यकलावंत व कवयित्री डॉ. प्रतिमा जाधव, नाशिक यांनी पाठराखण केली आहे.
प्रसिद्ध कवयित्री सुजाता पोपलवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. क्रातीसूर्य प्रकाशन, किनवट यांनी प्रकाशित केले आहे.

**संदर्भ :**

१) धोंडगे अश्विनी, १९९० नंतरची स्त्रीवादी कविता, अक्षरगाथा, वर्ष पहिले, अंक तिसरा, १० आॅक्टोंबर २०१०पृ. ४२

२) म. सू. पाटील, दलित कविता व दलित साहित्याचे सौदर्यशास्त्र, २०१० पृ. ९७

३) प्रा. रा. ग. जाधव, आधुनिक कवयित्रीची कविता, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९६ पृ. ११

४) वंदना तामगाडगे, 'सखी जागी हो! ' क्रांतीसूर्य प्रकाशन, किनवट प्रथावृत्ती २०२२.